सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी

अर्धातास चर्चा

पृ.शी.: नागरी संरक्षण दल व होमगार्डचे प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींना पोलीस भरतीमध्ये प्राधान्यक्रम देणे

मु.शी.: नागरी संरक्षण दल व होमगार्डचे प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींना पोलीस भरतीमध्ये प्राधान्यक्रम देणे यासंबंधी श्री.संजय केळकर यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

"पोलीस मॅन्युअल ॲक्टमध्ये ग्रामीण सुरक्षा दलाची स्थापना करण्याची तरतूद असणे, संप, मोर्चा आंदोलन अथवा नैसर्गिक किंवा अचानक उद्भवलेल्या परिस्थितीला सामोरे जाताना पोलिसांना २४ तास काम करावे लागत असणे, अशावेळी त्यांच्यावरील राजकीय दबाव पाहता त्यांच्याकडून बेजबाबदार वर्तन घडू शकण्याची शक्यता असणे, यासाठी त्यांना सहकार्य करण्यासाठी राज्यात होमगार्ड/नागरी संरक्षण दलातील कर्मचाऱ्याकडून बजावली जाणारी सेवा तसेच त्यांचा कामाचा अनुभव लक्षात घेता विशिष्ट परिस्थितीत निमसुरक्षा दल म्हणून कंत्राटी पध्दतीवर नेमणूक तसेच भविष्यात निर्माण होणाऱ्या पोलीस दलातील शासकीय पदावरील भरतीच्या वेळेस या कर्मचाऱ्यांना प्राधान्यक्रमाने संधी देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, पोलीस मॅन्युअल ॲक्टमध्ये सुरक्षा दलाची स्थापना करण्याची तरतूद आहे. त्यानुसार पोलीस दलाला मदत करण्यासाठी राज्यात होमगार्ड व नागरी संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे. नागरी संरक्षण दलाची स्थापना 1968 मध्ये झालेली असली तरी होमगार्डची स्थापना त्यापूर्वी झालेली आहे. पाकिस्तान देशाविरुध्द झालेले युध्द, चीन देशाविरुध्द झालेले युध्द याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या नागरी संरक्षण दलांची गरज आहे हे लक्षात घेऊन राज्यात नागरी संरक्षण दल आणि होमगार्डची स्थापना करण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

सभापती महोदय, मी स्वत: नागरी संरक्षण दल आणि होमगार्डशी संबंधित आहे. त्यांच्या कार्यक्रमांमध्ये, उपक्रमांमध्ये मी वेळोवेळी सहभाग घेत असतो. ठाणे जिल्हयाचा कार्यकारी अधिकारी म्हणून देखील मी काम करतो. नैसर्गिक आपत्ती, बॉम्बस्फोट, मोठ्या प्रकारचे अपघात, इमारत कोसळणे, रेल्वे अपघात अशा घटनांच्या वेळी पोलीस दलाला मदत करण्यासाठी या नागरी संरक्षण दलांचा फायदा होत असतो. पोलीस दलाला सहाय्य करण्याच्या दृष्टीने नागरी संरक्षण दल किंवा होमगार्डची स्थापना झाली आहे. उद्देश अत्यंत चांगला आहे. परंतु आजची परिस्थिती लक्षात घेतली तर देशात अनेक ठिकाणी काल भूकंपाचे हादरे बसले, अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळी नागरी संरक्षण दल मदतीसाठी धावून जाते. ही काळाची गरज बनलेली आहे. नागरी संरक्षण दल अधिक कार्यक्षम, अधिक सक्षम करण्यासाठी या दलाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. आज नागरी संरक्षण दलामध्ये 150 कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. जिल्हयाच्या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे पद कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर भरण्यात आले आहे. केंद्र सरकारने ठाणे आणि कोकणातील जिल्हे संवेदनशील जिल्हे म्हणून घोषित केले आहेत. त्या ठिकाणी अशी अवस्था असेल तर आपत्ती व्यवस्थापन योग्य प्रकारे करता येणार नाही.

सभापती महोदय, होमगार्ड आणि नागरी संरक्षण दल यांच्या बाबतीत डबल स्टॅण्डर्ड असल्याचे दिसून येते. होमगार्डमध्ये कार्यरत असणाऱ्यांना प्रशिक्षण भत्ता व आहार भत्ता म्हणून दैनंदिन 150 रुपये दिले जातात तर नागरी संरक्षण दलात कार्यरत असणाऱ्यांना प्रशिक्षण व आहार भत्ता म्हणून दैनंदिन 135 रुपये दिले जातात. वास्तविक या दोन्ही दलातील जवानांना देण्यात येणाऱ्या भत्त्यामध्ये तफावत असण्याची आवश्यकता नाही. दोन्ही दले एकाच प्रकारची कामे करतात. किंबहुना होमगार्डचे जवान एक पाऊल पुढे जाऊन काम करीत असतात. त्यांच्या भत्त्यामध्ये वाढ व्हावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, नागरी संरक्षण दलामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवकांना कामावर असताना अपघात झाला तर त्यांना कोणतेही संरक्षण दिलेले नाही. त्यांच्या कुटुंबीयांना मदत दिली जात नाही. होमगार्डमधील जवानांना शासकीय मदत दिली जाते. त्यामुळे होमगार्डमध्ये भरती होण्यास अधिक तरुण आकर्षित होतात. त्यामुळे अपघात झाल्यानंतर मदत देण्याबाबत आणि भत्त्याबाबत जे डबल स्टॅण्डर्ड आहे ते काढून टाकण्याची गरज आहे. आज राज्यात पोलीस बळ अपुरे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यामुळे पोलिसांवर खूप ताण येतो. अति महत्वाच्या व्यक्तींच्या संरक्षणापासून देशात घडत असलेल्या निरनिराळ्या घटना लक्षात घेतल्यानंतर कितीही पोलीस भरती केली तरी संख्याबळ कमी पडणार आहे. मध्यंतरी राज्यातील महापालिका व नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कामासाठी पोलीस दलाचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे नागरी संरक्षण दल अधिक कार्यक्षम केले तर निश्चितपणे त्या दलाचा उपयोग करुन घेता येईल.

सभापती महोदय, महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना 12 वी पर्यंत नागरी संरक्षण दलाचा कोर्स महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा केला तर मोठया प्रमाणात तरुणांची फौज या दलासाठी उपलब्ध होऊ शकते. काही देशांमध्ये कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला सैनिकी प्रशिक्षण सक्तीने दिले जाते. आज देशाला एकविसाव्या शतकात पुढे नेण्यासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये दिले जावे, शालेय अभ्यासक्रमामध्ये देखील नागरी संरक्षण दलाच्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करावा अशी मी शासनाला विनंती करतो. हा अभ्यासक्रम अतिशय सोपा आहे. लहानपणी, शालेय जीवनापासून आपत्ती व्यवस्थापनाचे धडे गिरविले तर तरुण वर्गाला याची पुरेपूर माहिती मिळू शकेल. त्यांच्यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या वेळी काम करण्याची रुची निर्माण होईल.

सभापती महोदय, आज या दलामध्ये मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्यासाठी निधीची तरतूद वेळेवर केली पाहिजे. प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी या मागणीचा पाठपुरावा करीत असतो. होमगार्ड व नागरी संरक्षण दल सक्षम करण्यासाठी त्यांना वाहने पुरविणे, इतर आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे यासाठी निधीची तरतूद केली तर ही दले कार्यक्षमपणे काम करु शकेल. आज ठाणे जिल्हयामध्ये होमगार्डच्या कमांडरची नेमणूक झालेली नाही. ठाणे ग्रामीणचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्याकडे या पदाचा कारभार सोपविण्यात आला आहे. आज होमगार्डची रया जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या अर्धा तास चर्चेकडे सकारात्मक दृष्टीने पाहून एक पाऊल कसे पुढे टाकता येईल व तरुणांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊन, शिस्तीचे धडे गिरवून, गणवेश घालून काम करण्याची संधी त्यांना मिळू शकेल या दृष्टीने निर्णय झाला पाहिजे. या दलाच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी जागरुकता निर्माण होत असते. त्या दृष्टीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रशिक्षण दिले जाते. मी ज्या मागण्या केल्या आहेत त्यांना समर्थन देऊन नागरी संरक्षण दल आणि होमगार्ड अधिक सक्षम करण्याकरिता प्रोत्साहन दिले जावे, जेणेकरुन अधिकाधिक स्वयंसेवक पुढे येतील.

सभापती महोदय, राज्यात मोठया प्रमाणात बेरोजगार आहेत. ते या कामात मदत करु शकतात. आज प्रशिक्षण घेतलेले स्वयंसेवक कंटिन्यू रहात नाहीत. त्यांच्याकडून कार्यक्षमपणे काम करुन घ्यायचे असेल तर त्यांना आवश्यक असलेल्या गोष्टी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे मला वाटते. सभापती महोदय, होमगार्ड आणि नागरी संरक्षण दलाचे मर्जिंग करण्याचा विचार गृह विभागाला करता आला तर तसे करण्यास आमची हरकत नाही. या दोन्ही दलांचे मर्जिंग केले तर अधिक प्रभावीपणे काम करु शकतील. राज्यात वेळोवेळी निरनिराळ्या ठिकाणी पोलीस भरती होत असते. पोलीस भरती होत असताना होमगार्ड आणि नागरी संरक्षण दलातील जवानांसाठी टक्केवारी राखून ठेवली जाते. या दलामध्ये प्रशिक्षण घेतलेले जवान अधिक प्रभावीपणे पोलीस दलात काम करु शकतात. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी या जवानांसाठी टक्केवारी न ठेवता प्राधान्याने त्यांना सहभागी करुन घेतले तर अधिकाधिक सक्षम मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकते. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच होमगार्ड आणि नागरी संरक्षण दलाचे प्रशिक्षण घेतले तर अधिक चांगले रिझल्ट मिळतील.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

अशा प्रकारची मागणी मी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून करीत आहे. होमगार्ड व नागरी संरक्षण दलाला चांगल्या प्रकारे प्रशिक्षण देऊन कार्यक्षम केले तर त्यांचा चांगला उपयोग पोलीस खात्याला होऊ शकतो. त्यामुळे अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून होमगार्ड व नागरी संरक्षण दलाला अधिक सक्षम करावे अशी मागणी करतो. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी होगगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या संदर्भात अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने शासनाचे लक्ष वेधलेले आहे. आपल्या राज्यात 53,856 होमगार्ड जवान कार्यरत असून जवळ जवळ 62,000 जवान नागरी संरक्षण दलामध्ये काम करीत आहेत. या दोन्ही दलांचा उपयोग पोलिसांवरील भार कमी करण्यासाठी शासन करीत असते. कायदा व सुव्यस्थेच्या संदर्भात होमगार्डसचा वापर केला जात असतो व त्याच बरोबर महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, नवी मुंबई, उरण, तारापूर या क्षेत्रामध्ये तसेच अलीकडच्या काळामध्ये समाविष्ट केलेले सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथे याचा उपयोग केला जात असतो. नागरी संरक्षणदलाची स्थापना मुख्यत: युध्दाच्या वेळी होणाऱ्या परिणामाची तीव्रता कमी करण्यासाठी झाली होती. परंतु अलिकडच्या काळात नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्तींची संख्या वाढल्यामुळे नागरी संरक्षण दलाचा वापर केला जात आहे. आतापर्यंत नागरी संरक्षण दलाने अंदमान, निकोबार, गुजरात, ओरिसा येथे आपत्कालीन स्थितीमध्ये स्वयंसेवक म्हणून अत्यंत उत्कृष्ठ काम केलेले आहे. मुंबईच्या 26/11 च्या घटनेत या दलाने अतिशय चांगल्या पध्दतीची मदत केलेली आहे.

होमगार्डला दिल्या जाणाऱ्या व नागरी संरक्षण दलाला दिल्या जाणाऱ्या सवलतींमध्ये तफावत आहे. त्याच बरोबर अन्य राज्यामध्ये होमगार्डला मिळणाऱ्या सवलती आणि आपल्या राज्यामध्ये मिळणाऱ्या सवलतीमध्ये तफावत आहे. देशातील काही राज्यामध्ये होमगार्डला प्रतिदिनी 250 रुपये भत्ता दिला जातो आपल्याकडे मात्र तो 150 रुपये दिला जातो. होमगार्डचा वापर अलीकडे मोठया प्रमाणात वाढला आहे. होमगार्डला आपण तीन वर्षात केवळ दोनच गणवेश देत असतो. तसेच त्यांना मिळणारा प्रतिदिनीचा खर्च मात्र अपुरा आहे. त्यामुळे दोन बाबीच्या संदर्भात विचार केला असून होमगार्डला दिला जाणारे ट्रेनिंग अजून चांगले करणे, त्याच बरोबर त्यांना ज्या सवलती दिल्या जातात त्यामध्ये वाढ करण्यासाठी गृह विभागाने प्रस्ताव तयार केला आहे.

सन 2008 च्या अगोदर होमगार्डला प्रतिदिनी 75 रुपये कर्तव्य भत्ता दिला जात होता परंतु तो सन 2008 मध्ये 150 रुपये केला असून तो सुध्दा आतच्या महागाईच्या प्रमाणात कमी आहे तो किमान 250 रुपये असला पाहिजे. त्यांना दिला जाणारा उपहार भत्ता 2008 पूर्वी 15 रुपये होता तो सन 2008 मध्ये 50 रुपये केला असून तो आता 100 रुपये करण्याची आवश्यकता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

आहे. कवायत भत्ता 2008 पूर्वी 22.50 रुपये दिला जात होता तो आपण आता 45 रुपये केला असून तो आता 90 रुपये करण्याची आवश्यकता आहे. भोजन भत्ता सन 2008 पूर्वी 30 रुपये होता तो आता 65 मिळतो तो आता किमान 90 रुपये करण्याची आवश्यकता आहे. अशा पद्धतीचा विचार गृहविभागाने केलेला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच वित्त विभागाला सादर करण्यात येईल. सन 2008-09 मध्ये होमगार्ड व नागरी सेवादलावर 31 कोटी रुपये खर्च झाले होते परंतु सन 2010-2011 मध्ये 65,15,17,243 रुपये खर्च झालेले आहेत. होमगार्डला शासन जास्तीत जास्त सवलती देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे हे स्पष्ट होते. अन्य राज्याच्या तुलनेने आपल्या राज्यात होमगार्ड व नागरी संरक्षण दलाला कमी प्रमाणात सवलती दिल्या जातात. या सवलती कमी राहू नये तसेच चांगले काम करणाऱ्या दलाला संधी मिळावी व न्याय मिळावा यासाठी गृहविभागाचा प्रयत्न असून यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच वित्त विभागाची मान्यता घेऊन मंत्री मंडळासमोर सादर केला जाईल व याबाबतीतील धोरण ठरविले जाईल. अन्य राज्याच्या तुलनेमध्ये होगगार्ड व नागरी संरक्षण दलाला आपल्या राज्यात मिळणाऱ्या सवलतीमध्ये तफावत आहे. अशा प्रकारची तफावत ठेवण्याची आवश्यकता नसून ही तफावत लवकरात लवकर दूर केली जाणार आहे. होमगार्डच्या बाबतीत ज्यावेळी निर्णय घेऊ त्यावेळी होमगार्डला ज्या सवलती मिळत आहेत त्या सवलती त्यांच्या कर्तव्यकाळात त्यांनाही मिळाल्या पाहिजेत ही भूमिका शासनामार्फत घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कमांडन्रच्या रिक्त पदाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. कमांडन्रची जी रिक्त पदे आहेत ती पदे भरतांना त्यामध्ये वशिलेबाजी होऊ नये, गुणवत्तेवर ही पदे भरली जावीत, केवळ कोणी तरी कोणाच्या जवळचा आहे म्हणून भरती होऊ नये यासाठी कमिटया केल्या असून त्यांचे इंटरव्हयू होत आहेत. शासन त्यामध्ये शक्यतो हस्तक्षेप करीत नाही. गुणवत्तेनुसार भरतीच्या संदर्भात आपण नियमात जे काही बदल केलेले आहे त्या अनुषंगाने भरती केली जात आहे. पूर्वी एखादे पत्र किंवा गृहमंत्र्यांना वाटले तर संबंधितांना कमांडन्ट केले जात असे. परंतु ही पध्दत बरोबर नसल्यामुळे चुकीचे लोक निवडले जात होते. गुणवत्तेनुसार पदे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

भरली जावीत यासाठी आम्ही नियमावली तयार केली असून त्या मार्फत अर्ज मागवले जातात व गुणवत्तेनुसार भरती केली जात आहे. या भरती प्रक्रियेमध्ये थोडा विलंब झालेला आहे ही गोष्ट बरोबर आहे. परंतु आता सर्व प्रक्रिया संपत आलेली असून जिल्हास्तरावरील मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. येत्या 2-3 महिन्यात ज्यांच्या मुलाखती झालेल्या आहेत त्यांची भरती प्रक्रिया पूर्ण केल्या जातील व कमांडन्रच्या जागा कोठेही रिक्त राहणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल.

सभ्ांपती महोदय, पोलीस दलाच्या भरतीमध्ये होमगार्डसाठी आपण 5 टक्के जागा रिझर्व्ह केल्या असून त्या स्ट्रिक्टली भरल्या जात आहेत. 5 टक्के रिझर्व्हेशन गेल्या 3 वर्षामध्ये काटेकोरपणाने भरले आहे. परंतु आता रिझर्व्हेशन 50 टक्क्याच्यावर नेता येत नाही त्यामुळे होमगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या संदर्भात रिझर्व्हेशन कसे ठेवता येईल याचा आम्ही विचार करु. या दोन्ही संघटना पोलिसांना मदत करणाऱ्या आहेत. होमगार्ड व नागरी संरक्षण दलाला दुजाभावाची वागणूक न देता ज्या संघटना चांगले काम करतात त्यांना चांगल्या संधी व चांगले मानधन मिळेल यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अर्धातास चर्चा क्रमांक 2 व 3 बाबत</u>

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शवण्यात आलेल्या अर्धातास चर्चा क्रमांक 2 व 3 ज्या सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या आहेत ते सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे कामकाज पत्रिकेत दर्शवण्यात आलेल्या चौथ्या क्रमांकाच्या अर्धा तास चर्चेला आता सुरुवात करण्यात येईल.

--

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथील कॉसमॉस संकुलात मोबाईल टॉवरचा झालेला स्फोट

मु. शी. :सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथील कॉसमॉस संकुलात मोबाईल टॉवरचा झालेला स्फोट या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २३५७९ ला दि-नांक २२ डिसेंबर,२०११रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथील कॉसमॉस संकुलात मोबाईल टॉवरचा झालेला स्फोट या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 23579 ला दिनांक 22 डिसेंबर, 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील कॉसमॉस संकुलात मोबाईल टॉवर विना परवाना बसविला गेला होता. हा मोबाईल टॉवर बसवितांना नगरपालिकेची किंवा स्थानिक प्राधिकरणाची परवानगी घेतली गेली नव्हती. मोबाईल टॉवर बसवल्यानंतर त्यामध्ये काही बिघाड झाला व त्यामुळे वायर जळाली व त्यांनतर अंतर्गत स्फोट झाला होता. मी प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी वायर जळाली असून स्फोट झाला नाही असे उत्तर देण्यात आले होते. महसूल अधिनियम 1966 चा कलम 44 (अ) (4) नुसार संबंधित मोबाईल टॉवर कंपनीवर दंडही आकारण्यात आला होता. याचाच अर्थ मोबाईल टॉवर कंपनीने गैरकृत्य केल्याचे उघड होते. मोबाईल टॉवरची वायर जळाल्यामुळे किवा स्फोट झाल्यामुळे त्या इमारतीमधील सर्व रहिवासी भयभीत झाले होते व त्यामुळे त्यांनी तक्रार केली होती. सिंधुदुर्ग मध्ये 234 मोबाईल टॉवर धारकांनी शासनाला 1,51,45,000 रुपये देणे बाकी होते. दिनांक 15.7.2011 पर्यंत 136 मोबाईल टॉवर धारकांनी अद्याप 95,16013 रुपये भरलेले नाहीत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

माझा एकच प्रश्न आहे. सर्व टॉवर धारकांनी परवानगी घेतली आहे.

सभापती महोदय, माझ्या या अर्धा तास चर्चेला कोणत्या विभागाचे मंत्री उत्तर देणार आहेत हे मी या निमित्ताने विचारू इच्छितो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सदर चर्चा गृह विभागाकडून महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. माननीय महसूल मंत्री येई पर्यंत मी आता आपली चर्चा थांबवत असून पुढची चर्चा घेत आहे. त्यानंतर आपल्या चर्चेला सुरूवात करू या.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मागच्या वेळी या प्रश्नावर गृह विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर दिले होते.

तालिका सभापती : ठीक आहे. मी आपणाला नंतर संधी देतो. आता अर्धा तास चर्चा क्रमांक 5 घेण्यात येईल.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपरिषदेच्या हद्दीतील एस.टी.आगाराकरिता राखीव असलेल्या भूखंडाचे निवासी भूखंडामध्ये रूपांतर करणे

मु.शी.: चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपरिषदेच्या हद्दीतील एस.टी.आगाराकरिता राखीव असलेल्या भूखंडाचे निवासी भूखंडामध्ये रूपांतर करणे या संबंधी श्रीमती शोभा फडणवीस यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र. 423, 365, 366 ह्या जमिनी सन 2001-02 पुर्वी एस.टी. महामंडळाच्या डेपोकरिता राखीव करण्यांत येणे, परंतु सन 2001-02 नंतर नगरपरिषदे तर्फे नकाशात दुरुस्ती करुन रहिवासी झोन म्हणून लागू करणे, त्यासंबधी प्रारुप आराखडा तयार करुन नकाशात दुरुस्ती करण्यांत येणे, त्यातच नगर रचनाकार चंद्रपूर यांचे कार्यालयाकडून एस.टी.ची राखीव जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी नियोजन मंडळाने शिफारस करुनही अद्यापही त्याबाबत आदेश काढण्यात न येणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने त्वरीत मौजा मूल येथील सर्व्हे क्र. 422, 423, 365, 366 ह्या जागेचा रहिवासी झोनचा आदेश काढण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल शहराच्या नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व्हे क्र.422,423,365,366 हा भूखंड एस.टी.महामंडळाच्या डेपोकरिता राखीव होता. सन 1996 साली सदर जागेची पाहणी आगार निवड समितीच्या वतीने करण्यात आली व सदर जागा

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

डेपोसाठी निवडण्यात आली. त्यानंतर दिनांक 27.2.1998 रोजी नगररचनाकार यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 28 (2) नुसार शासनाने नियुक्त केलेले व नगर परिषदेतील स्थायी समिती मधील सदस्य मिळून तयार केलेली नियोजन समितीने प्राप्त आक्षेप/सूचनांवर निर्णय घेऊन त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणाला सादर केला.

नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीच्या निर्णयास मंजुरी दिली. त्यानुसार आरक्षण क्र.27 एस.टी.आगारा खालील जागा वगळून ती रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात आली असून एस.टी.आगाराकरिता नव्याने जमीन तहसीलदाराने प्रस्तावित केली. त्याचा सर्व्हे क्र.802,803,304 असा आहे. त्या पद्धतीने दुरूस्ती देखील करण्यात आली. त्यानंतर मूल नगरपालिकेच्या नकाशात तो भाग वगळून निवासी उपयोगासाठी आरक्षित करण्यात आला. त्याप्रमाणे सर्व्हे क्र.422,423,365,366 मध्ये रहिवासी झोन अशी दुरूस्ती करण्यात आली. नकाशा देखील दुरूस्त झाला. एवढे सर्व होऊनही नगररचनाकारांनी मात्र जिल्ह्याच्या नकाशात दुरूस्ती करून आरक्षण रद्द केले नाही. ही त्यांची चूक आहे. त्यांनी आम्हाला पत्र देखील दिले आहे. त्या पद्धतीप्रमाणे त्यांनी ते करायला पाहिजे. पण त्यांनी ते केले नाही. 1998 चा आदेश असूनही 2011-12 पर्यंत त्यांनी दुरूस्ती केली नाही. ह्या बाबत मी 2009 मध्ये पत्र दिले. परंतु, अद्याप रेकॉर्ड दुरूस्त झालेला नाही. तो तातडीने दुरूस्त करण्यासाठी मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

वास्तविक पाहता एस.टी.आगारासाठी दुसरी जागा मिळाली आहे. गेल्या 12 वर्षा पासून एस.टी.डेपो करायचा किंवा नाही या संबंधात निर्णय झालेला नाही. एस.टी.महामंडळाने डेपो करायचा की नाही हे देखील अजून ठरविलेले नाही. आता जागा अडवून लोकांना त्रास देण्याचा प्रकार मात्र सुरू झालेला आहे. मी दिनांक 26.11.2009 रोजी नगररचनाकार यांना पत्र दिले आहे. त्यांनी मला असे कळविले आहे की, जागा रहिवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी नियोजन मंडळाने शिफारस केलेली आहे. परंतु, शासन निर्णय अजून अप्राप्त आहे. तेव्हा शासन निर्णय कोणी काढावयाचा आहे ? मी सन 2009 मध्ये तक्रार करूनही अजूनही नगररचनाकार आणि

...4

श्रीमती शोभा फडणवीस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.टी.महामंडळ यांच्यामध्ये समन्वय नाही. अजूनही कुठल्याही प्रकारची दुरूस्ती त्यांनी केलेली नाही. माझ्या माहिती प्रमाणे एस.टी.महामंडळाने ती जागा नको असे अजूनही नगररचनाकाराला कळविले असेल किंवा नगरविकास विभागाला कळविले असेल असे मला वाटत नाही. या बाबत नगरपरिषदेचे ना हरकत प्रमाणपत्र देखील आले आहे. त्यांनी त्यांचे नकाशे, रेकॉर्ड दुरूस्त केले आहेत. तो नकाशा, ते रेकॉर्ड दुरूस्त करून त्यांनी सदर जागा निवासी उपयोगासाठी राखीव ठेवली आहे असे सांगितले आहे. त्यामुळे आम्ही विश्वास ठेवला. नगररचनाकारला मी पत्र दिले की, तुमचा रेकॉर्ड आम्हाला द्यावा तेव्हा त्यांनी मला सांगितले की, शासन निर्णय अप्राप्त आहे. अजूनही आमच्याकडे कुठल्याही प्रकारचे पत्र आलेले नाही. त्यामुळे आम्ही यामध्ये बदल करू शकत नाही. मंत्रालयात सचिव पातळी पर्यंत सगळ्यांकडे पत्र देऊन, महामंडळाच्या अधिकाऱ्यांना 3 वर्षे पत्र देऊन प्रयत्न केले. परंतु, अद्यापही त्यासंबंधी निकाल लागलेला नाही. आमदारांच्या पत्राबाबत असे होत असेल तर सर्वसामान्य माणसाला न्याय कसा काय मिळू शकेल. सर्वसामान्य माणूस येथ पर्यंत येऊ शकेल काय? केवळ एक दुरूस्ती करण्याकरिता मंत्रालयातून साधे पत्र येऊ नये ही अवस्था असेल तर शासनाच्या कामकाजाबाबत आता संशय निर्माण झाला आहे. हे काम ताबडतोब पत्र देऊनच करावयाचे आहे. यासाठी जास्त वेळ न घालविता ताबडतोब निर्णय घ्यावा अशी माझी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून विनंती आहे.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिहवन राज्य मंत्री) : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व्हे क्र.422,423,365,366 मधील जागा एस.टी.महामंडळासाठी आरक्षित करण्यात आली होती. परंतु, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मागणी केल्यानंतर नगरपालिकेने सदर जागेचे आरक्षण निवासी वापरा संबंधीचा प्रस्ताव तयार केला. त्याप्रमाणे दिनांक 3.2.2012 रोजी आमच्या एम.डी.कडून प्रधान सचिव, गृह (परिवहन) यांना पत्र दिले आहे की, ह्या जागेची आम्हाला आवश्यकता नाही. सदर जागा रहिवासी उपयोगा करिता देण्यास हरकत नाही. आता हे पत्र आमच्या विभागाच्या सचिवांकडे आले आहे. एक महिन्याच्या आत संबंधित विभागाला आमच्याकडून एनओसी दिली जाईल. त्यामुळे आता काही प्रश्न शिल्लक राहिलेला नाही. आमचीही कुठे अडचण नाही. यामध्ये थोडा कालावधी गेला असे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले आहे. 13 जुलै रोजी आम्हाला पत्र दिले होते. त्या अनुषंगानेच परिवहन सचिवाकडे एनओसी दिलेली आहे. एक महिन्याच्या आत जागे संबंधातील एनओसी देऊन हा प्रश्न संपणार आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आपला प्रश्न निकाली लागला आहे.

.....

<u>अर्धा तास चर्चा क्रमांक 6 बाबत</u>

तालिका सभापती : अर्धा तास चर्चा क्र.6 संबंधी माननीय उप मुख्य मंत्र्यांनी पत्र दिल्यामुळे ती पुढे ढकलण्यात आली आहे. माननीय राज्य मंत्र्यांनी विनंती केल्यामुळे मी आता अर्धा तास चर्चा क्र.8 घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपली अर्धा तास चर्चा मांडावी.

.....

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित व अंशत: अनुदानित व अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर होत असलेला अन्याय

मु.शी.: राज्यातील विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित व अंशत: अनुदानित व अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर होत असलेला अन्याय या संबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील विनाअनुदानित कायम विनाअनुदानित व अंशत: अनुदानित व अनुदानित शाळांना 1981 ची नियमावली (म.खा.शा.कर्म. सेवाशर्ती) लागू असणे, राज्यात दिनांक 13 ऑक्टोबर, 2000 च्या शासन निर्णयानुसार शिक्षण सेवक योजना लागू होणे, विनाअनुदानित अंशत: अनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना शिक्षण सेवक योजना लागू नसणे, विनाअनुदानित शाळेतील शिक्षण खात्याची नियमित वेतनश्रेणीत मान्यता असलेल्या व कायम झालेल्या शिक्षकाने सेवेचा राजीनामा देऊन अनुदानित शाळेत नोकरी स्वीकारल्यास शासन निर्णय दिनांक 13 ऑक्टोबर, 2000 च्या कलम 16(2) नुसार अशा शिक्षकांना शिक्षण सेवक योजना लागू नसणे, मुंबई उच्च न्यायालयाने या संबंधी स्पष्ट निर्देश दिलेले असणे, तथापि, शिक्षण विभागातील अधिकारी अशा कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक योजना लागू करुन शासन आदेशाचे व न्यायालयीन निर्देशाचे उल्लंघन करीत आहे, शिक्षकेतर कर्मचाऱ्याने आपली शैक्षणिक पात्रता वाढवून शिक्षक झाल्यास अशा कर्मचाऱ्यास मानधनाऐवजी नियमित वेतनश्रेणी न देणे, शिक्षकांवर अन्याय होणे, शासनाने दुर्लक्ष केलेले असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया, करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, शासनाने काढलेल्या शासन निर्णयासंबंधी जो काही अर्थ लावला जात आहे त्या संबंधातील ही अर्धा तास चर्चा आहे. या शासनाने आर्थिक टंचाईच्या नावाने एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या राज्यातील सर्व शिक्षक पदांवर नव्याने नियुक्ती करताना शिक्षक सेवक ह्या मानधनावर नियुक्त्या कराव्यात अशा प्रकारचा प्रस्ताव पारित केला. त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयामध्ये सुनावणी झाली. न्यालयालयामध्ये शासनाने जे प्रतिज्ञापत्र सादर केले होते ते मान्य केले आणि त्या आधारे न्यायालयाचा निकाल लागला. त्यानुसार शासनाने शासन निर्णय निर्गमित केला.

यानंतर श्री.सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

तथापि, अनेक ठिक्राणी एखादा शिक्षक राजीनामा देऊन आपली जुनी शाळा सोडतो व नवीन शाळेत नोकरी स्वीकारतो त्यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांच्या स्तरावर त्या शिक्षकाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव जातो त्यावेळी त्या शिक्षकाला मान्यता दिली जात नाही.

सभागृहात काल हा विषय चर्चेला आला होता. शासनाने काढलेल्या आदेशामध्ये म्हटले आहे की, "ज्या शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीमध्ये मान्यता दिली आहे व ज्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन दिले जाते अशा विना अनुदानित शाळा किंवा अंशतः अनुदानित शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक योजना लागू नाही." राज्याची 1981 ची नियमावली आहे ही अनुदानित शाळांना लागू आहे, त्याप्रमाणे विनाअनुदानित शाळांना, कायम विना अनुदानित शाळांना जशीच्या तशी लागू आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांची जी व्याख्या दिली आहे त्यानुसार अनुदानित, विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित शाळेमध्ये असलेल्या शिक्षकांच्या सेवाशर्ती समान आहेत. एखाद्या विना अनुदानित शाळेतील शिक्षकाला नियमित शिक्षक म्हणून मान्यता असते व तो नियमित वेतनश्रेणीमध्ये काम करतो. अशा मान्यताप्राप्त शिक्षकाला अनुदानित शाळेत नोकरी मिळाली तर तो विनाअनुदानित शाळेमध्ये राजीनामा देऊन नवीन नोकरी स्वीकारतो. सभापती महोदय, तो शासनाच्या मान्यतेने विना अनुदानित शाळेत काम करीत होता व तो राजीनामा देऊन अनुदानित शाळेत आला म्हणून त्याला शिक्षण सेवक योजना लागू करणे बरोबर नाही. या संदर्भात शिक्षण अधिकाऱ्यांनी निर्णय घेतला की, त्याला शिक्षण सेवक म्हणूनच नियुक्ती स्वीकारावी लागेल. परंतु शासन निर्णयाच्या कलम 16 मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात प्रकरणे गेल्यानंतर न्यायालयाने आपल्या निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "तो कायम शिक्षक असेल व त्याने राजीनामा देऊन अनुदानित शाळेतील नोकरी स्वीकारली असेल तर त्याला शिक्षण सेवक योजना लागू होणार नाही". मी याकरिता गेल्या तीन वर्षापासून पत्राव्दारे राज्य शासनाकडे विनंती करीत आहे परंतु आतापर्यन्त माझ्या पत्राला शासनाकडून उत्तर दिले गेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. रामनाथ मोते.

सभापती महोदय, मी अलीकडे शिक्षण विभागाच्या सचिवांना 14 जानेवारी रोजी एक पत्र लिहिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, न्यायालयाचे आदेश असतांना आपण त्या आदेशाची अंमलबजावणी कां करीत नाही? आपण या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये जाऊन उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले आहे काय, नसेल तर आपल्याला उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य करावा लागेल असे मी त्यांना विचारले आहे. न्यायालयाच्या निर्णयामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, एखाद्या मान्यता असलेल्या शिक्षकाने राजीनामा देऊन दुसऱ्या अनुदानित शाळेमध्ये नोकरी स्वीकारली असेल तर तो शिक्षक अनुदानित, विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित शाळेत नोकरीवर असला तरी त्याला 100 टक्के अनुदानित शाळेत वेतनश्रेणीवर नोकरी मिळाली पाहिजे त्याला 100 टक्के अनुदानावरील शिक्षण सेवक योजना लागू होणार नाही. त्यामुळे या बाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांनी, लेखाधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय चुकीचा आहे. या अनुषंगाने राज्यामध्ये जिल्हा स्तरावर उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. ती अंमलबजावणी केली जात नसल्यामुळे उच्च न्यायालयाने 16 व्या कलमाचे इंटरप्रिटेंशन केले आहे. त्यानुसार आपण आदेश काढणार काय, हा माझा पहिला प्रश्न आहे?

दुसरा प्रश्न असा की, या राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी हे चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून काम करीत आहेत, सफाई कामगार म्हणून झाडू मारण्याचे काम करीत आहेत, लॅब असिस्टंट म्हणून काम करीत आहेत, लिपिक म्हणून काम करीत आहेत परंतु त्यांच्यामध्ये शिकण्याची जिद्द आहे. त्यामुळे एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर जे बाहेरुन परीक्षा देऊन पदवीधर होतात, बी.एड. पूर्ण् करतात अशा कर्मचाऱ्यांनी शिक्षणाची अर्हता धारण केली असेल, शासनाच्या सर्व नियमांचे पालन केले असेल, त्यामध्ये रोस्टरची कोणतीही अडचण येत नसेल तर त्या कर्मचाऱ्याला वेतनश्रेणीमध्ये नियुक्त केले पाहिजे. त्या कर्मचाऱ्याची नियुक्ती त्या पदावर रोस्टरनुसार झाली असेल आणि 8 वर्षे, 10 वर्षे किंवा 15 वर्षे शिक्षकेतर कर्मचारी म्हणून त्याने काम केले असले तरी दुसऱ्या शाळेत शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतरही त्याला तीन वर्षे मानधनावर काम करावे लागेल. याचा अर्थ असा की, आज तो चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून 17 हजार रुपये पगार घेत असेल तर त्या कर्मचाऱ्याने नवीन नोकरी स्वीकारतांना तीन किंवा चार हजार रुपये मानधनावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. रामनाथ मोते....

तीन-तीन वर्षे शिक्षण सेवक म्हणून काम करणे बरोबर नाही. वेतनश्रेणीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला आपण पुन्हा मानधनावर काम करावयास लावत आहात हे बरोबर नाही. सभापती महोदय, या राज्यामध्ये या लोकांची संख्या किती आहे? तीन वर्षापूर्वी माननीय प्रा. वसंत पुरके हे शालेय शिक्षण मंत्री असतांना ही संख्या 13 होती, आता ती जास्तीत जास्त 20 किंवा 25 पर्यन्त गेली असेल. अशाप्रकारे या कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक योजना लागू न करता त्यांना शासनाने प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. ते नियमित वेतनश्रेणीमध्ये काम करीत असल्यामुळे शासनावरही आर्थिक बोजा पडणार नाही. एखादा शिक्षकेतर कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये शिक्षक झाला व त्यामुळे रिक्त होणाऱ्या पदावर नियुक्त होणारा कर्मचारी वेतनश्रेणीमध्ये येणार नाही, तो शिक्षकेतर कर्मचारी मानधनावरच येणार आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना मानधन न देता वेतनश्रेणी देण्याची आवश्यकता आहे.

या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत की, अनुदानित, विना अनुदानित किंवा कायम विना अनुदानित शाळेतून मान्यताप्राप्त शिक्षकांनी नोकरीचा राजीनामा देऊन अन्य अनुदानित शाळेमध्ये नव्याने नोकरी स्वीकारली तर त्याला शिक्षण सेवक योजना लागू न करता उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणार काय? दुसरा प्रश्न असा की, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपली अर्हता वाढविल्यानंतर त्याला शिक्षण सेवक म्हणून मानधनावर नियुक्ती न देता नियमित वेतनश्रेणीमध्ये मान्यता देणार काय? या बाबतीत शासनाने नियम आणि मानवता या दोन गोष्टींचा विचार करुन चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने न्याय द्यावा अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, राज्यामध्ये दिनांक 13 ऑक्टोबर 2000 पासून शिक्षण सेवक योजना लागू करण्यात आली. या योजनेमध्ये तीन वर्षानंतर शिक्षण सेवक पदावर काम करणारा कर्मचारी नियमित शिक्षक होतो. शासनाने नुकतीच शिक्षण सेवकाच्या मानधनामध्ये भरीव अशाप्रकारची वाढ केली आहे. दिनांक 26 एप्रिल, 2006 च्या शासन निर्णयानुसार शिक्षण सेवक योजना फक्त 100 टक्के अनुदानित शाळांसाठी लागू असून विना अनुदानित किंवा अंशत: अनुदानित शाळांना ही योजना लागू नाही. शिक्षण सेवक योजनेचा लाभ ज्या संवर्गाना मिळत नाही त्यांचा सुध्दा शासनाने 2 ऑक्टोबर 2000 च्या शासन निर्णयामध्ये उल्लेख केला आहे. जे शिक्षक घडयाळी तासावर काम करतात त्यांना ही योजना लागू नाही, जे अतिरिक्त शिक्षक ठरले आहेत त्यांनाही योजना लागू नाही. यापूर्वी जर दुसऱ्या अनुदानित शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करीत असेल व त्याने राजीनामा देऊन 100 टक्के अनुदानित शाळेमध्ये नोकरी स्वीकारली तर त्याला सुध्दा शिक्षण सेवक योजना लागू नाही. अशाप्रकारची तरतूद शासनाच्या जी.आर. मध्ये आहे. तशाप्रकारे 14 ऑक्टोबर 2010 रोजी शासनाने निर्णय घेतला आहे. एक महिन्याच्या आत ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन त्यांना नियमित शिक्षक करावे. जर एक महिन्याच्या आत ही प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर त्यांना नियमित शिक्षक म्हणून सर्व लाभ अनुज्ञेय राहतील.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत मी सांगू इच्छिते की, 15 सप्टेंबर 2011 च्या शासन निर्णयानुसार ज्या अनुदानित संस्थांमधील शिक्षकांनी नोकरीसाठी अर्ज केल्यानंतर ते नवीन नोकरीवर नियुक्त होतांना ते नियमित शिक्षक म्हणून नियुक्त होतील, जर विनाअनुदानित शाळेमध्ये राजीनामा देऊन त्यांनी नवीन नोकरी स्वीकारली तर ते नियमित होणार नाहीत अशाप्रकारची त्यामध्ये तरतूद आहे. परंतु नैसर्गिक न्यायाला धरुन व आजची परिस्थिती बघितली तर आपण शासन निर्णयामध्ये "कायम" हा शब्द घातला आहे. आज ज्या शाळा विनाअनुदानित आहेत व उद्या अनुदानित होणार आहेत त्या बाबतीत अभ्यास करण्याची शासनाची तयारी आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

कायम विना अनुदानित शाळांना हे लागू होणार नाही. पण विना अनुदानित शाळा या अनुदानित होणारच आहेत तर नवीन परिस्थितीमध्ये याचे काय इम्प्लीकेशन आहे याबाबतीत शासनाकडून अभ्यास करता येईल. न्यायालयाचे जे आदेश आहेत किंवा जो निकाल आहे तो व्यक्तीगत स्वरुपामध्ये दिलेला असल्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाच्या माध्यमातून योग्य ती कारवाई करण्यात येते. तसेच सन्माननीय सदस्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला आहे. शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षक हे दोन वेगवेगळे संवर्ग आहेत. त्यामुळे एका संवर्गातून दुसऱ्या संवर्गामध्ये येणे हे काही शक्य नाही. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक योजना हीच लागू रहाणार आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा एकच स्पेसिफीक प्रश्न आहे की, सन्माननीय मंत्री महोदयांनी माझा मुद्दा बाजूला ठेवला आहे. माझा विषय असा होता की, 13 ऑक्टोबर 2000 रोजीचा जो शासन निर्णय आहे, त्यातील 16 व्या कलमाचा अर्थ न्यायालयाने सांगितलेला आहे. उलट न्यायालयाने निकाल दिलेला असून या संदर्भात कायद्याचा अर्थ स्पष्ट केलेला आहे आणि तो सर्व अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. जे अधिकारी याचे पालन करीत नसतील त्यांच्यावर शिक्षण सचिवांनी शिस्तभंगाची कारवाई करावी अशा प्रकारचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. मी जास्त खोलामध्ये जात नाही. कारण माननीय मंत्री महोदयांनी गोल-गोल उत्तर दिलेले आहे. माझा याबाबतीत स्पेसिफीक प्रश्न आहे. न्यायालयाने याचिका क्रमांक 8277 of 2006 शेख अल्लान रफीउद्दीन यांच्या संदर्भात 5 जून 2007 रोजी निर्णय दिलेला आहे, त्याची आपण अंमलबजावणी करणार आहात काय किंवा या निर्णयाला आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान देणार आहात काय? याबाबतीत वैयक्तिक स्वरुपामध्ये निर्णय दिलेला असला तरी नवगण एज्युकेशन सोसायटीच्या बाबतीत न्यायालयाने निर्णय दिला. ज्यावेळेस आम्ही एखाद्या निर्णयाच्या माध्यमातून कायद्याचा अर्थ स्पष्ट करतो तेव्हा तो सर्वांना लागू आहे. त्या साठी प्रत्येकाला न्यायालयामध्ये जाण्याची आवश्यकता नाही. म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची आपण अंमलबजावणी करणार आहात किंवा नाही याबाबत मला स्पष्ट उत्तर हवे आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जर न्यायालयाने व्यक्तिगत स्वरुपाचा निकाल दिला असेल तर त्याबाबत योग्य कारवाई होईल. पण सन्माननीय सदस्य याठिकाणी जे सांगत आहेत त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, याविषयी सर्वंकष अभ्यास होणे गरजेचे आहे आणि त्याप्रमाणे शासन करील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की,आपण हे किती दिवसामध्ये करणार आहात ? कारण आम्ही तीन वर्षापासून भांडत आहोत. याबाबतीत पत्र पाठविल्यानंतर सुध्दा सहा-सहा महिने उत्तर मिळत नाही. आमदारांच्या पत्रांना उत्तर मिळत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे 15 दिवसामध्ये किंवा 1 महिन्यामध्ये किंवा 2 महिन्यामध्ये याबाबत अंतिम निकाल घेऊ असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याबाबतीत अभ्यास करण्यात येईल एवढेच मी सांगू इच्छिते. परंतु मला याबाबत निश्चित कालावधी सांगता येणार नाही.

. . . .ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आता 2012 हे वर्ष सुरु झाले असून याबाबत अभ्यास करण्यासाठी पाच वर्षे लागतात काय असा मुद्दा आहे.

---

2 ई-4 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातून गेल कंपनीची

गॅस पाईपलाईन जात असताना या बाधिक प्रकल्प-
ग्रस्तांनी केलेली तक्रार

मु.शी.: दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातून गेल कंपनीची गॅस पाईपलाईन जात असताना या बाधिक प्रकल्प-ग्रस्तांनी केलेली तक्रार या विषयावरील श्री.परशुराम उपरकर,वि.प.स.यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 22804 ला दिनांक 23 डिसेंबर 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.यांनी यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, "दोडामार्ग (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातून गेल कंपनीची गॅस पाईपलाईन जात असताना या बाधिक प्रकल्पग्रस्तांनी केलेली तक्रार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 22804 ला दिनांक 23 डिसेंबर 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सावंतवाडी येथील दोडामार्ग तालुक्यामध्ये गेल कंपनीची गॅस पाईपलाईन टाकण्यावरुन लोकांमध्ये उद्रेक निर्माण झालेला आहे. तेथे सातत्याने पोलीस केसेस होत आहेत आणि त्याठिकाणी लोकांची आंदोलने देखील होत आहेत. अशा परिस्थितीमध्ये गोव्यातून कर्नाटकमध्ये गेल कंपनीची पाईप लाईन टाकावयाची असल्याने ती महाराष्ट्रातील दोडामार्ग तालुक्यातून नेण्यात येत आहे. ही पाईप लाईन टाकत असताना 1962 च्या पेट्रोलिअम कायद्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, त्याठिकाणी 1 कि.मी.च्या अंतरामध्ये वस्ती असू नये आणि असे असतानाही तेथील 15 गावातील लोकवस्तीतून ही पाईप लाईन टाकण्यात येत आहे. ज्याप्रमाणे भोपाळ येथे दुर्घटना घडली, त्याप्रमाणे भविष्यात येथे अशी घटना घडण्याची शक्यता असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. म्हणूनच तेथील लोक याला विरोध करीत आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी सदरहू प्रकल्पासाठी जवळजवळ 1487 वन हेक्टर जमीन वनसंज्ञेमध्ये आहे. 5836 हेक्टर जमीन ही राखीव वनातील आहे आणि त्यामध्ये जवळजवळ 3568

श्री.परशुराम उपरकर . . ..

वन क्षेत्रातील झाडे तोडण्यात आली आहेत, 7059 झाडे ही खाजगी वनातील तोडण्यात आली असून अशा प्रकारे जवळजवळ 10,672 झाडे तोडण्यात आली आहेत. यासाठी त्यांनी केंद्रीय पर्यावरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विभागाची परवानगी घेतलेली आहे काय ? हा माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे. जर केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी दिली असेल तर त्याठिकाणी गाडगीळ समितीच्या अहवालाचा विचार केलेला आहे काय? कारण 10 एप्रिल रोजी झोळंबेच्या बाबतीत जनहित याचिकेची सुनावणी झाली तेव्हा न्यायालयाने अशा प्रकारचे आदेश दिले की, या तालुक्यातील कोणत्याही झाडांची तोड होता कामा नये. अशा वेळी सदरहू कंपनीने मोठ्या प्रमाणात जी झाड तोड केलेली आहे, त्याबाबतीत आपण कारवाई करणार आहात काय? तसेच याठिकाणी पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून झाडांची तोड होऊ नये आणि तेथील पर्यावरण बिघडविणारे प्रकल्प येऊ नये अशा प्रकारचा उच्च न्यायालयाचा निकाल आलेला आहे.या सर्व निकालाचा विचार करुन जर सर्व परवानगी दिली असेल तर येथील एका फॉरेस्ट अधिकाऱ्यांनी दिनांक 25-11-2011 रोजी पत्र दिले आहे, त्यामध्ये 14 क्रमांकाची अट आहे त्यानुसार जर खरोखरच ही पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगी मिळणार असेल तर त्या अनुषंगाने जर फॉरेस्ट विभागातील कर्मचाऱ्यांना कनेक्शन देण्याबाबत अट घालण्यात आली असेल तर त्या भागातील ग्रामस्थांना देखील अशा प्रकारे
गॅस कनेक्शन दिली जातील काय ? तसेच मुख्य म्हणजे याबाबतीत पर्यावरण विभागाची परवानगी घेतली आहे काय? तसेच परवा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्या भागामध्ये जी झाडतोड केलेली आहे त्याबाबत पर्यावरण विभाग काही कारवाई करणार आहे काय? लोकवस्तीच्या 15 गावातून पाईप लाईन जात आहे त्याची दिशा बदलून ज्याठिकाणी लोकवस्ती नाही अशा भागातून पाईप लाईन टाकण्याच्या दृष्टीने शासन निर्देश देणार आहे काय?

. . . .ई-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली आणि मी देखील ब्रिफींगच्या वेळेस संपूर्ण माहिती घेतली आहे. त्यानुसार आता मे महिन्याच्या अखेरपर्यंत सदरहू काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. सन्माननीय सदस्यांनी जे दोन-तीन प्रश्न विचारलेले आहेत, त्याबाबत आपल्यालाही माहिती आहे की, गेल कंपनीच्या माध्यमातून

गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु आहे आणि गेल ही खाजगी कंपनी नाही तर ही केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेली कंपनी आहे. त्यानुसार कायद्यामध्ये जी तरतूद आहे म्हणजे सेक्शन 3 (1) आणि 6 (1) प्रमाणे पहिल्यांदा ते इन्टेन्ड टू राईट देऊ शकतात आणि मग राईट टू युज देऊ शकतात आणि अशा प्रकारे काम सुरु करण्याची त्यांना मुभा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 1962 च्या कायद्यातंर्गत हायली डेन्सिटी पॉप्युलेशन असलेल्या ठिकाणी गॅस पाईप लाईन टाकू नये.परंतु मी याबाबतीत निश्चितपणे माहिती घेईन.पण माझ्याकडे जी प्राथमिक माहिती आहे त्यानुसार कायद्यामध्ये अशी कोणतीही तरतूद नाही की तुम्ही लोकवस्तीमधून पाईप लाईन टाकू शकत नाही. एवढेच आहे की, लोकवस्तीतून पाईप लाईन टाकत असताना तुम्ही किती जाडीची पाईप लाईन टाकत आहात अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केला जातो. म्हणून पॉप्युलेशन बेसमध्ये असे करावयाचे की करावयाचे नाही यादृष्टीकोनातून एक चर्चा होऊ शकते.त्याबाबतीत देखील राज्य सरकार निश्चितपणे खुलासा करण्याचा प्रयत्न आपल्या चर्चेच्या माध्यमातून करील.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितले की,लोकवस्तीतून पाईप लाईन टाकण्याबाबत मोठ्या प्रमाणात विरोध झालेला आहे आणि हे स्वाभाविक आहे.कारण कोणतीही पाईप लाईन माझ्या शेतातून किंवा माझ्या घरासमोरुन जाऊ नये अशी सर्वसामान्य लोकांची इच्छा असते. परंतु हा लार्जर इंटरेस्टचा विषय आहे.कारण पुढच्या काळामध्ये गेल कंपनीची पाईप लाईन आपल्या राज्यातून, गोव्यामधून कर्नाटक राज्यामध्ये जाणार असली तरी देखील पुढच्या काळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये आपल्याला इंडस्ट्री बेसकरता जी गॅस लाईन नॅचरल रिर्सोसेसमधून मिळणार आहे त्याचा या राज्यालाही मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. म्हणून ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, यासाठी संबंधितांनी पर्यावरण विभागाची परवानगी घेतलेली आहे काय? असा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. याबाबत सांगावयाचे तर त्यांनी निश्चितपणे पर्यावरण विभागाची परवानगी घेतलेली आहे. पर्यावरण विभागाची परवानगी न घेता जर एखादे काम ठराविक एरियामध्ये घेतले असेल, मग याठिकाणी सांगितल्याप्रमाणे फॉरेस्टमधील झाडे तोडून

श्री.सचिन अहिर . . ..

अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले तर निश्चितपणे यासंबंधात दखल घेऊन गेल कंपनीला किंबहुना केंद्र शासनाला सुध्दा ज्या काही सूचना द्यावयाच्या असतील तर त्या देण्यास आम्ही निश्चितपणे तयार आहोत. तसेच मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पुढच्या काळामध्ये असे प्रकल्प येऊ नयेत. परंतु हा काही प्रकल्प नाही. याठिकाणी गॅस पाईप लाईन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टाकण्यात येत आहे आणि त्याला बेस करुन पुढचा प्रकल्प होत आहे अशातलाही भाग नाही. म्हणून केंद्र शासनाने गाडगीळ समिती नेमण्याचे काम केलेले आहे त्याचा यावर कुठे प्रभाव पडेल अशातली ही बाब नाही. कारण आपण याला कुठेही इंडस्ट्री बेस देत नाही, फक्त पाईप लाईन टाकण्यासाठी फक्त पास-थ्रू देण्याची भूमिका आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

गाडगीळ समितीचे फार मोठ्या प्रमाणावर डिबेट झालेले असून त्या समितीने काही शिफारशी सुचविलेल्या आहेत. या शिफारशी राज्य शासनाकडे तसेच पर्यावरण विभागाकडे आलेल्या आहेत. या शिफारशी स्वीकारावयाच्या की नाहीत या बाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकारला निर्णय घ्यावयाचा आहे. कारण त्या समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारल्यास डेव्हलपमेंट होईल किंवा कसे असा प्रश्न आहे. जर शिफारशी स्वीकारल्या नाहीत तर पर्यावरणावर देखील परिणाम होऊ शकतो. तेव्हा या सर्व गोष्टींचा आपणास विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय, 15 गावांतून ही गॅस पाईप लाईन जाते. हे काम पूर्णत्वाला आलेले असून मे अखेरपर्यंत ते काम पूर्ण होईल. तेथील लोकांना त्यांची देणी मिळाली नसतील तर त्या बाबत राज्य शासन निश्चितपणे लक्ष घालेल. माझ्या माहिती प्रमाणे आतापर्यंत 13 गावांचे पंचनामे झाले असून 9 गावांचे ॲवॉर्ड होऊन आतापर्यंत 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी त्यांनी स्वीकारलेला आहे. लोकांनी संमतीपत्र देऊन निधी स्वीकारलेला आहे म्हणजे अप्रत्यक्षरित्या त्यांची मान्यता असावी असा आपणास निष्कर्ष काढता येईल.

सभापती महोदय, या पुढील काळात अशा प्रकारचे प्रकल्प घेताना ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे तेथून पाईन लाईन न घेता बायपास करुन घेण्यात यावी अशी विनंती राज्य सरकारमार्फत करण्यात येईल. परंतु अपरिहार्य असेल तर आपणास काही करता येणार नाही.

सभापती महोदय, ही गॅस पाईप लाईन छोटी नसते. तिचा आकार 24 इंचापेक्षा जास्त असतो. शिवाय एक-दोन फुटापेक्षा जास्त खोल खोदून पाईप लाईन टाकण्यात येते. मी अगोदर सांगितल्या प्रमाणे मे अखेर पर्यंत या गॅस पाईप लाईनचे काम होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याची दखल शासन निश्चितपणे घेईल. मी याठिकाणी एक गोष्ट नमूद करु इच्छितो की, कोणतीही योजना घेताना त्याचा फायदा राज्याला आणि जिल्ह्यांना होत असतो.

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना गॅस पाईप लाईनचे कनेक्शन देण्यात आले तर मग ग्रामस्थांना का देण्यात येत नाही. या संदर्भातील माहिती आता माझ या जवळ उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांना ती लेखी कळविण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने त्या तालुक्यातील कोणतीही झाडे तोडू नयेत असा निर्णय दिलेला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शासन करणार काय ? जर तेथील झाडे तोडायची असतील तर शासन तशी परवानगी घेणार का ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, होय.

<u>अर्धातास चर्चा क्रमांक 2 बाबत</u>

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझी दोन क्रमांकावर अर्धातास चर्चेची सूचना आहे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी आपले नाव पुकारले होते. परंतु त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित नव्हता.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.53 ते 11.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावांच्या दोन सूचना आलेल्या आहेत. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सूचनेतील विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो हे दोन-दोन मिनिटांत मांडण्याची संधी सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

चंद्रपूर औष्णिक वीज प्रकल्पातून निघणाऱ्या फ्लाय ॲशमुळे शेतकऱ्यांचे पीकक्षेत्र नष्ट होत असल्याबाबत

(१) * २६३०० श्री.जैनुद्दीन जव्हेरी , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती अलका देसाई , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा हा दरवर्षी तापमानाचा उच्चांक गाठणारा असतांनाही २७ औष्णिक वीज प्रकल्पातून रोज निघणाऱ्या हजारो टन फ्लाय ॲशचीही त्यात भर पडत असल्यामुळे सुमारे १८ हजार हेक्टर पीकक्षेत्र नष्ट होत असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीकक्षेत्रास होत असलेले नुकसान थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, औष्णिक वीज प्रकल्प मग ते चंद्रपूरमधील असतील किंवा नाशिकचा एकलहरे येथील प्रकल्प असेल, त्या ठिकाणी कोळसा जाळल्यानंतर जी राख हवेमध्ये उडते त्यातील काही राख हवेमध्ये निघून जाते परंतु काही राख जी जमिनीवर पडते त्यातून शेतीचे 100 टक्के नुकसान होते अशी परिस्थिती आहे. ही राख शेतीमध्ये मिसळल्यानंतर शेतीचे जे नुकसान होते ते वाचविण्याकरिता शासनाने काही विशेष प्रयत्न सुरु केले आहेत का ? राखेपासून वेगळे बायप्रॉडक्ट तयार करण्याच्या दृष्टीकोनातून नवीन उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती प्रकल्प आहेत आणि त्या ठिकाणी कोळशापासून वीज निर्मिती केली जाते. त्या ठिकाणी राज्य सरकारच्या मालकीचे म्हणजे महानिर्मितीचे प्रकल्प आहेत तसेच खाजगी उद्योगपतींचे सुध्दा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर आहेत. माझे स्वत:चे देखील थोडेसे असे मत होते की, या प्रकल्पामधून जी काही राख निघते त्यातून तेथील वातावरणामध्ये प्रदूषण वाढण्याकरिता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मदत होते. परंतु आपल्याला आठवत असेल की, मधल्या काळामध्ये ज्यावेळी इरई धरणाचे पाणी आटले, पाणी कमी झाले आणि चंद्रपूर शहराला पिण्यासाठी पाणी मिळणार नाही म्हणून आम्ही तेथील सर्व प्लांट बंद केले. चंद्रपूरचे जे सात संच आहेत ते माहे एप्रिल, 2010 ते जून, 2010 या कालावधीमध्ये पाण्याच्या अभावामुळे बंद ठेवण्यात आले होते. आमचा असा अंदाज होता की, त्या दोन महिन्याच्या काळामध्ये प्लांट बंद असल्यामुळे तेथील एकंदरीत वातावरण चांगले असावयास पाहिजे होते. परंतु त्या विद्युत केंद्राच्या परिसरातील हवेचे प्रदूषण कमी करणाऱ्या घटकांचे प्रमाण हे औष्णिक विद्युत केंद्र कार्यान्वित असतानाच्याच प्रमाणात होते. म्हणजे हे प्रकल्प ज्यावेळी चालू असतात त्यावेळी त्या ठिकाणी हवेतील प्रदूषण जेवढे असते तेवढेच प्रदूषण हे प्लांट बंद असताना देखील होते. त्यामुळे आमचे असे मत झाले आहे की, चंद्रपूर महाऔष्णिक केंद्रामुळेच चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषण होते हे म्हणणे सयुक्तिक नाही. त्या संदर्भात हे दोन महिन्याचे उदाहरण मी देऊ इच्छितो.

सभापती महोदय, तरी देखील अलीकडच्या काळामध्ये काही नवीन टेक्निक डेव्हलप झाल्यानंतर एक गोष्ट लक्षात आलेली आहे की, आता ही राख सिमेंट प्लांट देखील सिमेंट तयार करण्याकरिता काही प्रमाणामध्ये वापरतात. आपला घाटघरचा जो प्रकल्प आहे त्या ठिकाणी धरण बांधण्याकरिता देखील या राखेचा उपयोग करण्यात आला. चीन आणि इतर देशामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर अशा पध्दतीचे काम चालते. ही राख जर शेतकऱ्यांना पाहिजे असेल तर आम्ही शेतकऱ्यांना सुध्दा घेऊन जाण्यास सांगतो. वीट भट्टीकरिता राख घेऊन जातात. काही लोक सिमेंट प्लांटकरिता देखील ही राख घेऊन जातात. मधल्या काळामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून आम्ही माहिती मागितली होती की, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी साहेबांनी अशा प्रकारची जी तक्रार केलेली आहे त्याप्रमाणे त्या ठिकाणी पिकांवर परिणाम होतो का ? त्यांचा रिपोर्ट माझ्याकडे आलेला आहे की, अशा पध्दतीने कोठल्याही प्रकारे त्या ठिकाणी पिकांवर परिणाम झालेला नाही. म्हणजे नागभीड उपविभाग, राजूरा उपविभाग, वरोरा उपविभाग तसेच चंद्रपूर उपविभागात देखील या विद्युत प्रकल्पांच्या फ्लाय ॲशमुळे पिकात घट झाल्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिसून आलेले नाही. त्यामध्ये त्यानी भात, गहू, हरभरा अशा प्रकारच्या पिकांची माहिती घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

तरी सुध्दा मधल्या काळामध्ये या वीज केंद्रामुळे कोठल्याही प्रकारचे प्रदूषण होऊ नये याकरिता पर्यावरणाचा व्यवस्थापन आराखडा त्या ठिकाणी तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये उच्चश्रेणीचे ईएसपी आणि उंच धुरांडे, सिवरेज ट्रिटमेंट प्लांट, ॲश बंड वॉटर रिकव्हरी प्लांट, हरित पट्टा विकसीकरण आणि एफ्ल्युएंट ट्रिटमेंट प्लांट अशा पध्दतीच्या काही गोष्टी आपण त्या परिसरामध्ये करीत आहोत. काही ठिकाणी ते केलेले आहे. अशा पध्दतीने त्या ठिकाणी काम चालले आहे. तरी देखील सन्माननीय सदस्य त्या भागातील आहेत. मधल्या काळामध्ये आम्ही त्या परिसरामध्ये कोणकोणत्या घटकांचे मोजमाप केले त्याचा अहवाल देखील माझ्याकडे आहे. 2010-2011 मध्ये महानिर्मितीच्या विद्युत प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या राखेच्या प्रवर्गानुसार होणारा वापर हा शेतीकरिता, वीट भट्टीकरिता, सिमेंटकरिता, जमीन भरावाकरिता या राखेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अशा पध्दतीने त्या राखेची विल्हेवाट लावण्याचा आपण प्रयत्न करतो.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने औष्णिक वीज केंद्रांची अपरिहार्यता राज्यातील विजेच्या गरजेसाठी असली तरी ज्या ठिकाणी हे प्रकल्प उभे राहतात त्या त्या भागातील वातावरण आणि पर्यावरण या दोन्हीची फार मोठी हानी होते. आताच सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्याबद्दल घेतलेली काळजी सविस्तरपणे आपल्याला सांगितली. तरी सुध्दा जे सस्पेंडेड पार्टिकल्स हवेमध्ये राहून जातात ते श्वसनाव्दारे लोकांच्या शरीरात जाऊ शकतात. त्यामुळे या हवेच्या गुणवत्तेसाठी आणि हवा अधिक चांगली होण्यासाठी काही विशेष योजना पर्यावरण खात्याच्या मदतीने जर करता आली तर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ते आवश्यक ठरेल. तशा प्रकारची योजना शासन अंमलात आणील का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, जरुर पर्यावरण विभागाशी चर्चा करुन त्याही बाबतीत विचार केला जाईल. राज्य सरकारचे मत आणि भूमिका हीच आहे की, आपल्या राज्यातील वेगवेगळ्या भागामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात कोळशावर वीज निर्मिती करण्याचे काम केले जात असताना बाकीच्या भागांना मात्र स्वच्छ आणि चांगली वीज मिळते परंतु तेथील लोकांना त्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26300 .... श्री. अजित पवार.....

बऱ्याच अंशी किंमत मोजावी लागते म्हणून त्यांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टीने तेथील पर्यावरण चांगले राहावे यासाठी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी जो काही प्रश्न विचारला त्या अनुषंगाने आम्ही पर्यावरण विभागाशी चर्चा करु. जो काही प्रस्ताव पुढे येईल त्या संदर्भामध्ये महानिर्मिती मदत करण्याची भूमिका घेईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सदर वीज प्रकल्पापासून शेतजमीन किती अंतरावर आहे ? जी फ्लाय ॲश निघते ती परदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर घेतली जाते. जो कोळसा रेल्वेमार्गे चंद्रपूरला जातो त्याच रेल्वेने जर आपण फ्लाय ॲश या ठिकाणी आणण्याची योजना केली तर वाहतुकीच्या दृष्टीने सुध्दा आपल्या वीज कंपनीला फायद्याचे होईल. त्याचा शासन काही विचार करणार आहे का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, बाहेरची एक्स्पोर्ट करणारी जर कोणी व्यक्ती आली तर त्या संदर्भामध्ये आम्ही त्याचा जरुर विचार करु.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26300.... श्री.अजित पवार...

शेवटी कोणी तरी ही राख घेणारा ग्राहक समोर आला पाहिजे. तसा प्रस्ताव आला तर रेल्वे विभागाशी बोलता येईल. ज्याप्रमाणे दूध गोळा करीत असताना दूधाचा टँकर येतो आणि तो रिकामा झाल्यावर बर्फ घेऊन जातो. असे आपण आपल्या भागामध्ये करतो. त्याप्रमाणे याबाबतीत आपल्याला करता येईल. परंतु ही राख घेणारा तेवढा मोठा ग्राहक परदेशामध्ये मिळाला पाहिजे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हा प्रश्न पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या गावामध्ये औष्णिक वीज निर्माण केली जाते. एकदा ते मला भेटले असता त्यांच्या पापणीवर काही तुषार असल्याचे मला दिसून आले होते. मी त्याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी बहुदा ही राख असेल असे मला सांगितले होते. ही राख हवेतून नाकात व तोंडामध्ये जाते. गच्चीवर झोपणाऱ्या व्यक्तींना दम्याचा त्रास असेल तर त्यांनाही या राखेचा दुष्परिणाम भोगावा लागतो. त्यामुळे ही राख शोषून घेणारी यंत्रणा शासन उभी करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, बहुतेक सर्वच प्लान्टवर तशा प्रकारची यंत्रणा उभी केलेली आहे. त्याला डस्ट कॅचर म्हटले जाते. त्याप्रमाणे साखरेच्या बाबतीत सुध्दा केले जाते. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले हे प्राध्यापक आहेत. त्यांच्याकडे यासंबंधी नवीन माहिती असेल तर त्यांनी मला जरुर द्यावी. त्यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, विनायकराव मेटे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांच्याबरोबर चर्चा करावी. तुमच्या चौघांचे एकमत झाल्यावर मला माहिती दिल्यास मी त्याप्रमाणे कार्यवाही करतो.

श्री एस. क्यू. जमा : माननीय सभापति महोदय, यह बहुत ही गंभीर समस्या है. यहां पर माननीय उप मुख्यमंत्री साहब ने कहा कि पर्यावरण से संबंधित रिपोर्ट में बताया गया है कि दो महीने उत्पादन बंद रहने के बाद भी पर्यावरण में फ्लाय एश का कंटेंट उतना ही था. मेरा कहना है कि चंद्रपुर जिला आज भी हिंदुस्तान का सबसे ज्यादा पॉल्युटेड जिला है. इसीलिए वहां पर नये उद्योग लगाने पर पाबंदी है. चंद्रपुर में कोल माइन्स हैं, सिमेंट प्लांट हैं, पेपर मिल है, पावर हाऊस भी है. इन सब उद्योगों की वजह से वहां पर बड़े पैमाने पर फ्लाय एश तथा डस्ट

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जेनरेट होता है. मेरा कहना है कि कोरबा और सिंगरोली जैसे बड़े-बड़े औद्योगिक टाऊन्स में वहां की सरकारों ने एक स्पेशल ऑथिरिटी क्रिएट की है. ऐसा करने से वहां पर पर्यावरण की समस्या भी हल हो सकती है. मेरा प्रश्न है कि क्या हमारी सरकार चंद्रपुर जिले के लिए एक स्पेशल एरिया डॅवलपमेंट ऑथिरिटी बनाएगी, जहां पर सभी विभागों का फंड एक साथ लाकर वहां का समन्वित विकास किया जा सके.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जामा यांनी विस्तृतपणे भूमिका मांडलेली आहे. मी त्याबाबत एवढेच सांगेन की, राज्य सरकारने याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करुन ज्या ज्या ठिकाणी विद्युत प्रकल्प आहेत त्या त्या ठिकाणी प्रत्येक युनिटमागे 5 पैसे अधिक कर आकारावा आणि या माध्यमातून गोळा होणारा पैसा त्या शहराच्या विकासाच्या कामासाठी खर्च करावा अशा प्रकारचा विचार केलेला आहे. या विषयाला मंत्रिमंडळाची मान्यता घेतलेली आहे. त्यासंबंधीचे विधेयक हे अधिवेशन संपण्यापूर्वी मंजूर करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील. त्यामुळे काही कोटी रुपयांचा निधी गोळा होईल. त्यापेक्षा आणखी काही करता येत असेल तर ते करता येईल.

चंद्रपूर शहराला 500 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शासनाने तीन वर्षासाठी 250 कोटी रुपये दिलेले आहेत. त्या शहरात प्रदूषण करणाऱ्या घटकांचे मोजमाप करण्यात आलेले आहे. त्यामध्ये सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, रेसिड्युअल सस्पेंडेड पार्टिकल्स मटेरियल अशाप्रकारच्या वस्तूंचा उल्लेख त्या अहवालात करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने देशातील इतर भागामध्ये अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात वीज तयार करणारे जे प्रकल्प आहेत आणि त्यांनी तेथे जे काही चांगले केले असेल त्याची माहिती घेण्याच्या सूचना मी महाजेनकोला दिलेल्या आहेत. त्याचा विचार करुन आणि शासनासमोर असलेला प्रस्ताव आणि आता सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्या सगळयांचा विचार करुन त्या शहराला प्रदुषणाच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरिता जे काही करणे शक्य असेल ते मनापासून करण्याची शासनाची तयारी आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरकारी सेवेत असलेल्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितता करण्याबाबत

(2) * 26425 श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले , डॉ.सुधीर तांबे , श्री.एम.एम.शेख , श्री.किसनचंद तनवाणी : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सरकारी सेवेत असलेल्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितता शासनाने केली नसल्याचे माहे डिसेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सरकारी सेवेत असलेल्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (1) व (2) सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त झालेल्या माजी सैनिकाची सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक 1.1.2006 रोजी सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्याचा शासन निर्णय दिनांक 15.12.2009 अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. तसेच या शासन निर्णयासंदर्भात स्पष्टीकरणात्मक खुलासा करणारा शासन निर्णय दिनांक 16.8.2011 अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

(3) दिनांक 16.8.2011 च्या शासन निर्णयानुसार माजी सैनिकांच्या नागरी सेवेतील पदाची वेतननिश्चिती संबंधित माजी सैनिक ज्या विभागात / कार्यालयात कार्यरत आहे. त्या विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखामार्फत करण्यात येत आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय जो भूतपूर्व सैनिक महाराष्ट्र सरकार में काम कर रहे हैं, उनके पुनर्वास और पगार से संबंधित निर्णय शासन ने सन् 2006, 2009 और 2011 में लिया है. लेकिन वह निर्धारित वेतन उनको अभी तक भी नहीं मिल रहा है. मेरा स्पेसिफिक प्रश्न है कि महाराष्ट्र में काम करने वाले कितने भूतपूर्व सैनिक हैं और उनको वेतन श्रेणी देने के बारे में, क्या सरकार ने तत्काल कोई निर्णय लिया है ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा साहेबांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि हा प्रश्न थोडासा किचकटही आहे. सैनिकी कर्मचारी सेवानिवृत्त होतात त्यावेळी त्यांचे वय 35 वर्षे इतके असते. माझ्या माहितीप्रमाणे आपणही पाठीमागच्या काळामध्ये माजी सैनिकांचे कल्याण हा विभाग सांभाळला होता. या माजी सैनिकांना कामाची संधी मिळण्यासाठी काही प्रमाणामध्ये आरक्षण ठेवलेले असते. सन्माननीय सदस्य श्री.जमा आणि इतर सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंबंधी मी सांगेन की, राज्य सरकारने दोन वेगवेगळे अध्यादेश काढले होते. याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की,...

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक 1.1.2006 पूर्वी जे सैनिकी सेवेतून निवृत्त झालेल्या सैनिकांची दिनांक 1.1.2006 पूर्वीच पाचव्या वेतन आयोगाच्या श्रेणीत नागरी सेवेमध्ये पुनर्नियुक्ती केली होती. त्यासंबंधी मी दोन उदाहरणे देतो. ती सांगण्यासाठी थोडा अधिक वेळ लागेल. सैनिकी सेवा समाप्तीच्या दिनांकास 5700 इतके मूळ वेतन घेणाऱ्या माजी सैनिकांना असुधारित वेतनश्रेणीच्या पदावर म्हणजे उदा.सहाय्यक या पदावर पुनर्नियुक्ती झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियमन 1982 मधील नियम 162 (बी) नुसार साधारण 5675 + 25 रुपये असे विशेष वेतन गृहित धरुन आणि संबंधित कर्मचाऱ्यांची दि.1.1.2006 रोजी त्याला अनुज्ञेय असलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती करण्यात आली. त्यासाठी 5675 x 186 हा फॅक्टर लागू केला. त्यामुळे त्यांचे 10560 वेतन बॅण्ड झाले आहे. सहाय्यक पदासाठी 4300 असे एकूण मिळून 14660 असे वेतन दिले आहे. त्यामुळे सहाय्यक पदावर काम करणारे कर्मचारी समाधीन आहेत. परंतु शिपाई पदावर सैनिकी सेवा समाप्तीचा दिनांक 1.1.2006 होता त्यावेळी 4400 मूळ वेतन घेणाऱ्या सैनिकांचे वेतन निश्चिती करीत असताना 3200 + 1200 रुपये विशेष वेतन असा फॅक्टर लागू करुन 3200 x 186 याप्रमाणे 5960 असे वेतन केलेले आहे. त्याशिवाय 1300 रुपये अनुज्ञेय धरुन 7260 वेतन दिलेले आहे. त्या माजी सैनिकांचे म्हणणे असे आहे की, 3200 ऐवजी 4400 x 186 यानुसार वेतन निश्चित करण्यात यावे.

एक गोष्ट राज्य सरकारला मान्य आहे की, आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी हे सैनिक काम करीत असतात. वयाच्या महत्वाच्या काळामध्ये ते देशाचे संरक्षण करीत असतात आणि 35 व्या वर्षात सेवानिवृत्त झाल्यानंतर राज्य सरकारच्या कोणत्या तरी विभागामध्ये नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असतात. म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.जमा यांना विनंती करतो की, हा प्रश्न किचकट आहे. त्यांना यासंबंधीची माहिती असेल किंवा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना माहिती असेल तर त्यांची एकत्रित बैठक मी वित्त विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना बरोबर घेईन. काही माजी सैनिकांचे प्रतिनिधी असतील तर त्यांनाही त्या बैठकीला बोलवून घेतले जाईल. विभागाला योग्य वाटले त्याप्रमाणे विभागाने निर्णय घेतलेला आहे. मी ब्रिफिंगच्या वेळी माहिती घेतली होती.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

त्यावेळी या सैनिकांच्या प्रश्नाच्या बाबतीत आणखी खोलात जाण्याची गरज आहे असे वाटले. या माजी सैनिकांच्या वेतन निश्चितीबाबत शासन निश्चितच सहानुभूतीपूर्वक विचार करील. त्यासंबंधीचा एक भाग म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा 30 एप्रिल 2012च्या आत एक बैठक लावून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती : मी काही दिवस माजी सैनिकांचे कल्याण या विभागाचा मंत्री होतो असा उल्लेख माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, राज्य शासनाच्या सेवेमध्ये आपण त्यांच्यासाठी 10 टक्के जागा राखीव ठेवत असतो. राज्यामध्ये जवळ जवळ 4 लाख माजी सैनिकांची संख्या आहे. त्यांचे महत्वाचे दोन प्रश्न आहेत. आपण जेव्हा बैठक घ्याल त्यावेळी त्यांचे हे दोन प्रश्न समजून घेऊन मार्ग काढलात तर अत्यंत चांगले होईल. एक म्हणजे जो माजी सैनिक ग्रॅज्युएट म्हणून सेवेतून बाहेर येतो त्याला असे सांगितले जाते की, तुझे बेसिक ट्रेनिंग झाले की तुला सेवेमध्ये घेतो. अन्य अनेक विभागामध्ये आपण कर्मचा-यांना नोकरीत घेतो आणि त्यांना बेसिक ट्रेनिंग करिता पाठवितो. उदा. एखादा ग्रॅज्युएट असेल तर त्याला डीएडचे शिक्षण घेण्याकरिता पाठवतो, त्या शिक्षकाचे वेतनही त्याला देतो. अशा त-हेने माजी सैनिकांना ग्रामसेवकाच्या ट्रेनिंगसाठी, शिक्षकाच्या ट्रेनिंगसाठी पाठवून त्यांना अनेक विभागामध्ये आपण नोक-या देऊ शकतो अशी परिस्थिती आहे. तेव्हा माझी सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या संदर्भातील बैठक घेत असताना त्याआधी ते आणि मी किंवा अन्य काही सन्माननीय सदस्यांना घेऊन आपण एकत्रितपणे या माजी सैनिकांच्या संदर्भात चर्चा केली तर अत्यंत चांगल्या सूचना या माजी सैनिकांच्या दृष्टीने मी देईन. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी अत्यंत चांगल्या पध्दतीने उत्तर दिलेले आहे. मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

श्री. अजित पवार : राज्य सरकारच्या सेवेत असलेल्या माजी सैनिकांच्या वेतन निश्चितीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांच्या संदर्भातील काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले. या माजी सैनिकांच्या प्रश्नाच्या संदर्भात मी आपली भेट घेतो आणि हा वेतन निश्चितीचा प्रश्न तसेच सभापती महोदय, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनामध्ये मी बैठक लावतो, त्या बैठकीत संबंधित अधिका-यांना बोलावून घेतो, आपण एकत्रितपणे या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा करु. त्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत राज्य शासन मदतीची भूमिका घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लातूर येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर अनेक रुग्णांची दृष्टी गेल्याबाबत

(३) * २५१७४ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.केशवराव मानकर , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , श्री.अरुण गुजराथी , श्रीमती अलका देसाई , श्री.एम.एम.शेख , डॉ.सुधीर तांबे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात करण्यात आलेल्या मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेनंतर पाच रुग्णांना जंतूसंसर्ग झाल्याने रुग्णांची दृष्टी गेल्याची घटना दिनांक ६ जानेवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेत्र विभागात पसरलेली अस्वच्छता आणि वरिष्ठ डॉक्टर आणि कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामुळे सदर प्रकार घडला असल्याची बाबही निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यामध्ये काय आढळून आले आहे, त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषींवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. डी.पी.सावंत, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणाची संचालनालय स्तरावरुन द्विसदस्यीय समिती मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) व (५) चौकशी अहवालानुसार दोषी डॉक्टरांना निलंबित करण्यात आले. त्याचप्रमाणे शस्त्रक्रिया दरम्यान संसर्ग झालेल्या रुग्णांना सर. ज.जी. रुग्णालय, मुंबई येथे शासन खर्चाने अद्यावत उपचार करण्यात आले. या अनुषंगाने दिनांक २०/३/२०१२ रोजी विधानसभेत झालेल्या चर्चेत मा.मुख्यमंत्री महोदयांनी ज्या रुग्णांना पूर्णत: अंधत्व आले त्यांना रु.१ लाख इतके तर ज्या रुग्णांना अंशत: अंधत्व आले त्यांना रु.५० हजार इतके सानुग्रह अनुदान मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्याचे त्याचप्रमाणे या रुग्णांना दृष्टी येण्यासाठी आवश्यक आधुनिक उपचार राज्य शासनामार्फत मोफत करण्याची घोषणा केली आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : दोषी डॉक्टरांना निलंबित करण्यात आलेले आहे, तसेच पूर्ण अंधत्व आलेल्यांना 1 लाख रु. आणि अंशत: अंधत्व आलेल्यांना 50 रु. मदत केल्याचे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. हे असे प्रकार का होतात ? या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये डीन नाही हे खरे आहे काय ? हे डीन दीर्घकालीन रजेवर गेलेले असून ते पुन्हा केव्हा रुजू होतील हे माहीत नाही. तेव्हा तेथे पूर्ण वेळ डीन नेमण्यात येईल काय ? कोटयवधी रुपये खर्च करुन हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय उभे केलेले आहे. मी कालच त्या रुग्णालयामध्ये

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेलो होतो. डायलेसिससाठी 50 रुग्ण तेथे येतात. बाहेर डायलेसिससाठी 10 हजार रुपये खर्च येतो आणि आपल्या शासकीय रुग्णालयामध्ये 200 रु. खर्च येतो. परंतु या रुग्णालयातील डायलेसिस यंत्रणा, सीटी स्कॅन मशिन बंद आहे. या रुग्णालयाच्या बाजूला मार्केट यार्ड आहे. तेथील उंदरांच्या सुळसुळाटामुळे 5 कोटी 35 लाख रु. किंमतीची रुग्णालयातील मशिन्स बंद पडलेल्या आहेत. या मशिन्स केव्हा दुरुस्त करण्यात येतील ?

श्री. डी.पी.सावंत : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये पूर्ण अंधत्व आलेल्यांना 1 लाख रु. आणि अंशत: अंधत्व आलेल्यांना 50 हजार रुपये मदत जाहीर केलेली आहे. ती मदत आम्ही लवकरात लवकर देत आहोत. या विषयावर लक्षवेधीच्या माध्यमातून सविस्तर चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी ती चर्चा उपस्थित केलेली होती. असे प्रकार का होतात असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. आतापर्यन्त महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 7 लाख ऑपरेशन्स झालेली आहेत. फॉल्टचे प्रमाण 0.5 टक्के आहे. चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी देखील असे सांगितलेले आहे की, डब्ल्यूएचओने देखील 0.7 टक्क्यापर्यन्त ऑपरेशन्समधील फॉल्ट ॲक्सेप्ट केलेले आहेत. त्याही पेक्षा हे प्रमाण कमी आहे. पुढच्या काळात असे प्रकार होऊ नयेत म्हणून खबरदारी घेण्याचे प्रयत्न करीत आहोत. तेथील डीन आजारी असल्यामुळे रजेवर आहेत. त्यानंतर श्रीमती डोणगांवकर या देखील वैद्यकीय रजेवर आहेत. त्या लवकरात लवकर सेवेत रुजू होतील. सन्माननीय सदस्यांनी जे अन्य प्रश्न विचारलेले आहेत ते वेगळया स्वरुपाचे प्रश्न आहेत. त्यासाठी त्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. हेमंत टकले : सर्वसाधारणपणे मोतीबिंदू शस्त्रक्रिया देशभर आणि राज्यामध्ये शासकीय आणि निमशासकीय रुग्णालयातून होत असतात. डिस्ट्रिक ब्लाईण्डनेस कंट्रोल प्रोग्रॅमच्या संदर्भात जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते आणि ती समिती या सर्व कामावर देखरेख करीत असते. पूर्ण अंधत्व आलेल्यांना 1 लाख रुपये आणि अंशत: अंधत्व आलेल्यांना 50 हजार रुपये मदत देण्यात आलेली आहे. यामध्ये रिव्हर्सिबल आणि इर्रिव्हसिबल ब्लाईण्डनेस असे प्रकार असतात. रिव्हर्सिबल ब्लाईण्डनेस आलेला असेल तर त्यावर पुन्हा योग्य ते उपचार केल्यानंतर

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुन्हा दृष्टी येऊ शकते. तेव्हा असे जे रुग्ण आहेत त्यांना मुंबईला आणून त्यांच्यावर शस्त्रक्रिया केल्या तर त्यांचे कायमचे अंधत्व रहाणार नाही. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न केलेले आहेत काय ? डॉक्टरांना निलंबित करुन हा प्रश्न सुटणार नाही. एखाद्याची दृष्टी गेली तर त्याचे आयुष्याचे नुकसान होते. तेव्हा त्यादृष्टीने शासन काय करणार आहे ?

श्री. डी.पी.सावंत : मी सांगितले की, एक कमिटी गठीत केलेली आहे. पूर्ण अंधत्व आलेल्या रुग्णांना 1 लाख रु. मदत दिलेली आहे. रिव्हर्सिबल ब्लाईण्डनेस असेल तर त्यांच्यावर पुन्हा शस्त्रक्रिया करुन त्यांना चांगले उपचार देण्याचा शासनाचा निश्चित प्रयत्न राहील.भविष्यामध्ये अशा घटना घडू नयेत म्हणून कमिटी गठीत करण्यात आलेली असून त्या कमिटीच्या मार्फत योग्य ती खबरदारी घेण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : मेडिकल कॅम्पमधून अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया न करता जेथे चांगली इक्विपमेण्टस् आहेत अशा हॉस्पिटलमधून केल्या जातील काय ? मेडिकल कॅम्प ही केवळ जाहिरातबाजी असते म्हणून अशा शस्त्रक्रिया हॉस्पिटलमधून केल्या पाहिजेत. दुसरे असे की, ज्यांना अंधत्व आले त्यांना 1 लाख रु. मदत देऊन हा प्रश्न निकाली लागणार आहे काय ?

श्री. डी.पी.सावंत : ज्यांना अंधत्व आलेले आहे त्यांना 1 लाख रुपये सहानुभूती म्हणून दिलेले आहेत. त्याचे शासन कधीही समर्थन करणार नाही. भविष्यात अशा घटना होऊ नयेत म्हणून शासन योग्य ती खबरदारी घेईल. शस्त्रक्रियेचे कॅम्प हॉस्पिटलमध्येच होतात. हॉस्पिटलमध्येच शस्त्रक्रिया केल्या जातात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, चुकीची नोंद रेकॉर्डवर राहू नये या दृष्टीने मी बोलण्यासाठी उभा आहे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे त्या रुग्णांना पुन्हा जे.जे.रुग्णालयात आणून 15 दिवसात शस्त्रक्रिया झाल्यानंतर अंशत: दिसू लागले. मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना सांगितले की, पुन्हा शस्त्रक्रियेचा प्रयत्न केला जाईल. पुन्हा शस्त्रक्रियेचा प्रयत्न यशस्वी होऊ शकणार नाही. त्यामुळे रेकॉर्ड दुरुस्त केले पाहिजे.

सभापती : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या लातूरच्या वैद्यकीय महाविद्यालयासंबंधी सभागृहात एक लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. खालच्या सभागृहात एक तारांकित प्रश्न देखील चर्चेला आला होता. आज पुन्हा प्रश्नोत्तराच्या निमित्ताने तारांकित प्रश्न चर्चेला आलेला आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न मांडल्यानंतर तेथील गैरकारभार मंत्री महोदयांच्या लक्षात येत असतो. त्यानंतर किमान अपेक्षा ही आहे की, या प्रश्नाचा रोख शासनाने लक्षात घेतला पाहिजे. लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या निमित्ताने शासनाच्या लक्षात आल्यामुळे अंशत: व पूर्णत: दृष्टी गेलेल्या रुग्णांना आर्थिक मदत दिली गेली. पुन्हा चार दिवसांनी तारांकित प्रश्न चर्चेला आल्यानंतर सरकारने या संदर्भात पुढे कोणती पावले उचलली आहेत? तेथील डीन डॉ.डोणगावकर या रजेवर आहेत. लवकरच जॉईन होणार आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. तोपर्यंत कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे? प्रश्न मांडल्यानंतर तात्पुरती उपाययोजना करण्यापेक्षा कायमस्वरुपी कारवाई केली आहे असे मला वाटत नाही.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, नियम 93 अन्वये याच विषयावर सूचना मांडण्यात आली होती. त्यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती आणि आज तारांकित प्रश्न उपस्थित झालेला आहे. सरकारने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. त्या रुग्णांना मुंबईत आणून ट्रिटमेंट दिल्यानंतर काही रुग्णांची दृष्टी परत आली.

श्री.विनोद तावडे : त्या ठिकाणी एक्स-रे मशिन बंद आहे, एम.आर.आय.मशिन बंद आहे त्या बाबत कोणती ठोस उपाययोजना करणार आहात?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, हा प्रश्न डोळयाची दृष्टी गेल्याबद्दलचा आहे. एक्स-रे, एम.आर.आय.मशिनबाबतचा प्रश्न नाही. त्या अनुषंगाने डॉक्टरांबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता.

सभापती : मंत्री महोदय, लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. परंतु लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एम.आर.आय.मशिन, सी.टी.स्कॅन मशिन बंद आहे का असा प्रश्न विचारला गेला आहे. याची माहिती उपलब्ध असेल तर द्यावी, अन्यथा पटलावर ठेवण्यात येईल या दृष्टीने लक्ष द्यावे.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, हा प्रश्न मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या संदर्भात आहे. त्यामुळे एम.आर.आय.मशिनबाबत प्रश्न विचारला असला तरी त्याची माहिती आता उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवतो. रेग्युलर डीन डॉ.डोणगावकर या आजारी असल्यामुळे रजेवर आहेत. त्यांच्या जागी पर्यायी व्यवस्था केली असून ॲनेस्थेटिस्ट विभागाचे प्रोफेसर डॉ.देशपांडे हे डीन म्हणून काम पहात आहेत.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील आश्रशाळातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करणेसाठी करावयाची कार्यवाही

(४) * २५२१२ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन संपूर्ण राज्यात आरोग्यविषयक विविध सवलती देत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील समाज कल्याण विभागाने अनेक आश्रमशाळातील विद्यार्थ्यांची तपासणीच केली नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन राज्यातील आश्रमशाळांची चौकशी करुन व आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य पथक नेमून तपासणी करणार आहे काय,
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्यात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याकरिता शालेय आरोग्य तपासणी पथके स्थापन करण्यात आली आहेत. सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षामध्ये समाजकल्याण विभागामार्फत ग्रामीण भागात चालविण्यात येणाऱ्या एकूण ९२२ आश्रमशाळांपैकी ८९८ शाळांना भेटी देऊन २००१२५ विद्यार्थ्यांची तपासणी फेब्रुवारी, २०१२ पर्यंत केली आहे. त्यापैकी ३४५५६ विद्यार्थ्यांना शाळेतच उपचार करण्यात आले असून गंभीर आजार आढळून आलेल्या १९४८ विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयामध्ये पुढील उपचार करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. २ लाख विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली आहे. जव्हार तालुक्यात ४९६४ विद्यार्थी शिकतात, गेल्या सहा महिन्यात यापैकी एकाही विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी झालेली नाही हे खरे आहे काय? २ लाख विद्यार्थ्यांपैकी १९४८ विद्यार्थ्यांना गंभीर आजार असल्यामुळे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. इतक्या लहान वयामध्ये विद्यार्थ्यांना कोणते गंभीर आजार झाले, त्याची कारणे काय आहेत?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जव्हार तालुक्याबाबत मी माहिती देते. ठाणे तालुक्यात समाजकल्याण विभागांतर्गत एकूण ४ शाळा असून त्या शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली आहे. एकूण ८५९ विद्यार्थ्यांची तपासणी केलेली आहे. स्कूल हेल्थ प्रोग्रॅम अंतर्गत शालेय स्तरावर वैद्यकीय तपासणी होत असते. तपासणीमध्ये विद्यार्थ्याना विविध प्रकारचे आजार असल्याचे आढळून आले. त्या आजाराची तपासणी होते. पुढील उपचार सुध्दा करण्यात

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येतात. जर किरकोळ प्रकारचे आजार असतील तर शाळा स्तरावर आणि त्यापेक्षा गंभीर आजार असतील तर त्यांना ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय किंवा हायर सेंटरमध्ये पाठवून जीवनदायी योजनेंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येते.

श्री.मनिष जैन : आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किती वेळा करण्यात येते आणि या तपासणीचा खर्च कोणाकडून केला जातो?

प्रा.फौजिया खान : आश्रमशाळेचे विद्यार्थी किंवा कोणत्याही शाळेतील विद्यार्थी असले तरी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत त्यांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. या तपासणीसाठी २ वैद्यकीय अधिकारी, २ फार्मासिस्ट आणि मिश्रक यांचे पथक नेमण्यात येते. राज्यात ४२२ पथकांची निर्मिती करण्यात आली असून त्यांच्यामार्फत ही आरोग्य तपासणी केली जाते. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदाच आरोग्य तपासणी होते.

श्री.प्रकाश बिनसाळे : आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत प्रचंड समस्या आहेत. त्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी डॉक्टरांचे पथक जाते. मुंबईमध्ये अनेक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मुंबई शहरातील स्पेशलाईज डॉक्टर आहेत त्यांना या कामासाठी महिन्यातील एक किंवा दोन रविवारी ग्रामीण भागात वैद्यकीय तपासणी करण्यासाठी नेण्यात येते. अशा सामाजिक संस्थांशी सांगड घालून शासन या तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणीचा कार्यक्रम हाती घेणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : स्कूल हेल्थ कार्यक्रम मुंबई महापालिका क्षेत्रात राबविला जात नाही. डॉक्टरांची तयारी असेल तर त्याचा विचार करता येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ९२२ पैकी ८९८ शाळांना भेटी देऊन २ लाख विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. उर्वरित शाळांमधील विद्यार्थ्यांची तपासणी का झाली नाही? या विद्यार्थ्यांना गंभीर आजार असतात, काही विद्यार्थ्यांना जन्मत: हृदयविकाराचे आजार असतात. असा आजार असलेल्या किती विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली?

प्रा.फौजिया खान : समाजकल्याण विभागांतर्गत एकूण ९२२ आश्रमशाळा आहेत. ९८९ शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी फेब्रुवारी, २०१२ पर्यंत करण्यात आली. उर्वरित २४ शाळांपैकी ७ शाळा बंद असल्यामुळे तपासणी झालेली नाही. बंद असलेल्या शाळांमध्ये

प्रा.फौजिया खान..... ता.प्र.क्र.२५२१२....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गोंदियामधील १, लातूरमधील ४, नागपूरमधील १ व सोलापूरमधील एका शाळेचा समावेश आहे. ६ शाळा उच्च माध्यमिक म्हणजे ज्युनिअर कॉलेजच्या आहेत. पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यक्रम शासनाकडून राबविला जातो. ४ शाळा महापालिका क्षेत्रातील आहेत. महापालिकेच्या शाळा नाहीत अशा ७ शाळा आहेत. या शाळांमध्ये मार्च महिन्यात तपासणी झाली असेल. कारण माझ्याकडे जो अहवाल आलेला आहे तो फेब्रुवारी, २०१२ पर्यंतचा आहे. हा कार्यक्रम नियमितपणे राबविला जातो. त्यामुळे आरोग्य तपासणी झालेली असेल. आजार आयडेन्टिफाय झालेले विद्यार्थी ५६२४ असून ३२५९ विद्यार्थ्यांवर सर्जरी झालेली आहे. ३२७ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेची गरज असल्याचे आढळून आले नाही. २०३८ प्रकरणे पेंडिंग आहेत.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय व ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(५) * २५७२७ श्री.विनायकराव मेटे , ॲड. उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची ८२२ पदे मंजूर असतांना सुमारे २८० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त २८० पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त १७ लाख लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यासाठी पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात गट-अ ते गट-ड ची एकूण ८२२ पदे मंजूर असून त्यापैकी २७४ पदे रिक्त आहेत.

(२) जिल्हा रुग्णालय रत्नागिरी व अधिपत्याखालील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथील गट-अ ते गट-ड संवर्गातील पदे ही अस्थाई/ बंधपत्रित नियुक्ती समाप्ती, पदोन्नती, बदली, सेवानिवृत्ती, मृत्यू इ. कारणास्तव रिक्त झालेली आहेत.

(३) गट-अ (वर्ग-१) ची पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबत प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे. राज्यातील वैद्यकीय अधिकारी (गट-अ) ची पदे भरणेकरीता स्वतंत्र निवड मंडळामार्फत निवड प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यात नियुक्तीस प्राधान्यक्रम देणाऱ्या उमेदवारांना अतिरिक्त २० गुण देण्यात येत आहेत. गट-क ची रिक्त पदे भरण्यासाठी एमकेसीएल मार्फत परिक्षा घेण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :25727 .....

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील शासकीय रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयामध्ये 822 पदे मंजूर असतांना त्यापैकी 280 पदे रिक्त आहेत. ही पदे कोणत्या संवर्गाची रिक्त आहेत याची माहिती उत्तरात देण्यात आलेली नाही. जवळपास 40 टक्के पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमुळे आरोग्य सुविधेवर परिणाम झालेला आहे त्यामुळे रत्नागिरी जिल्हयातील शासकीय रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयातील रिक्ते पदे किती कालावधीत भरली जाणार आहेत ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सदर पदे वेगवेगळया कारणांनी रिक्त राहिलेली आहेत. शासकीय पदे ही निवृत्त झाल्यामुळे, मृत्यू झाल्यामुळे, प्रमोशन झाल्यामुळे तसेच बंध पत्राचा कालावधी संपल्यामुळे आणि इतर वेगवेगळया कारणानी पदे रिक्त होत असतात. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात आरोग्य विभागात मोठया प्रमाणात रिक्त पदे आहेत ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणची रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. वर्ग एक ची 298 पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. एमपीएससीने 223 पदांच्या संदर्भात जाहिरात काढलेली आहे. वर्ग 2 ची 1058 पदे भरण्याच्या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण झाली असून 2-3 आठवडयात ही पदे भरली जाणार आहेत. बाकीची पदे भरण्याच्या संदर्भात शासन स्तरावर, संचालकांच्या स्तरावर भरती प्रक्रिया सुरु आहे.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे लोक काम करण्यास उत्सुक नसतात परंतु या ठिकाणी लोकांनी जावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज असून यासंदर्भातील निर्णय शासनाने घेतलेला आहे. एमबीबीएसची भरती ही मेरीट प्रमाणे केली जात असते यामध्ये डॉक्टरांचा इंटरव्हयू घेतला जात नसतो. रत्नागिरी व सिंधुदुर्ग मध्ये जाण्यासाठी जे प्राधान्य देतात त्यांना आपण अधिकचे 20 गुण देत असतो. या अगोदर स्पेशालिस्ट डॉक्टरांची वेगळी भरती प्रक्रिया केली जात नव्हती. त्यामुळे आर.आर.मध्ये बदल करुन स्पेशलिस्ट डॉक्टरांच्या संदर्भातील धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग मध्ये पी.जी. डिप्लोमा झालेले जे डॉक्टर जातील त्यांना 3 इन्क्रीमेंट तसेच पी.जी. डॉक्टरांसाठी 6 इन्क्रीमेंट देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे रत्नागिरी व सिंधुदुर्ग साठी शासनाने अशा प्रकारे प्रोत्साहनात्मक उपाययोजना केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :25727 .....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, गट "क" ची रिक्त पदे भरण्याबाबत एमकेसीएल कडून परीक्षा घेण्यात आलेली आहे असे छापील उत्तरात माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे गट "क" ची किती पदे भरण्यासाठी एमकेसीएलकडून परीक्षा घेण्यात आल्या, ही परीक्षा केव्हा घेण्यात आली व या परीक्षेचा निकाल केव्हा जाहीर केला जाणार आहे ?

प्रा. फौजिया खान : गट "क" ची पदे लवकरच भरली जाणार आहेत.

सभापती : आपल्याकडे यासंदर्भात माहिती नसेल तर सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

प्रा. फौजिया खान : सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यातील ५० आरोग्य केंद्रात शवविच्छेदन गृह उभारण्याबाबत

(६) * २६२५४ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ५० आरोग्य केंद्रापैकी ३५ आरोग्य केंद्रात मृत व्यक्तींचे शवविच्छेदन होत नसल्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना शवविच्छेदनाचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील शवविच्छेदन केंद्र वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता : (१) हे खरे नाही.

(२) बीड जिल्ह्यात ५० प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३५ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असते त्यामुळे किती प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात आलेली आहे, वर्षभरात ३५ प्राथमिक आरोग्य केंद्रात किती शव विच्छेदन करण्यात आले, १५ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्याची व्यवस्था नाही त्या ठिकाणी शवविच्छेदनाची व्यवस्था कधी पर्यंत उपलब्ध करुन दिली जाणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शवविच्छेदनासाठी स्पेशलिस्ट डॉक्टरांची गरज नसते तर कोणताही वैद्यकीय अधिकारी शवविच्छेदन करु शकतो. ३५ प्राथमिक आरोग्य केंद्रात २०१ शवविच्छेदन झालेले आहेत. बीड जिल्हयात ५० प्राथमिक आरोग्य केंद्र असून ४३ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून यातील ३५ ठिकाणी शवविच्छेदनाची व्यवस्था उपलब्ध असून ८ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनाची व्यवस्था अद्यापपावेतो उपलब्ध झालेली नाही. ७ प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरु असून ६ ठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर आहे व १ ठिकाणी जमिनीचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामास सुरुवात होऊ शकली नाही. या सर्व ठिकाणी शवविच्छेदनासाठी कक्ष बांधण्यात येणार आहे. ज्या ८ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी कक्ष नाही त्या ठिकाणी या वर्षाच्या बजेटमधून शवविच्छेदन कक्ष बांधण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर व ग्रामीण रुग्णालय स्तरावर विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(७) * २५८१० श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.केशवराव मानकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागात असलेल्या रुग्णांना एक्स-रे, ई.सी.जी. व रक्तपेढीची सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या व ग्रामीण रुग्णालयाच्या स्तरावर उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने आखली होती व तशी घोषणा गत अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेन्वये राज्यातील किती प्राथमिक आरोग्य केंद्रात व ग्रामीण रुग्णालयात या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या सुविधांचा लाभ आतापर्यंत किती रुग्णांनी घेतला आहे,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत किती प्राथमिक आरोग्य केंद्रांना व ग्रामीण रुग्णालयांना या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत,

(५) असल्यास, प्रलंबित असलेल्या या प्राथमिक आरोग्य केंद्राना व ग्रामीण रुग्णालयांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता : (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या व जिल्हा रुग्णालयांच्या सेवेचा दर्जा वाढ करण्यासाठी रु.२४.०० कोटी सन २०११-१२ मध्ये मंजूर करण्यात आले असून, त्या अनुषंगाने अहमदनगर, सातारा, जालना, अमरावती, रायगड, जळगाव, परभणी, रत्नागिरी, नाशिक, बीड, उस्मानाबाद, भंडारा या जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाच्या दर्जावाढीची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये बाहयरुग्ण विभाग, वॉर्डमधील खाटा, प्रयोगशाळा संवर्धन, डॉक्टरांचे कन्सल्टींग रुममध्ये सुधारणा इ.बाबीचा समावेश आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पॉईन्टेड प्रश्न विचारावा असा आपला आग्रह असतो परंतु आम्ही पॉईन्टेड प्रश्न विचारल्यानंतर विभागाकडून फापट पसारा दिला जातो. मागच्या बजेटमध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले होते की, ग्रामीण भागातील रुग्णांना एक्सरे, इसीजी इत्यादी मशीनची सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर व रक्तपेढीची सुविधा ग्रामीण रुग्णालयाच्या स्तरावर उपलब्ध करुन दिली जाईल. त्यामुळे किती प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरे व इसीजीची मशीनची सुविधा उपलब्ध झाली आहे व रक्तपेढीची सुविधा किती ग्रामीण रुग्णालयाच्या स्तरावर उपलब्ध झालेली आहे असा मी प्रश्न विचारला असून उत्तरामध्ये सर्व जिल्हा केंद्राची माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे किती आरोग्य केंद्रात इसीजी व किती आरोग्य केंद्रात एक्सरे मशीनची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे ? बजेटमध्ये जे जाहीर केले जाते त्याची पूर्तता शासन करीत असते असे शासन सांगत असते. त्यामुळे ज्या आरोग्य केंद्रात इसीजी व एक्सरे मशिन्स उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत त्या ठिकाणी सदर मशिन्स कधी पर्यंत उपलब्ध करुन दिली जाणार आहेत ?

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एक्सरे व इसीजी मशिन्सची सोय ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरे व इसीजी मशीनची सेवा पुरवली जात नाही. ३६७ ग्रामीण रुग्णालयांपैकी २६१ ग्रामीण रुग्णालयात एक्सरे व इसीजी मशीनची सेवा उपलब्ध असून ज्या ग्रामीण रुग्णालयांना एक्सरे व इसीजी मशीनची सोय उपलब्ध नाही त्या ठिकाणी सुध्दा ही सेवा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. सर्व ग्रामीण रुग्णालयात इसीजी मशिन्स पुरविण्याच्या संदर्भात पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात सुध्दा एक्सरे व इसीजी मशीन उपलब्ध करुन द्यावे असा शासनाचा विचार सुरु आहे. सोलापूर जिल्हयातील २२ प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरे मशिन्स उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. सातारा जिल्हयातील १५ प्राथमिक आरोग्य केंद्रात इसीजी मशिन्स उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात ही सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत नियोजन झालेले नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील सिव्हील हॉस्पिटलमध्ये एक्सरे मशीन, इसीजी मशीन किंवा सीटी स्कॅनचे मशीन बंद असून ही मशीनरी चालविण्यासाठी टेक्नीशियन्स सुध्दा नाहीत. या ठिकाणी जे काही डॉक्टर असतात तेच ही मशीनरी चालवतात व त्याचा रिपोर्ट मुंबईला पाठवितात व मेल वरुन परत त्याची माहिती घेतात. एक्सरे मशीन, इसीजी मशीन किंवा सीटी स्कॅन मशिन्स नव्याने देऊ नका परंतु आहे त्या मशिन्स सुरु राहण्यासाठी आवश्यक तो स्टाफ उपलब्ध करुन दिला जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ग्रामीण रूग्णालयासंबंधी मी आताच सांगितले आहे. जेथे मशीन नाहीत तेथे आपण यंदाच्या बजेट मधून मशिन्स घेणार आहोत. मशीन बिघडली किंवा जुनी असेल तर ती दुरूस्त करण्यात येते. काही मशिन्सचा खरोखर खूप कालावधी झालेला आहे. त्यामुळे त्या मशिन्स दुरूस्त करता येत नाही म्हणूनच नवीन मशिन्स देण्याचा विचार करण्यात येत आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, दोन अधिवेशनामध्ये हा प्रश्न मी उपस्थित केला होता. त्यावेळी अशा प्रकारची मशिनरी दुरूस्त करण्यासाठी निधी नाही. त्यामुळे आम्ही बाहेरून अल्प दरामध्ये सेवा देण्याची पद्धत सुरू करणार आहोत. असे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते, हे खरे आहे काय ? सीटी स्कॅनच्या मशीन्स जुन्या झाल्या आहेत. त्या बदलून शासन नवीन घेणार आहे. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा नवीन मशीन देण्यासाठी विचार करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मशीन दुरूस्त नाही ही बाब खरी नाही. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ..... (अडथळा)... माझे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मगच विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी उठावे. माझे उत्तर पूर्ण ऐकण्याच्या आधी आपण उठला तर तो माझ्यावर अन्याय होतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्यांनी सांगावे की, आमच्या खात्याकडून माहिती न घेता माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी घोषणा केली. माननीय राज्य मंत्र्यांनी उगाच पॅनिक होऊ नये. चूक होते हे मान्य आहे. त्यासंबंधी मी बजेटच्या भाषणात उल्लेख केला होता. ग्रामीण रूग्णालयात रक्त पेढी उघडण्यात येईल अशी माननीय मंत्री श्री.अजित पवार यांची घोषणा होती. माझ्याकडे त्यांचे भाषण आहे. प्राध्यापक म्हटले की, समोरच्याचे ऐकायचेच नाही. टोला पडल्यावर वर्गात यायचे टोला पडल्यावर वर्गाच्या बाहेर जायचे आणि टोलवाटोलवी करायचे असे प्रा.शिवाजीराव देशमुख म्हणायचे. आमचा स्पेसिफिक प्रश्न आहे. माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी जे उत्तर दिले होते त्याचा आधार घेऊन सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी प्रश्न विचारला आहे. हे आमच्या मनाचे सांगत नाही. हवे असेल तर मी आता प्रोसिडींग काढून आणतो. मागच्या वेळी माननीय अर्थ मंत्र्यांनी ग्रामीण रूग्णालयात रक्त पेढी देण्या संबंधातील घोषणा केली होती. त्याचे उत्तर द्यायचे राहीले आहे. ते त्यांनी दिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, विरोधी पक्षातील माननीय सदस्य एकाच वेळी उठल्यामुळे मी बोलू शकले नाही. मशीन ना दुरूस्त असल्यामुळे निर्णय घेतला असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्या संबंधी मी उत्तर देत होते. मशीन ना दुरुस्त असल्यामुळे निर्णय घेतलेला नाही. प्रत्येक रूग्णालयामध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये डायग्नोस्टीक सेंटर उघडण्याचे ठरलेले आहे. बीपीएल किंवा दुसरे लाभार्थी असतील त्यांना तेथे मोफत सुविधा देण्यात येईल.

सभापती : या प्रश्ना संबंधी सदनातील सन्माननीय सदस्याच्या अपेक्षा आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र हे मूलत: आरोग्या विषयीचे सर्वात महत्त्वाचे असे युनिट आहे. ते युनिट आपण फुलफ्लेज केले पाहिजे. त्या दृष्टीने सन्माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी आपल्या भाषणात भावना व्यक्त केल्या आहेत की, आरोग्य विभाग खालील पद्धतीने आरोग्य सुविधा निर्माण करेल. आपण म्हणता ते बरोबर आहे. ग्रामीण रूग्णालयामध्ये ह्या सुविधा निर्माण केल्या तरी प्राथमिक आरोग्य केंद्रासंबंधी आपण काही व्यवस्था करू शकणार आहात काय किंवा काही कार्यक्रम हाती घेणार आहात काय या बाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर मग प्रश्नच मिटेल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, घोषणा जरी झाली असली तरी त्याचे नियोजन झालेले नाही. हा खूप मोठा कार्यक्रम आहे. त्या बाबत अभ्यास करून विचार करण्यात येईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद येथील दंत महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहाला सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(8) * 25686 श्री.सतीश चव्हाण , ॲड. उषाताई दराडे , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद येथील दंत महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहात 50 विद्यार्थीनींची प्रवेश क्षमता असताना प्रत्यक्षात तेथे 88 विद्यार्थीनी राहतात, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर वसतीगृहात कोणत्याच सोई सुविधा उपलब्ध नसून विद्यार्थीनींना तेथे नाईलाजाने राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, डेंटल कॉन्सील ऑफ इंडियाच्या (भारतीय दंत चिकित्सा परिषद) मानकानुसार महाविद्यालयाच्या परिसरात वसतीगृह आवश्यक असताना ते 1/2 किमी दूर अंतरावर असून विद्यार्थीनींच्या दृष्टीने असुरक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर दंत महाविद्यालयात 120 मुले व 120 मुलीचे वसतीगृहाचे भूमिपूजन तीन वर्षापूर्वी केले परंतु निधी अभावी तेथे काम सुरु होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, उपरोक्त वसतीगृहासाठी निधी उपलब्ध करुन देऊन काम त्वरित सुरु करण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(6) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.डी.पी.सावंत,डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता: (1) हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

(3) सदर वसतिगृह महाविद्यालयापासून अर्धा कि.मी. दूर आहे तथापि, विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वसतिगृहामध्ये सुरक्षारक्षक नियुक्त केलेल आहेत.

(4) हे खरे नाही.

(5) नवीन वसतिगृह बांधण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही सुरु केली आहे.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

लेखी उत्तर क्रमांक 4 मध्ये "हे खरे नाही" या ऐवजी **"हे खरे आहे"** असे वाचावे.

सभापती : ठीक आहे.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.उषा दराडे : सभापती महोदय, औरंगाबाद येथील दंत महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहाची क्षमता 50 आहे. परंतु, तेथे 88 विद्यार्थींनी ठेवल्या जातात. त्यामुळे शासनाने नवीन वसतिगृह बांधण्याचा निर्णय घेतला. तीन वर्षा पूर्वी वसतिगृहाच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु, त्याचे काम अजून सुरू झाले नाही. सदर काम केव्हा सुरू करणार आहे व किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ? सध्या जे वसतिगृह आहे त्यात कोणकोणत्या सुविधा दिल्या जातात आणि नवीन प्रस्तावित वसतिगृहात कोणकोणत्या सुविधा दिल्या जातील ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितल्याप्रमाणे 78 मुली ह्या वसतिगृहात राहतात. त्यामध्ये फस्ट इयरच्या 13, सेकंड इयरच्या 17 थर्ड इयरच्या 18, फोर्थ इयरच्या 13 सह इन्टर्नस्च्या 15 आणि पी.जी. च्या 2 अशा मिळून 78 विद्यार्थींनी राहतात. नवीन प्रस्तावित वसतिगृहाच्या कामाचे भूमिपूजन झाले होते ही गोष्ट खरी आहे. परंतु, निधी अभावी हा प्रकल्प मार्गी लागू शकला नाही. 120 विद्यार्थी आणि 120 विद्यार्थींनीसाठी जवळ जवळ 8 कोटी 98 लाखाच्या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सन 2012-13 मध्ये या प्रकल्पाला जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न करू व येत्या दोन वर्षामध्ये दोन्ही वसतिगृह मार्गी लागतील आणि विद्यार्थ्यांची सोय होईल.

=====

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांवतवाडी येथील उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीतील रिक्त पदे भरण्याकरिता करावयाची कार्यवाही

(9) * 25525 **श्री.परशुराम उपरकर , डॉ.दीपक सावंत** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सावंतवाडी येथील उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत पाच कायम पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रक्तपेढी ही मुंबई-गोवा महामार्गावर अपघात झाल्यावर अपघातग्रस्तांना जीवनदायी ठरत असतांनाही सदर रक्तपेढीत अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे गैरसोयीचे होत आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) हे खरे आहे.

(2) सदर रक्तपेढीचे कामकाज चालविण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे गैरसोय होते हे खरे आहे.

(3) रक्तपेढीच्या आकृतीबंधानुसार पदे मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा आणि गोवा राज्याच्या सीमेवर ही रक्तपेढी आहे. सावंतवाडी उप जिल्हा रूग्णालयाला जोडलेली ही रक्तपेढी आहे. येथील तांत्रिक पदे तीन वर्षापासून रिक्त आहेत. सदर पदे लवकरात लवकर भरण्यात येतील असे आपण म्हटलेले आहे. सदर पदे भरण्यासाठी 10 संघटनांनी लक्षवेधी आंदोलन केले होते. या आंदोलनकर्त्यांनी दिनांक 26.9.2011 रोजी आरोग्य सचिवांना पत्र दिले आहे हे खरे आहे काय, सदर पदे भरण्याकरिता आपण तातडीने उपाययोजना करणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक 5 जून 1999 रोजी खंडाळा ग्रामीण रूग्णालय, जिल्हा सातारा हे पदांसहित स्थलांतरित झाले. सन 2001 मध्ये पदांचा आढावा घेण्यात आला होता. त्यानंतर सन 2006 मध्ये पदांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये ही पदे आले नव्हती. त्यामुळे 9 नवीन पदे मंजूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. तेथे पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तेथे काम सुरू आहे.

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजीत पाटील : सभापती महोदय, आजचा दिवस हा वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य खात्याचा आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीवर लक्ष घातले तर प्रश्न क्रमांक 5,6,9,12,18,27,31,40,43 वरील प्रश्नांसंबंधी एक समान धोरण आहे हे लक्षात येईल. येथे जे प्रश्न विचारले आहेत ते रिक्त पदांसंबंधातील आहेत. रक्तपेढी ही लाईफ लाईन आहे. त्यामुळे सदर पदे लवकरात लवकर भरली जातील काय, यासाठी शासनाचे काही धोरण आहे काय ? आताच सन्माननीय सदस्यांनी रामनाथ मोते यांनी लवकरात लवकर असे उत्तर न देता शासनाने निश्चित कालावधी सांगावा असे सांगितले. त्याप्रमाणे सदर पदे भरण्यासाठी टाईम बाऊंड प्रोग्रॅम आपण आखणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, नवीन पदे मंजूर करण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. त्यामुळे टाईम बाऊंड प्रोग्रॅम कसा काय सांगता येईल ?

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : राज्यमंत्री महोदया, नवीन पदे भरण्याच्या प्रस्तावासंबंधी आपण उत्तर दिले आहे, परंतु शासनाच्या वतीने त्याबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. ही पदे लवकरात लवकर भरण्याबाबत प्रयत्न करणे जरुरीचे आहे. दहाव्या क्रमांकावरील प्रश्न महत्वाचा आहे. त्याबाबतीत माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर तो मी पुकारतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाच्या असमाधानकारक उत्तराने विरोधी पक्षाची निराशा झाली आहे. मंत्री महोदय, या ठिकाणी कोणतेही ठोस उत्तर देत नाहीत. त्यांनी अभ्यास करुन यासंबंधीची घोषणा करावी अशी आमची अपेक्षा आहे. याच प्रश्नाला नाही तर कोणत्याही प्रश्नांना शासनाकडून ठोस उत्तर मिळत नाही अशाप्रकारे या सार्वजनिक आरोग्य खात्याची ढिलाई आहे.

(गोंधळ)

सभापती : राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना आपण अचूक उत्तर देण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती या ठिकाणी मांडली पाहिजे. सभागृहाच्या माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर दिलेल्या उत्तरामधून त्यांचे समाधान होईल या दृष्टीने आपण काळजी घेणे गरजेचे आहे. सभागृहापुढे अचूक उत्तरे देण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, प्रस्ताव लवकरात लवकर पाठवून ही पदे भरली जातील. आपणास ही पदे भरावयाची होती तर त्यासाठी आपण आकृतीबंध का तयार केला नाही? ही पदे लवकरात लवकर भरणार आहात त्यासाठी निश्चित कालमर्यादा घालण्यात आली आहे काय, ही ब्लड बँकेची पदे किती दिवसात भरली जातील?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, 2006 मध्ये आकृतीबंध न येण्यामागील कारणे काय आहेत हे जाणून घेऊन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. दुसरे असे की, पदांची निर्मिती झाल्यानंतर लवकरात लवकर....

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हे राज्य शासन जनतेच्या आरोग्याशी खिलवाड करीत आहे याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सर्व माननीय सदस्य सभात्याग करतात.)

सभापती : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅफको महामंडळाचा सन 2010-2011 या वर्षाचा चाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2010-2011 यावर्षाचा चाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे....

सभापती : पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी आपण मला माझ्या दालनामध्ये येऊन भेटला होता. आपण व अन्य दोन-तीन माननीय सदस्यांनी मागणी केल्यानंतर मी असा निर्णय घेतला आहे की, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आणि औचित्याचे मुद्दे उद्या शुक्रवारी मांडण्यास आपणास परवानगी देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 13 एप्रिल, 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 12 एप्रिल, 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. विधानपरिषदेकडे एकूण तीन अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आहेत. त्यांना दहा मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा.

शुक्रवार, दिनांक 16 मार्च, 2012 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव

1. श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 78 - 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 3 - 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

बॅलेटव्दारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव

1.डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 134 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2.श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 128 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3.श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स., यांचा ठराव क्रमांक 80 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

वरील ठरावांपैकी वेळ वाचल्यास तो त्यापुढील ठरवांना देण्यात येईल.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाजासंबंधी

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी मागील आठवडयामध्ये आपणास भेटून विनंती केली होती की, उद्या अशासकीय कामकाजाचा आणि आठवडयाचा शेवटचा दिवस आहे. उद्या बाकीचे कामकाज घेऊन अशासकीय कामकाजावर अन्याय करु नये. अशासकीय कामकाज उद्या घेण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : उद्या अग्रक्रमाने अशासकीय कामकाज घेण्यात येईल. त्या शिवाय अन्य कामकाज करावयाचे असेल तर तेही करता येईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासंबंधीचा अशासकीय ठराव देण्यात आला होता. तो दोन वेळा पुढे ढकलण्यात आला, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी इतर विषयांवरील चर्चा असल्यामुळे तो पुढे ढकलण्यात आला. तेव्हा तो ठराव या अधिवेशनामध्ये घेण्यात येणार आहे काय?

सभापती : आता या अधिवेशनामध्ये तो ठराव येण्याची शक्यता नाही. हे मी या करिता सांगत आहे की, दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांकडून सभागृहापुढील कामकाजाची वेळ अचूक पाळण्याचे ठरविले तर आपण चर्चेविना राहिलेले अनेक विषय चर्चेकरिता घेऊ शकतो. परंतु दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांनी हे वेळेचे बंधन पाळले पाहिजे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये तो ठराव चर्चेला आलेला नाही.

सभापती : प्रश्न असा आहे की, सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवरील विषय चर्चेकरिता घेत असतांना अन्य महत्वाचे विषय सभागृहात मांडण्यात आल्यानंतर त्यासाठी देखील आपल्याला वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवरील काही विषय चर्चेशिवाय रहातात. असे प्रलंबित असलेले विषय चर्चेकरिता घ्यावेत यासाठी प्रयत्न करतो. परंतु एकंदरीत सभागृहाच्या कामकाजाची वेळ लक्षात घेता आपला ठराव यावेळी चर्चेकरिता येण्याची शक्यता फार कमी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये "महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न" या अनुषंगाने प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यावर माननीय सदस्यांनी दोन मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नामध्ये राज्य शासन लक्षत घालीत नाही म्हणून सीमावासीय बांधव आज या मुंबईच्या विधान भवनाला घेराव घालण्यासाठी दाखल झाले आहेत. सहा महिन्याच्या कालावधीमध्ये तालुक्याचे नाव बदलण्याचे काम कर्नाटक शासन करीत आहे. कानडी भाषेचा वरवंटा फिरवून सर्व शासकीय कामकाज कानडी भाषेमध्ये करण्याची कर्नाटक राज्य शासन त्यांच्यावर सक्ती करीत आहे. या ठिकाणी आलेल्या सीमावासीयांची स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट घ्यावी आणि त्यांचे समाधान करावे. संपूर्ण महाराष्ट्र राज्य त्यांच्या पाठीशी आहे, त्यांच्या प्रश्नामध्ये लक्ष घालीत आहे हे त्यांना समजले पाहिजे. या करिता आजच्या सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावर चर्चा करावी आणि सीमावासीयांसाठी शासनाने काही ठोस निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दिलेली नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आपण स्वीकारली पाहिजे ही माननीय सदस्यांची विनंती सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या बाजूकडील माननीय सदस्य मान्य करतील. वर्षानुवर्षे भिजत पडलेला आणि वर्षानुवर्षे सभागृहामध्ये चर्चेला येणारा हा विषय आहे. नागपूरला अधिवेशन सुरु असतांना बेळगावच्या महापौरांना निलंबित करण्यात आले आणि सभागृहाने देखील त्यांचे निलंबन मागे घेण्याबाबत मागणी केली. त्या अधिवेशनामध्ये असे ठरविण्यात आले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सोबत घेऊन दिल्लीला जाऊन माननीय पंतप्रधांनांची भेट घ्यावी. त्यांच्या भेटीमध्ये नेमका कोणता निर्णय झाला हे सभागृहापुढे आले पाहिजे. हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यातून संपूर्ण सीमा भागातील जनता त्रस्त झालेली आहे.माझे आजोळ हे निपाणी येथील असल्याने मी ते स्वत:अनुभवत असतो. त्यामुळे आज सभागृह स्थगित करुन माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते या सगळ्यांनीच या गोष्टीला सामोरे जावयास पाहिजे. त्यामुळे माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, ती मान्य करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे,त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने, तुमच्या-आमच्या दृष्टीने हा प्रश्न केवळ भावनेचा नाही तर तो कर्तव्याचा सुध्दा आहे अशी माझी भावना आहे.आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि मी स्वत: हुतात्मा दिनाच्या दिवशी पूर्ण दिवस तेथे उपस्थित होतो आणि आम्ही प्रत्येक वर्षी तेथे जातो.कदाचित एखादे वर्ष मागे-पुढे झाले असेल. परंतु आपल्याला तेथील परिस्थिती माहिती आहे आणि आपणही अनेक वेळा याबाबतीत वक्तव्य केलेले आहे.पण तेथील परिस्थितीमध्ये सुधारणा होण्या ऐवजी दिवसेंदिवस ती वाईट होत आहे.एवढेच नव्हेतर तेथील मराठी शाळा सुध्दा बंद करण्यात येत आहेत म्हणून हा ओरिजनली डिस्प्युटेड असा भाग आहे.

सभापती महोदय,जेव्हा संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा हा डिस्प्युटेड भाग असल्याचे केंद्र शासनाला आणि राज्य शासनालाही माहिती होते.सीमा भागातील लोकांच्या एवढ्याच भावना आहेत की,तुम्ही आम्हाला महाराष्ट्रामध्ये घ्यावे.आम्हाला मराठी भाषेमध्ये शिकू द्यावे, कानडीची सक्ती करण्यात येऊ नये.महाराष्ट्रामध्ये आज 13 भाषांच्या शाळा सुरु आहेत आणि आपणही त्यांना प्राधान्य देतो आणि सीमा भागातील मराठी भाषिकांची देखील अशाच प्रकारची भावना आहे.याबाबतीत सुप्रीम कोर्टामध्ये केस आहे असा आपण दावा करतो आणि हा प्रश्न असाच लोंबकळत रहातो.आज महाराष्ट्राच्या विधान भवनाला घेराव घालण्याइतपत त्यांच्या भावना पोहोचल्या आहेत.त्यामुळे सीमावासीयांच्या मनातील उद्रेक लक्षात घेता आपण सर्व कामकाज थांबविले पाहिजे आणि अशा प्रकारे आपण यापूर्वीही केले होते.तीन-चार वर्षापूर्वी सीमावासीय आझाद मैदानावर आले होते आणि त्यावेळी दोन्ही सभागृहाचे कामकाज थांबवून माननीय मुख्यमंत्र्यांसह आपण सर्व नेते त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो.माझी अशी विनंती आहे की,याबाबत चर्चा झाली पाहिजे. त्याबरोबरच बेळगाववासीय मराठी भाषिक नागरिक येथे आलेले आहेत. त्यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुध्दा भेट घेणे आवश्यक आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पहिल्यांदा आपले आभार मानतो.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सीमावासीयांच्या संबंधात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्याला मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, स्वातंत्र्य मिळून 50 वर्षे झाल्यानंतरही त्यांचे म्हणणे आहे की, महाराष्ट्र राज्यातील लोक हे मोठे भाऊ आहेत आणि तेथील लोक स्वातंत्र्याची फळे चाखत आहेत आणि आम्ही मात्र आतापर्यंत पारतंत्र्यांमध्येच आहोत आणि आमच्यावर सतत अन्याय होत आहे. आज याठिकाणी बेळगाव येथून सत्याग्रहासाठी मराठी बांधव आलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने आम्हाला मदत द्यावी, आम्हाला सहकार्य करावे, सर्वोच्च न्यायालयामध्ये जरी हे प्रकरण असले तरी तोपर्यंत हा प्रदेश केंद्रशासित व्हावा अशी त्यांची मागणी आहे. मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, आज "सामना" आणि "नवशक्ती" या वृत्तपत्रामध्ये अशा बातम्या आलेल्या आहेत की, काल माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये कर्नाटकच्या मंत्र्यांबरोबर महाराष्ट्रातील 2 टीएमसी पाण्याबाबत बैठक घेऊन ते कर्नाटक राज्याला देण्यात आले. याठिकाणी सदनाचे कामकाज सुरु आहे आणि अशा वेळी सदनातील विरोधी पक्षनेत्यांना विश्वासात घेतले नाही आणि एका बाजूला मराठी माणसे धडपडत आहे, तडफडत आहेत की, आमच्यावर अन्याय होत आहे, आम्हाला न्याय द्यावा आणि दुसऱ्या बाजूला अशा पध्दतीने सापाला दूध पाजण्याचे काम जर महाराष्ट्रामध्ये होत असेल तर मग ही बाब ....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझे बोलणे पूर्ण होऊ द्या आणि त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी हरकत घ्यावी. वर्तमानपत्राचा संदर्भ देऊन बोलता येत नाही हे मला माहिती आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांची काय हरकत आहे ते ऐकू या.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय संवेदनशील अशा विषयाबाबत बोलत असताना, आपला तो अधिकार आहे परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी कालच पाण्याच्या संदर्भात उल्लेख केला होता. कदाचित त्यावेळी आपण सदनामध्ये उपस्थित नव्हता असे वाटते. पण माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहितीप्रमाणे सांगली, सातारा येथील भागामध्ये जी पाणी टंचाई आहे, त्याच्या एक्ससेंजमध्ये ते पाणी दिले जाणार आहे अशा प्रकारचा सदनामध्ये उल्लेख झाला होता. म्हणून त्याचा राजकीय दृष्टीने उल्लेख करणे हे तितके योग्य होणार नाही.

सभापती : कृष्णा खोरे असे म्हटले तर त्यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश ही तीनही राज्ये येतात आणि त्या राज्यांमध्ये सातत्याने पाणी वाटप सुरु असते. त्यामुळे त्याबाबत सदनामध्ये अशा प्रकारचा उल्लेख होणे बरोबर नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी हरकत एवढीच आहे की, सीमा प्रश्नासारखा अतिशय संवेदनशील विषय असताना अशा प्रश्नांच्या बाबतीत चर्चा होणे हे अनावश्यक आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दूधगंगा आणि वारणा यामधून दोन टीएमसी पाणी दिलेले आहे. कृष्णा खोऱ्यातून दिलेले नाही.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, मी सुध्दा काही दिवस पाटबंधारे विभागाचा मंत्री म्हणून काम केले आहे. कृष्णा खोऱ्यातील पाणी वाटपाबाबत सांगावयाचे तर महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यातील पाण्याच्या वाटपाबाबत सातत्याने चर्चा होत असते. त्यामुळे आपण याठिकाणी त्या अनुषंगाने चर्चा करणे बरोबर आहे असे मलाही वाटत नाही. पण माझे मत असे आहे की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या बाबत 56 वर्षा पासूनचा जो प्रलंबित प्रश्न आहे, त्या अनुषंगाने आपण येथे सांगावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, एका बाजूला तेथील मराठी माणूस हा गेल्या 50 वर्षापासून न्याय मिळण्यासाठी लढत आहे आणि दुसऱ्या बाजूला त्या सरकारचे मंत्री येथे येतात तेव्हा त्यांना ठणकावून सांगितले पाहिजे की, ज्यावेळेला तुम्ही आमच्याकडे मदत मागत आहात तेव्हा तेथील आमच्या मराठी माणसावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्याचे काम देखील त्या सरकारचे आहे, तेथील माननीय मंत्री महोदयांचे आहे. त्यामुळे काल जेव्हा बैठक झाली, तेव्हा त्यांना तसे ठणकावून सांगावयास हवे होते. एका बाजूला आपण त्यांना पाणी देत आहोत आणि दुसऱ्या बाजूला ते आमच्या मराठी लोकांना पाणी पाजत आहेत अशा प्रकारचे उलट चित्र पहावयास मिळत आहे.

सभापती : मला असे वाटते की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता जे आवश्यक नाही ते मी सदनाच्या कामकाजातून काढून टाकणार आहे.

12-04-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) N-4

APR/MMP/ 12:25

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याइतके मी काही चुकीचे बोललो आहे असे मला वाटत नाही. जी वस्तुस्थिती आहे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : महाराष्ट्र-कर्नाटक प्रश्नाच्या दृष्टीकोनातून आज आपले बंधू याठिकाणी आलेले आहेत. त्यांच्या दृष्टीने .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, वर्तमान पत्रातील बातम्या जनता वाचत आहे.मी पेपरमधील भाग वाचून दाखविला, ते देखील काढून टाकणार काय ? हे राजकारण सुरु आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या संदर्भात कायम तेथील संघर्ष करणाऱ्या मराठी बांधवांमध्ये पोरकेपणाची जाणीव निर्माण होत आहे. अनेकवेळेला या संघर्षाच्या टप्प्यामध्ये ते मुंबईला येऊन पोहोचतात. त्यावेळेला महाराष्ट्रातील सर्व जनतेची जबाबदारी आहे की, आपण या सर्व संघर्षामध्ये त्यांच्या बरोबरीने आहोत आणि त्यांचा प्रश्न सोडविण्याचा आपणही तितकेच प्रयत्न करणार आहोत. हा विषय राज्याच्या दृष्टीने, राज्यातील मराठी जनतेच्या दृष्टीने आणि सीमावासीयांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील झालेला असल्याने या ठिकाणी जी सूचना मांडलेली आहे त्यावर आपण विचार करावा अशी मी आपणास विनंती करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडलेली आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा आजचा प्रश्न नाही. आपले सभागृह ज्या ज्या वेळी सुरु असते त्यावेळी या प्रश्नाची चर्चा होत असते.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या प्रश्नासंबंधी शेवटच्या परिच्छेदामध्ये उल्लेख असतो.मागील 56 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे.सीमा भागा-तील गावे महाराष्ट्रात रहावीत की कर्नाटक राज्यात रहावीत यासाठी हा प्रश्न माननीय सर्वोच्च न्यायालयात गेलेला आहे.परंतु आज सीमा भागातील लोकांवर अन्याय आणि अत्याचार सुरु आहे. त्यांची मराठी भाषेतून शिकण्याची इच्छा असताना त्यांना कानडी भाषेतून शिकण्याची सक्ती केली जात आहे. आज त्यांच्यावर वेगवेगळ्या पध्दतीने अन्याय केला जात आहे आणि सर्व बेळगाववासीय आझाद मैदान येथे धरणे धरुन बसले आहेत. तेव्हा त्यांना सहानुभूती दाखवून त्यांच्या प्रश्नासंबंधी महाराष्ट्र राज्य त्यांच्या पाठिशी आहे अशा भावना या सभागृहाच्या माध्यमातून जाण्याची गरज आहे. हा प्रश्न राज्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. तसेच सीमावासीयांच्या दृष्टीने देखील महत्वाचा आहे. सीमावासीयांच्या मागे महाराष्ट्र आणि सर्व पक्ष भक्कमपणे उभे आहेत असा मेसेज देण्याची गरज आहे. तेव्हा या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण जेवढा वेळ द्याल तेवढ्या वेळेत ही चर्चा करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच एकीकरण समितीच्या आंदोलकांना आपले शिष्टमंडळ जाऊन भेटले तर त्यांच्यापर्यंत मेसेज पोहोचेल की, महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील मराठी माणूस निश्चितपणे त्यांच्या पाठिशी आहे. म्हणून या सभागृहात त्याची चर्चा व्हावी अशी मी आपणास विनंती करतो.

यानंतर श्री.अ.शिगम .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आंदोलनाच्या संदर्भात एकीकरण समितीचे लोक आम्हाला येऊन भेटले होते. त्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात न्यायालयामध्ये जाण्याचा प्रश्न असेल किंवा केंद्र सरकारकडे जाण्याचा प्रश्न असेल, राज्यातील मराठी जनतेच्या भावना लक्षात घेऊन राज्य सरकारने आग्रही भूमिका घेतलेली आहे. या प्रश्ना संबंधी आपणच न्यायालयात गेलो आहोत. आता हा प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे. बेळगाव मधील मराठी बांधवांवर अन्याय होऊ नये, त्या नावाचे नामांतर करु नये यासाठी कर्नाटक सरकारकडे जरुर आग्रह धरण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती : गेली 56 वर्षे महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्ना बाबत एकीकरण समिती व विविध संघटना यांनी आंदोलने केलेली आहेत व महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरण नेऊनही अद्यापपर्यंत हा वाद सुटलेला नाही. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव करुनही अद्याप या बाबतीमध्ये अंतिम निर्णय झालेला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने पुन्हा या बाबत पुढाकार घेऊन हा प्रश्न केंद्र शासनाच्या समोर अंतिम निर्णया पर्यंत येण्यासाठी पाठपुरावा करावा असे मी या सभागृहाच्या वतीने शासनास पुन्हा निदेश देत आहे. हा माझा निर्णय आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये उपस्थित केलेल्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर मी माझे औपचारिक मत मांडले आहे, याची शासनाने नोंद घ्यावी. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी या बाबत जरुर लक्ष घालावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, होय.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्ना संदर्भात दिल्ली येथे सर्व आमदारांचा धरणे धरण्याचा कार्यक्रम ठेवावा.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या भावना माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील, माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या कानावर घालतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मला अशी माहिती आहे की, खालच्या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य आंदोलकांची भेट घेण्यासाठी आझाद मैदानावर गेलेले आहेत. त्यासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित केलेले आहे. ही बातमी खरी असेल तर आपल्या सभागृहाने देखील तशी कार्यवाही करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.38 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सीमावासीयांच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. नागपूरला देखील या बाबतीत चर्चा करीत असताना आपण भावना व्यक्त केल्या होत्या. या सगळ्या भावना आपण सभागृहामध्ये व्यक्त करतो पण सीमा भागातील सामान्य माणसाला प्रत्यक्षपणे हा संपूर्ण महाराष्ट्र आपल्या बरोबर आहे असा संदेश देण्यासाठी आपण त्या ठिकाणी भेटावयास जाणे आवश्यक आहे. योगायोगाने विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना जर सीमा भागातील बांधव आझाद मैदानावर आले असतील तर आपण सर्वांनी मिळून त्या ठिकाणी भेटावयास गेले पाहिजे असे मला वाटते. नेहमी सत्ताधारी बाकावरील आणि विरोधी पक्षाच्या बाकावरील सन्माननीय सदस्य त्यांना भेटावयास जातो पण यावेळी सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी उभा आहे असा संदेश द्यावयाचा असेल तर सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी माननीय सभापती महोदयांना विनंती करतो की, आपण आमचे नेतृत्व करावे. विधान परिषद सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या नेतृत्वाखाली सीमा भागातून आलेल्या बांधवांना भेटण्यासाठी आझाद मैदानावर जावे आणि त्यांना आपला पाठिंबा व्यक्त करावा, असे मला वाटते. कर्नाटकमध्ये जरी भारतीय जनता पक्षाचे शासन असले तरी महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्ष सीमाभागातील मराठी माणसांच्या पाठीशी आहे हे आम्ही वेळोवेळी सांगितलेले आहे. त्यामुळे आज आपण पक्षीय राजकारण सोडून सर्व सदस्यांनी आपल्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर जावे अशी मी विनंती करतो. सीमा भागातील लोकांचा उत्साह आणि ते जो संघर्ष करीत आहेत त्यासाठी हा संदेश उपयुक्त होईल असे मला वाटते.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना, त्या परिसरातील सीमावासीय जनतेला कर्नाटक सरकारचा होणारा त्रास तसेच तमाम मराठी बांधवांच्या इच्छा लक्षात घेऊन आपल्या सदनातील सर्वपक्षीय सदस्यांनी आपल्या नेतृत्वाखाली त्या ठिकाणी जाऊन जाहीरपणे सीमावासीय बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

श्री. आर. आर. पाटील....

आवश्यकता आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जी भूमिका व्यक्त केलेली आहे त्याला शासन म्हणून आमचाही पाठिंबा आहे. सर्वपक्षीय आमदारांनी त्या ठिकाणी जाऊन त्यांना पाठींबा देणे आणि तोपर्यंत सभागृहाचे कामकाज तहकूब करणे योग्य राहील.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय गृहमंत्री श्री. आर. आर पाटील साहेब यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. गेल्या 56 वर्षामध्ये आपले महाराष्ट्र-कर्नाटक सीमावासीय बांधव अनेक पध्दतीने त्या ठिकाणी संघर्ष करीत आहेत, आंदोलने करीत आहेत. त्यांची महाराष्ट्रामध्ये येण्याची तीव्र इच्छा आहे. त्यादृष्टीने संपूर्ण महाराष्ट्र सातत्याने त्यांच्या पाठीशी उभा आहे. यापूर्वी सुध्दा आपण या सदनामध्ये एकमताने ठराव केलेला आहे. हा प्रश्न सुटावा यादृष्टीने सत्तारुढ पक्ष असेल, विरोधी पक्ष असेल, आपण सर्व सातत्याने त्यांच्या पाठीशी आजपर्यंत उभे राहिलो. आज सुध्दा आपण ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावनांचा आदर करुन सभागृहाचे कामकाज मी 2 वाजून 30 मिनिटांपर्यंत तहकूब करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला माझी व्यक्तिगत अडचण सांगितली. आज 1.00 वाजल्यापासून 2.00 वाजेपर्यंत कायदा व सुव्यस्थेच्या संदर्भात चर्चा होणार होती. आता सभागृह 2.30 वाजेपर्यंत तहकूब होत आहे. मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना सुध्दा विनंती करीन की, सदरहू चर्चा आपण मंगळवारी आपल्या सोयीनुसार घ्यावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, बहिणी नेहमी सगळ्या अपेक्षा पूर्ण करीत असतात आणि सीमावासीयांसाठी जर ही चर्चा नंतर होणार असेल तर ते आम्हाला मान्य आहे.

सभापती : ठीक आहे. आझाद मैदानावर सीमावासीय बांधवांना भेटण्यास जाण्यासाठी मी सभागृहाचे कामकाज 2 वाजून 30 मिनिटांपर्यंत तहकूब करीत आहे. आपण सीमावासीय बांधवांना आझाद मैदानावर भेटण्यासाठी जाणार आहोत त्याचे नेतृत्व मी प्रेमाने व आपणा सर्वांचा आग्रह म्हणून करणार आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन 2 वाजून 30 मिनिटांनी पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.53 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे दस्तुरी नाक्यावर असलेले महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विश्रामगृह दुरुस्तीच्या नावाखाली पाच वर्षे बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त कार्यालयाच्या नियंत्रणाखालील 'क' व 'ड' संवर्गातील पदे तातडीने भरण्याबाबत न्यायालयाचे आदेश असूनही ती रद्द करण्याचा निर्णय होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "मुंबई शहरातील सफाई कामगारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आवास योजनेंतर्गत मोफत घरे देण्यात यावीत तसेच त्यांच्यासाठी सेवा निवासस्थाने बांधण्यासाठी निर्णय घेण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील, भगवान साळुंखे यांनी सर्वोच्च न्यायालयाने दि.15 मार्च, 2010 रोजी समान काम समान वेतन असा निवाडा देऊनही शासनाने एस.टी.महामंडळाचे कनिष्ठ कामगार व नियमित कामगार यांच्या वेतनात तफावत केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी देशात मुंबईसह दिल्ली, कोलकाता, बंगळूर, आसाम, चेन्नई, बिहार या ठिकाणीही दि.11.4.2012 रोजीच्या सुमारास बसलेले भूकंपाचे धक्के"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी "गोंदिया नगरपरिषदेतील 1993 च्या पूर्वी नियुक्त झालेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "वानाडोंगरी, ता.हिंगणा,जि.नागपूर येथील बाबासाहेब केदार शेतकरी सहकारी सूत गिरणी गेल्या 2 महिन्यापासून बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी उप जिल्हा कुटीर रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "अमरावती महानगरपालिकेच्या सहायक संचालक नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी भूखंडाचे ले-आऊट पाडताना केलेला गैरव्यव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय 58 वरुन 60 वर्षे करण्याची नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी केलेली मागणी.

उप सभापती : या निवेदनाशी संबंधित असलेले मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी हे निवेदन प्रलंबित ठेवत आहे.

नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आज नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आल्या असल्याचे माननीय सभापतींनी सांगितले होते. त्यापैकी पहिली नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सीमा भागातील लोकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या व सर्वांच्या जिव्हाळ्याच्या विषयासंबंधी दिली होती. त्यासंबंधी माननीय सभापतींनी परवानगी दिल्यानंतर थोडक्यात चर्चा झाल्यानंतर त्यासंबंधीचा निर्णय देण्यात आला आहे. परंतु मी राज्यातील विद्यापीठातील हजारो प्राध्यापकांच्या मागण्या शासनाकडे प्रलंबित असणे या विषयासंबंधी मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. मी नियम 289 अन्वये दिलेली सूचना प्रलंबित राहिली आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आज सकाळी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्याबाबत माननीय सभापतींशी चर्चा केल्यानंतर सन्माननीय सदस्यांना निर्णयाची माहिती देण्यात येईल.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

पृ. शी. : भोतडपाडा (जि.ठाणे) येथील लेंडी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांना मोबदला न मिळणे

मु. शी. : भोतडपाडा (जि.ठाणे) येथील लेंडी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांना मोबदला न मिळणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, सय्यद पाशा पटेल, केशवराव मानकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भोतडपाडा (जि.ठाणे) या गावाजवळ उभारण्यात आलेल्या लेंडी धरण प्रकल्पाचे काम 95 टक्के पूर्ण झाले असून 4 वर्षाचा कालावधी उलटूनही प्रकल्पग्रस्तांना अद्यापपर्यंत कोणताही मोबदला न मिळणे, या धरणासाठी पोईरोज, भोतडपाडा, पामरेपाडा, हिरडपाडा, खडाडी, जामसर, खिराडीपाडा, बोरठण या गावातील शेतकऱ्यांची 214 हेक्टर भातशेतीची जमीन संपादित करण्यात येणे, मात्र, या शेतकऱ्यांना आवश्यक तो मोबदला न मिळणे, नियमानुसार बाधित गावांमधील ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्यात न येणे, तसेच याबाबतचे दाखलेही न मिळणे, ठेकेदाराने या प्रकल्पाच्या कामासाठी स्थानिक लोकांना डावलून आंध्र प्रदेशातील मजुरांना आणून काम दिल्यामुळे फक्त भातशेतीवर अवलंबून असलेल्या भूमिपुत्रांना रोजगारापासूनही वंचित रहावे लागणे, 4 वर्षांपूर्वी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला विनाविलंब मिळण्याबाबत ग्रामस्थांनी सुरु केलेले आंदोलन, शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री.सुनील तटकरे(जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना आपल्या जिल्ह्यातील धरणाची आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये जव्हार पासून 9 कि.मी.अंतरावर असलेल्या भोतडपाडा या गावाजवळ लेंडी धरण प्रकल्प उभा रहात आहे. माझ्या माहितीप्रमाणे या प्रकल्पग्रस्तांना आतापर्यंत मोबदला देण्यात आलेला नाही. या धरणाचे काम 5-6 वर्षांपासून सुरु आहे. या धरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्यानंतर आजपर्यंत मोबदला दिलेला नाही हा मूळ मुद्दा आहे. या निवेदनात भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे असे नमूद केलेले आहे. ही कार्यवाही किती वर्षे चालू राहणार आहे ? हा प्रकल्प आता पूर्णत्वाला येत आहे. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन या प्रकल्पग्रस्तांना लवकरात लवकर मोबदला देण्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्यावेळी या धरणाचे काम प्रस्तावित केले आहे त्यावेळी संबंधितांच्या संमतीनेच जमीन ताब्यात घेतली होती. त्यांनी स्वेच्छेने पुनर्वसन करण्यासाठी मान्यता दिलेली होती. त्यांनी मान्यता दिली म्हणून 5 गावातील 63 कुटुंबांना 74 लाख, 66 हजार 398 रुपयांचा मोबदला घरांच्या किंमतीच्या संदर्भात देण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी म्हटल्याप्रमाणे या लोकांना जमिनीचा मोबदला दिलेला नाही. त्यावेळी खाजगी वाटाघाटीने त्यांना जमीन देताना त्यांच्याबरोबर चर्चा करुन जमिनीचे दर ठरवित होतो. मधल्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आले. पण झाडे, जमिनीची किंमत कशाप्रकारे अंतर्भूत करावी यासंबंधी वेगवेगळे प्रश्न होते. यासंबंधी एक क्लिष्ट प्रश्न असा आहे की, तेथे माडाची झाडे आहेत. त्या झाडांचे मूल्यांकन ठरविण्याबाबत दुमत होते. सरकारी किंमतीप्रमाणे मूल्यांकन करावयाचे म्हटले तर झाडांची किंमत अल्प होत होती. माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर माझ्या स्तरावर मी 1-2 वेळा बैठका घेतल्या आहेत. जेणे करुन तेथील शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे आवश्यक होते. मधल्या काळामध्ये निवेदन दिल्यानंतर शासनाने भूसंपादन करावे अशी भूमिका घेतली गेली. आता कलम 4 व 6 ची कार्यवाही व इतर सर्व बाबी पूर्ण झालेल्या आहेत. अंतिम निवाडा बाकी राहिलेला आहे. अंतिम निवाड्यासाठी लागणारी रक्कम या वर्षी तातडीने उपलब्ध करुन देत आहोत. या वर्षाचे बजेट मंजूर झाल्यानंतर ती रक्कम तिकडे वर्ग होईल आणि येत्या महिन्याभरामध्ये आवश्यक ती कार्यवाही निश्चितपणे पूर्ण केली जाईल.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या अंतर्गत येणाऱ्या गावाच्या पुनर्वसनाचा निवेदनात कोठेही उल्लेख केलेला नाही. आधी पुनर्वसन व नंतर धरण असे शासनाचे धोरण आहे. परंतु त्यानुसार हे धोरण तेथे लागू झालेले नाही. त्या लोकांचे पुनर्वसन आतापर्यंत झालेले नाही. त्यांच्या पुनर्वसनासंबंधी काहीही उल्लेख केलेला नाही.

सभापती महोदय, तेथील भूमिपुत्रांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिलेली नाही. स्थानिक ग्रामस्थांना रोजगारापासून वंचित ठेवल्यामुळे दिनांक 9.1.2012 पासून जव्हार-सेलवास या रस्त्यावर भोतडपाडा येथे ठिय्या आंदोलनही केलेले आहे हे खरे आहे काय ? लेंडी प्रकल्पासाठी आंध्र प्रदेशातून मजूर आणले आहेत, परंतु भूमिपुत्रांना मात्र काम देण्यात आले नाही. म्हणून त्यांनी बेमुदत ठिय्या आंदोलन केले आहे हे खरे आहे काय, गावाचे पुनर्वसन आणि भूमिपुत्रांना रोजगार देणे या दोन मुद्यांबाबत सरकार गंभीर दिसत नाही. शासनाने याबाबत तातडीने पावले उचलून कोणती उपाययोजना केली आहे ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनिल तटकरे : निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील चौथ्या परिच्छेदामध्ये नमूद केलेले आहे की, "या 63 बाधित कुटुंबातील प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनासाठी संमती दिली होती. स्वेच्छा पुनर्वसनासाठी गावक-यांनी भरसटमेंट, तालुका जव्हार येथे 12 एकर जमीन खाजगी वाटाघाटीने खरेदी केलेली होती. तथपि, माननीय राज्यमंत्री (आदिवासी विभाग) व प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन यांचे दिनांक 24.10.2011 रोजीचे प्रकल्पाच्या क्षेत्रिय भेटी दरम्यान स्वेच्छा पुनर्वसनाऐवजी शासकीय पुनर्वसन करण्याची मागणी झाल्याने क्षेत्रीयस्तरावर याबाबत कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे तशा पध्दतीची कारवाई लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील. जेव्हा काम प्रगतिपथावर होती त्यावेळी स्थानिक मजुरांना वेगवेगळया कामासाठी जरुर नेमले होते. परंतु ग्रामस्थ स्थलांतरित होत नसल्यामुळे काम थांबलेले आहे. जेव्हा काम सुरु होईल त्यावेळी भूमिपुत्रांना घेण्याबाबत ठेकेदारांना सूचना देण्यात येतील.

श्री. रामदास कदम : तेथील शेतक-यांकडून स्वेच्छापुनर्वसन करण्यासंबंधी लिहून घेतले होते. मग शेतक-यांचे पुनर्वसन झालेले नसताना प्रकल्पाचे काम सुरु का केले ? आधी पुनर्वसन नंतर धरण असे शासनाचे धोरण आहे. या धोरणाला शासनाने हरताळ का फासला ?

श्री. सुनिल तटकरे : एकंदरीत 143 हेक्टर जमीन ही धरण बुडित क्षेत्रासाठी लागते आणि कालव्यासाठी 30 हेक्टर जमीन लागते. 173 हेक्टर जमीन जमीनदारांनी वाटाघाटीत लिहून दिलेली आहे. ही जमीन आता सरकारच्या ताब्यात आहे. दरम्यानच्या काळामध्ये स्वेच्छापुनर्वसनातील 63 कुटुंबांना 74,66,398 रु. मोबदला अदा केलेला आहे. ते स्थलांतरित न होण्याची कारणे म्हणजे वाटाघाटीने खाजगी जमीन घ्यायची असेल तर रेडिरेकनरचा आधार घेतला जातो. तेथील शेतक-यांना जमिनीची अधिक किंमत कशी देता येईल, अधिकचे मूल्यांकन कशा पध्दतीने होऊ शकेल यादृष्टीने प्रकल्पग्रस्ताना न्याय देण्यासाठी मी दोन बैठका घेतल्या. तसेच जिल्हाधिका-यांसमक्ष भेट देऊन चर्चा केली. जेव्हा अंतिम निवाडा घोषित होईल त्यासाठी आवश्यक असलेले 11 कोटी रुपये 15-20 दिवसात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करु. जोपर्यन्त खाजगी वाटाघाटीने चर्चा सुरु होती तोपर्यन्त भूसंपादनाची प्रक्रिया थांबलेली होती. जेव्हा खाजगी वाटाघाटीने जमीन संपादन केली जाते त्यावेळी शासकीय भूसंपादन होत नसते. खाजगी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनिल तटकरे...

वाटाघाटी करण्याचा हेतू हा होता की शेतक-यांच्या जमिनी, झाडे इत्यादींना रास्त किंमत मिळावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : मी मघाशी सांगितले की, आधी पुनर्वसन नंतर धरण असे शासनाचे धोरण आहे. पुनर्वसनासाठी जागा घेतलेली आहे. त्याठिकाणी शाळा, रस्ते, दवाखाने, स्मशानभूमी आदी मूलभूत सुविधा जोपर्यन्त दिल्या जाणार नाही तोपर्यन्त लोक तेथे जाणार नाहीत. तेव्हा पुनर्वसनाच्या कामाला प्राधान्य देऊन पुनर्वसनाचे काम आधी पूर्ण करावे तोपर्यन्त अन्य कामे हाती घेऊ नयेत अशी तेथील शेतक-यांनी मागणी केलेली आहे. त्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केलेले आहे. तेव्हा हे पुनर्वसनाचे काम शासन गतीने सुरु करणार आहे काय ?

श्री. सुनिल तटकरे : मी सभागृहामध्ये वारंवार हे स्पष्ट केलेले आहे की जमीन सरकारच्या ताब्यामध्ये आहे. संबंधित शेतक-यांना द्यावयाच्या मोबदल्या संबंधी चर्चा सुरु होती. माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर सर्वांना समक्ष बोलावून चर्चा केली, त्यांच्या जमिनीचे, झाडांचे अधिकाधिक मूल्यांकन कसे होईल यादृष्टीने प्रयत्न केले. जोपर्यन्त शेतक-यांना मोबदला दिला जाणार नाही तोपर्यन्त काम सुरु होणार नाही.

डॉ. नीलम गो-हे : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहेकी, "क" व "ड" मधील रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या असून त्यामध्ये 190 जागा प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. या 190 जागा राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव ठेवलेल्या आहेत की केवळ प्रश्नाधीन प्रकल्पग्रस्तासाठी त्या राखून ठेवलेल्या आहेत ?

श्री. सुनिल तटकरे : प्रकल्पग्रस्तांच्या भरतीच्या संदर्भात शासनाने जो निर्णय केलेला आहे त्याप्रमाणे क्षेत्रीय विभागामध्ये 190 जागा आहेत. या क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी 190 जागा आहेत. गुणवत्तेनुसार जे प्रकल्पग्रस्त मेरिटमध्ये येतील त्यांना प्राधान्याने नोकरी दिली जाणार आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आचरा (ता.मालवण) आणि हरचिरी (ता.रत्नागिरी) येथे एका परवान्यावर दोन आरागिरणी सुरु करणे

मु. शी. : आचरा (ता.मालवण) आणि हरचिरी (ता.रत्नागिरी) येथे एका परवान्यावर दोन आरागिरणी सुरु करणे यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आरा गिरणी विक्रीची प्रक्रिया दाखवून एकाच परवान्याच्या आधारे आचरा (ता.मालवण) आणि हरचिरी (ता.रत्नागिरी) येथे दोन आरा गिरणी चालवित असल्याचा प्रकार माहितीच्या अधिकारांत प्राप्त झालेल्या माहितीमध्ये नुकताच स्पष्ट होणे, आचरा येथे असलेली आरा गिरणी परवान्यासह मूळ मालकाने २००४ मध्ये हरचिरी येथे एकाला विकल्यानंतर त्यांचे हस्तांतरण व स्थलांतराबाबत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा परवाना आपोआप रद्द होणे अपेक्षित असतांनाही आचरा येथील आरा गिरणीचा परवाना सुरुवातीला दिनांक १ जानेवारी, २००५ ते ३१ डिसेंबर, २००७ व त्यानंतर २००८ ते २०१७ पर्यंत नूतनीकरण करण्यात येणे, या गंभीर प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरा गिरणी विकल्यानंतर ती बंद करण्याऐवजी चालू ठेवून त्याच परवान्यावर रत्नागिरीमध्ये दुसरी आरा गिरणी सुरु करण्यात आली. अधिका-यांच्या संगनमताने हे घडलेले आहे. या प्रकरणी संबंधित महिलेवर गुन्हा दाखल केल्याचे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. या आरा गिरणीचे 2004 ते 2008 पर्यंतच्या परवान्याचे नूतनीकरण करुन दिलेले आहे. 2008 ते 2019 पर्यन्त 10 वर्षाचा परवानाही दिलेला आहे. 1997मधील अशाच एका सॉ मिलच्या प्रकरणाच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने कारवाईचे आदेश दिल्यामुळे तत्कालीन मंत्री महोदयांना आणि अपर सचिवांना जेलमध्ये जावे लागले होते. हे प्रकरण तसेच आहे. तेव्हा या प्रकरणातील संबंधित अधिका-यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, हा महाभयंकर गुन्हा आहे. सन 2003मध्ये शिवराम देऊ पांगे, रा. आचरा, ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या मालकीची एक आरा गिरणी होती. यांनी ही आरा गिरणी त्यांचे जावई श्री.नितीन भागेश्वर झापडेकर, रा. हरचिरी, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी यांना विकल्याचे दाखविले आणि लायसन्स त्यांच्या नावावर ट्रान्स्फर केल्याचे दाखविले. ही आरा गिरणी त्यांनी रत्नागिरी येथे शिफ्ट झाल्याचे दाखविले. परंतु त्यांनी रत्नागिरीमध्ये शिफ्ट झालेली आरा गिरणी रत्नागिरीमध्ये चालू ठेवली आणि आचरा या मूळजागी देखील आरा गिरणी चालू ठेवली. ही गोष्ट खरी आहे की, 2003-04 ते 2010 पर्यन्त ही आरा गिरणी चालू होती. 2010ला आरा गिरणीचा मूळ मालक शिवराम देऊ पांगे हा वारला आणि ती आरा गिरणी त्याच्या पत्नीच्या नावे करण्यासाठी जेव्हा अर्ज करण्यात आला त्यावेळी ज्याने ही चूक केली त्याच्याऐवजी त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल करण्याचे काम अधिका-यांनी केले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

म्हणून यामध्ये आपण कारवाई म्हणण्यापेक्षा तेथे 6 ते 7 वर्षामध्ये एकाच माणसाच्या नावावर दोन-दोन गिरण्या आणि त्याही एकाच जिल्हयामध्ये असणे, गिरणी शिफ्ट केल्याची माहिती खात्याला निश्चितपणे असणारच. असे असूनही पुन्हा त्यांचा परवाना रिन्यू केला. कायद्याचा आधार घेऊन 10 वर्षासाठी परवाना देण्यात आला. यामध्ये खात्याचे अधिकारी 100 टक्के आहेत. म्हणून त्या काळातील डी.एफ.ओ., सब डी.एफ.ओ., रेंजर, फॉरेस्टर यांच्यावर ही जबाबदारी निश्चित केली जाईल एवढे सांगू इच्छितो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, तत्कालीन वन मंत्र्यांना अशा प्रकरणात जेलमध्ये जावे लागले होते. न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत की, महाराष्ट्रात आरा गिरण्यांना परवानगी देऊ नये. असे असताना परवानगी दिली गेली. इतकेच नव्हे तर 10 वर्षाची मुदत देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. जर माजी वन मंत्र्यांना जेलमध्ये जावे लागले असेल तर अधिकारी त्यांच्यापेक्षा मोठे आहेत का? ज्या ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे त्यांच्याविरुध्द तत्काळ गुन्हा दाखल करुन जेलमध्ये पाठविणार आहात काय?

श्री.भास्कर जाधव : हे लायसन्स शिफ्ट होण्याचे काम त्यांच्याच पातळीवर होते. त्या विषयाशी मंत्र्यांचा संबंध येत नाही. सभापती महोदय, मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, या संदर्भात फॉरेस्ट ॲक्टमध्ये जी तरतूद आहे त्या तरतुदीप्रमाणे गुन्हा दाखल केला जाईल. अशा प्रकारचा गुन्हा केल्यामुळे फौजदारी स्वरुपाचा गुन्हा सुध्दा दाखल केला जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी चूक केल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. डी.एफ.ओ.किंवा इतर जे संबंधित अधिकारी आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणार आणि फौजदारी गुन्हा दाखल करणार हे सांगितले गेले आहे. त्यांना विभागाने सस्पेंड करुन नंतर पुढील कार्यवाही करता येईल. त्यांना सस्पेंड केले जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सस्पेंडची घोषणा करायला हरकत नाही. परंतु सस्पेंड केल्यानंतर बाकीच्या चौकशीमध्ये खूप पळवाटा राहतात. म्हणून मघाशी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याविरुध्द खात्यामार्फत फॉरेस्ट ॲक्ट अंतर्गत कारवाई करु. फौजदारी स्वरुपाचा पण गुन्हा दाखल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मागाठणे, ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर येथील एसआरए योजनेमध्ये सुरु असलेला गैरकारभार

मु. शी. : मागाठणे, ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर येथील एसआरए योजनेमध्ये सुरु असलेला गैरकारभार यासंबंधी सर्वश्री विनायक मेटे, विक्रम काळे, सतीश चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मागाठणे, ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर येथील सी.टी.एस.क्र.२१५ वरील देवीपाडा येथील एस.आर.ए. को.ऑप.हौसिंग सोसायटी यांनी झोपडपट्टी धारकांची सभा व अनुमती न घेता, गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी संगनमत करुन या झोपडीधारकांना धमकावून झोपडयाखाली करुन घेणे, सन १९९५ चे वास्तव्याचे पुरावे आवश्यक असतानाही विकासक आणि वास्तुविशारद यांनी खोटे गुमास्ता करारनामा (विना नोंदणी खत) म्हाडाकडे सादर करणे, तसेच सन 2006 मध्ये मै वैभव डेव्हल्पमेंटशी करार केला असताना सदर डेव्हलपर्स यांनी मे.आशापुरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.कंपनीस विकून रहिवाश्यांची फसवणूक करणे, झोपडीधारकांची संख्या 1150 असतांना 1367 करण्यात येणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन झोपडीधारकांची फसवणूक होवू नये म्हणून, शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, शासनाने दिलेले निवेदन समाधानकारक नाही. बोरीवली येथील देवीपाडा झोपडपट्टीमध्ये एसआरए योजना राबविण्यात येत आहे. तेथे अस्तित्वात असलेल्या झोपड्यांपेक्षा जास्त झोपड्या दाखविण्यात येऊन लाभार्थ्यांची संख्या वाढविण्यात आली. बाहेरच्या लोकांचा समावेश परिशिष्ट-2 मध्ये केला गेला. म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुन घुसखोरांना अधिकृत दर्जा देण्याचे काम केले गेले. पहिल्या विकासकाने काम सोडल्यानंतर दुस-या विकासकाकडे काम हस्तांतर करण्यात आले. ही कार्यवाही करताना सभासदांची सर्वसाधारण सभा घेण्यात आली नाही. काम हस्तांतर केल्यानंतर मे.आशापुरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.कंपनी या विकासकाकडे जबाबदारी देण्यात आली. त्याने अनधिकृतपणे झोपड्या तोडण्यास सुरुवात केली. माझ्याकडे त्या परिसराचे फोटो आहेत. त्यांच्याकडे कोणत्याही विभागाची परवानगी नसताना 200 ते 250 झोपड्या त्यांनी तोडल्या आहेत. विजेच्या तारा उघड्यावर पडल्या आहेत. तेथील दोन रहिवाशांना विजेचा शॉक लागल्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. तेथील सांडपाणी व ड्रेनेज लाईन चोकअप झालेली आहे. पाण्याचे नळ तोडण्यात आले आहेत. या योजनेच्या परिशिष्ट-2 ची फेरतपासणी केली जाईल काय? सध्या झोपड्या तोडण्याचे काम केले जात आहे ते थांबविण्यात येईल काय आणि या प्रकरणात जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय?

उप सभापती : मंत्री महोदय, शासनाकडून ज्या एसआरए योजनांना मंजुरी दिली जाते त्यातील एकही योजना अशी नाही की, त्या योजनेविरुध्द लोकांची तक्रार नाही. प्रत्येक योजनेमध्ये बिल्डर काही ना काही घोटाळे करतात. जे लाभार्थी असतात त्यांना बऱ्याच वेळेला अन्यायाला सामोरे जावे लागते आणि न्याय मागण्याचा प्रयत्न केल्यानंतर प्रशासनाकडून विशेषत: म्हाडाकडून दाद मिळत नाही. म्हाडाविरुध्द अनेक तक्रारी आहेत. या प्रकरणामध्ये आपण जातीने लक्ष घालावे आणि या लोकांची होणारी फसवणूक कृपया थांबवावी. हे प्रकरण फार गंभीर आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एकूण 1133 पात्र झोपडीधारकांपैकी 953 म्हणजे 84.11 टक्के लोकांनी प्रकल्पाला सहमती दर्शविल्यानंतर शासनाची ही भूमिका असते की, त्या योजनेला मंजुरी देऊन पुढे चालना द्यावी. माननीय सदस्यांनी सांगितले की, एका विकासकाकडून दुसऱ्या विकासकाकडे योजना हस्तांतर करण्यात आली. दुसऱ्या विकासकाकडे योजना हस्तांतर होत असताना त्यासाठी जॉईंट व्हेंचर

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा संमतीपत्र दिले असले तरी सोसायटीची मान्यता आहे का ही बाब निश्चितपणे तपासण्यासारखी आहे. निवेदनामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, तसे संमतीपत्र पुढील काळात देणार नाही तोपर्यंत त्या कामासाठी सी.सी.मिळणार नाही. झोपड्या तोडण्याचे काम गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून केले जाते असे सांगण्यात आले आहे. मी पोलीस स्टेशनकडून माहिती मागविली होती. तेथे कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा तक्रार दाखल झालेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे किंवा नाही या दृष्टीकोनातून निश्चितपणे चौकशी केली जाईल. चुकीच्या पध्दतीने काही केले असेल तर त्याबद्दल चौकशी करुन त्यात जर म्हाडाच्या माध्यमातून काही संगनमत होऊन चुकीची गोष्ट घडली असेल तर संबंधितांविरुध्द कारवाई केली जाईल. सभापती महोदय, योगायोगाने आपण प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला आहे. संपूर्ण एसआरए योजनांबाबत ही वस्तुस्थिती आहे. आपल्याला हेही पहावयास हवे की, आरोपामध्ये कितपत तथ्य आहे? 70 टक्क्यापेक्षा अधिक लोक पुढे आल्यानंतर 30 टक्के लोकांकडून वारंवार योजनेला खो घालण्याचा प्रयत्न केला जातो. 3-4 वर्षानंतर विकासकाने कोणत्याही कारणास्तव काम केले नाही तर विकासक बदलण्याचे वातावरण निर्माण झालेले आहे. असे काही कंपू निर्माण झाले आहेत, ज्यांना विकास होऊच नये असे वाटते. दुर्दैवाने त्यांच्या घरी फोन बिल विकासकाने सुरु केल्यामुळे त्यांना वाटते की, विकास न झालेला बरा. ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. सभापती महोदय, मी आपल्या मताशी सहमत आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून दाद मागायला गेल्यानंतर कोणी दखल घेत नाही. त्यासाठी आता हाय पॉवर समिती नेमण्याचे काम केले आहे. अनेक प्रकरणे दाद मागण्यासाठी कोर्टात जातात, आपल्याकडे येतात किंवा शासनाकडे येतात. पुढील काळात हाय पॉवर कमिटी श्री.गौतम चॅटर्जी, सचिव गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली केली आहे. इतर समित्या म्हाडाचे व्ही.पी. आणि सी.ई.ओ.अंतर्गत केल्या आहेत. तक्रारींचा न्यायनिवाडा करण्यासाठी, तत्काळ न्याय देण्यासाठी प्रत्येक महिन्याला समितीने कामकाज करावे असे अभिप्रेत आहे. सभापती महोदय, आपण व्यक्त केलेली बाब ही निश्चितपणे चिंतेची आहे. शासन आणि व्यक्तिश: मी लक्ष घालण्याचा प्रयत्न करेन.

नंतर श्री.भारवि...

अशोधित प्रत / मुद्रणासाठी नाही

उप सभापती : मंत्री महोदय मी आपल्याला उदाहरण दाखल सांगतो. माझ्याकडे एक केस आली. त्या बिल्डरने त्यांना असे सांगितले की, कुठल्याही राजकारण्याला तुम्ही मध्ये आणू नका. मलाही त्याचे नवल वाटले. त्या व्यक्तीला न्याय मिळत नसेल, तो दहा वेळा त्या बिल्डरकडे गेला असेल व त्याने सांगितले की, मी आता थकलो आहे आपण पुढची बैठक त्यांच्याकडे घेऊ या. तेव्हा तो बिल्डर म्हणाला की, मला कुठलाही राजकारणी नको. आपणही राजकारणी आहात, मी देखील राजकारणी आहे म्हणून एका राजकारण्याने दुसऱ्या राजकारण्याकडे केलेली तक्रार आपण गंभीरपणे घ्यावी.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे की, एचपीसी गृहनिर्माण सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमली आहे. दुसरी कमिटी व्ही.पी.म्हाडा यांच्या अध्यक्षतेखाली नेमली आहे. मग यामध्ये नक्की निर्णय कोण घेणार आहे ? सचिव, गृहनिर्माण यांना ह्या प्रश्नाची अत्यंत सखोल जाणीव आहे. त्यामुळे त्यांच्या अध्यक्षतेखाली एकच समिती नेमावी आणि दुसरी समिती बरखास्त करावी, अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, दोन्ही समित्यांची कार्यपद्धती वेगळी आहे आणि कामही वेगळे आहे. एक समिती सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली आहे तर दुसरी समिती श्री.कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली नेमली आहे. श्री.कुंटे देखील गृहनिर्माण विभागाचे सचिव होते. दोघांच्या कामकाजाचे क्षेत्र वेगळे असल्यामुळे एक समिती करण्याचा प्रश्नच येत नाही. दोन्ही समित्यांचा कारभार वेगळा आहे व देण्यात येणाऱ्या तक्रारींचे स्वरूप देखील वेगळे आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आपण मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. एसआरए योजने मध्ये अनेक घोळ आहेत. अनेक वर्षे एसआरए योजना पडून आहेत. माझा सोपा प्रश्न आहे. आज कोणी उठते आणि एसआरए योजना राबविण्याचा प्रयत्न करते. त्यांच्याकडे आर्थिक हमी नसते, त्यांच्याकडे आर्थिक पाठबळ नसते. आर्किटेक्ट उठतो. तो सर्व लोकांना एकत्र करतो आणि योजना तयार करतो. ही योजना तयार झाल्यानंतर दोन चार वर्षे गिऱ्हाईक येते काय याची वाट बघतो आणि त्याला ती योजना विकतो. एसआरए योजना करण्यासाठी एजन्सी आहेत, ज्यांना आपण बिल्डर्स म्हणतो, विकासक म्हणतो. त्यांचे आपण आर्थिक निकषावर रजिस्ट्रेशन करून घेणार आहात काय, त्या आधारेच कोणत्या क्वांटमची एसआरए योजना घेता येईल अशा पद्धतीचे नियंत्रण या सर्व कामांमध्ये आणणार आहात काय ? ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : ही चांगली सूचना आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी जी संकल्पना मांडली आहे त्यासंबंधी राज्याचा गृहनिर्माण राज्य मंत्री या नात्याने मी देखील सूचना केली होती. विकासक दिवाळखोरीत गेले तर त्यांना ब्लॅक लिस्ट करण्याची तरतूदच नाही. त्याला कोणत्या कायद्याच्या तरतुदीनुसार बॅल्क लिस्ट करायचे ? त्यामुळे आता आपण नवीन भूमिका घेतली आहे. प्रत्येक विकासकाला एसआरए मध्ये रजिस्ट्रेशन करावे लागेल. तसे रजिस्ट्रेशन करणे आपण क्रमप्राप्त करू या. आता आपण नवीन भूमिका घेतली आहे. पहिल्यांदा परिशिष्ट 1 होते. त्यानंतर आपण परिशिष्ट 2 आणले. आता आपण परिशिष्ट 3 आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. आर्थिक क्षमता आहे की नाही असा याचा अर्थ होतो. आपला स्लम ॲक्ट माननीय राष्ट्रपती महोदयांकडे मान्यतासाठी पडून आहे. तो मंजूर झाल्यानंतर प्रत्येक विकासकाला एसआरए मध्ये रजिस्ट्रेशन करणे क्रमप्राप्त केले जाईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझे अतिशय स्पष्टपणे मत आहे की, काय खरे आहे, काय खोटे आहे हे पहावे. शासनाने निश्चितच खऱ्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. खोट्याच्या पाठीमागे जाऊ नये. येथे खोटे सभासद झाले आहेत. जी.बी.घेतली नाही. झोपड्या तोडल्या जात आहेत. त्यामुळे लोकांना शॉक बसत असून ते दवाखान्यामध्ये भरती होत आहेत. त्यास पायबंद घालावा. आज झोपड्या तोडल्या जात आहेत. ते आपण थांबविले पाहिजे. याची आपण फेर तपासणी करावी. जे खरे असेल त्याच्या पाठीशी सरकारने उभे रहावे. तेव्हा फेर तपासणीचे आदेश शासन देईल काय आणि झोपड्या तोडण्यास आपण प्रतिबंध कराल काय, एवढाच माझा प्रश्न आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, बेकायदेशीररित्या झोपड्या तोडण्याची भूमिका घेतली जात असेल तर निश्चितपणे ते थांबविण्याचे काम करू. अनधिकृतपणे झोपड्या तोडण्याचे काम आम्ही करू देणार नाही. सर्व पात्र, अपात्र झोपडीधारकांचे रि-व्हेरिफिकेशन करण्याची शासनाची तयारी आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, पोलिसांकडे रिपोर्ट नसतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. मला सांगावयाचे आहे की, पोलीस स्टेशनशी बिल्डरने अगोदरच संगनमत केलेले असते. एसआरए योजना झोपडपट्टीतील लोकांना घरे देण्यासाठी नाही. आज मुंबईमध्ये जमिनी बिलकूल शिल्लक नाहीत. ज्या जमिनी आहेत त्या झोपडपट्टयांच्या खाली आहेत. त्या जमिनी बळकाविण्यासाठी असे सांगितले जाते की, आम्ही तुम्हाला मोफत घर देतो आणि त्यातील 80 लोकांना अपात्र केले जाते. त्या योजनेतून लोकांना पूर्णपणे बाहेर फेकले जाते. बिल्डर पोलीस स्टेशन, स्थानिक नेते यांच्याशी संगनमत करून योजना राबवितो. ती झोपडपट्टीधारकांसाठी नसते. या योजनेवर बिल्डर लॉबीने पूर्णपणे ताबा घेतला आहे. आम्ही जागृती ट्रस्ट तर्फे घर दिलेले आहे. कोल डोंगरी रहिवासी सहायक संघ, मालाड येथे 4 तारखे पासून काही जण उपोषणाला बसले आहेत. उपोषणाला बसलेल्याचे वय 60 वर्षा पेक्षा जास्त आहे. एसआरए योजने संबंधी अधिकाऱ्यांना भेटण्याचा वार सोमवार होता. आता मोठे अधिकारी लोकांना इमारतीमध्ये देखील येऊ देत नाही. भेटत सुद्धा नाही. त्यांचे म्हणणे देखील ऐकून घेत नाही. ही योजना बिल्डर लॉबीने ताब्यात घेतली आहे. अंधेरी येथे आकृती बिल्डरने एसआरए योजना राबविताना बाजूच्या इमारती देखील त्यात येतात असे सांगून तोडल्या. त्याने नंतर 2000 चे परिशिष्ट बनविले. तिथल्या राहणाऱ्या लोकांना काही न देता तुम्ही पोलीस ठाण्यामध्ये जा असे सांगितले. पोलीस ठाण्यामध्ये लोक गेल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावरच केसेस घातल्या आहेत. त्या बिल्डरचे काहीही वाकडे झालेले नाही. अशी अनेक उदाहरणे मी आपल्याला देईन. ॲण्टॉप हिल, शिवडी, गोरेगाव येथील कन्या पाडा इत्यादी उदाहरणे आहेत.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न मांडावा. आपण येथे प्रोजेक्ट रिपोर्ट देत आहात.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आम्ही अनेक वेळा तक्रार दिलेली आहे. या प्रकरणात गांभिर्य आहे. हा विषय हसण्यावारी नेऊ नका. गरिबांसाठी योजना राबविली जाते. त्यांना घरे मिळत नाहीत. ही योजना त्यांच्यासाठी नाही. बिल्डर लॉबीसाठी ही योजना आहे. ती बंद करावी आणि घरे बांधण्याचे वेगळे साधन निर्माण करावे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी येथे एक नवीन प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न देखील चिंता करण्यासारखा आहे. या शहरातील झोपडपट्टीचा विकास करण्याचे काम आपण बिल्डरच्या हाती सोपविले आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. माननीय मुख्यमंत्री आणि मी राज्य शासनाचा एक भाग म्हणून एसपीपीएल निर्माण करण्याचे काम केले. जेथे कोणीही विकासक यायला तयार नाही, लोकांचा विकासकावर विश्वास नसेल आणि 70 टक्क्यांपेक्षा लोक पुढे येत असतील तर राज्य सरकार म्हणून आपण ही योजना का करू नये, अशी आपली संकल्पना आहे. या बाबत सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी पुढाकार घ्यावा. 70 टक्के लोक पुढे येत असतील तर राज्य शासन देखील एसपीपीएलच्या माध्यमातून योजना तयार करेल. एसपीपपीएल राज्य शासनाचा भाग आहे. त्यामुळे आम्ही योजना करायला तयार आहोत. यासाठी मात्र 70 टक्के लोकांनी पुढाकार घेतला पाहिजे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून मी एक बाब निदर्शनास आणून देतो. एसपीपीएला 70 टक्क्याची अट नाही.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अट जरी नसली तरी त्या लोकांवर आपण बुलडोझर फिरवून योजना राबवू शकत नाही. त्या लोकांना आपण सांगू शकत नाही की, आपण आपली घरे रिकामी करा. आम्ही एसपीपीए अंतर्गत विकास करीत आहोत. 70 टक्के अट आहे किंवा नाही हे महत्त्वाचे नाही. 70 टक्क्यांपेक्षा जास्त लोकांचे मत काय आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे.

श्री.सरफरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या योजनेमध्ये येणाऱ्या अडचणी या ठिकाणी सांगितल्या. पिढयान पिढया झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या गोरगरीब लोकांना घरे देण्यासाठी आपण ही योजना राबवीत आहात. परंतु सातरस्त्याला असलेल्या साईबाबानगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या 2 हजार लोकांची हा प्रकल्प राबविण्याची मागणी असतांना दुसऱ्या सात-आठ लोकांनी आपल्याला एक निवेदन दिल्यानंतर आपण त्या प्रकल्पाला स्थगिती दिली. तेथील हजारो लोक हा प्रकल्प होण्याच्या बाजूने असतांना आणि प्रकल्पाचे काम सुरु असतांना केवळ 8 ते 10 लोकांनी आपल्याला पत्र दिल्यानंतर आपण त्या प्रकल्पाला स्थगिती दिली ती आपण त्वरीत उठविणार काय? त्या प्रकल्पाला पुन्हा मान्यता देऊन आपण तो प्रकल्प त्वरित उभारणार काय, आणि गोरगरीब झोपडपट्टीवासीयांना न्याय देणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. या प्रश्नाच्या माध्यमातून त्यांनी सांगितले की, 70 टक्के लोकांनी एकत्र येऊन एखादा प्रकल्प हाती घेतल्यानंतर कुणीतरी आठ ते दहा लोक एकत्र येऊन तो प्रकल्प हद्दपार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा प्रस्ताव अंतिम टप्प्यावर असून त्यांच्याबरोबर चर्चा करुन या लोकांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने माननीय मुख्यमत्र्यांपुढे माननीय सदस्यांचे म्हणणे मांडून ही स्थगिती उठविण्याचा प्रयत्न केला जाईल.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विविध शहरांमध्ये झोपडपट्टीवासीयांसाठी घरे निर्माण करीत असतांना येणाऱ्या अडचणीसंबंधी अनेक माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. प्रश्न असा आहे की, एस.आर.ए. योजनेसंबंधी नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठकींमध्ये या योजनेचा आढावा घेतला जातो. त्या बैठकींना विधानसभेच्या माननीय सदस्यांना बोलाविण्यात येते. परंतु पुणे शहरातील एस.आर.ए. योजनेसंबंधी नेमण्यात आलेल्या समितीला विधानपरिषदेच्या माननीय सदस्यांना बोलाविले जात नाही. अशाप्रकारे वारंवार आमच्यावर अन्याय होत आहे या कडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते.

तालिका सभापती : ही लक्षवेधी सूचना मुंबईसंबंधी आहे, पुण्याची नाही. त्यामुळे आपण या ठिकाणी अतिक्रमण करु नका.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी अतिक्रमण करीत नाही. ज्यावेळी धोरणात्मक प्रश्न विचारला जातो त्यावेळी राज्य स्तरावर शासन विचार करते आणि घेतलेल्या नवीन निर्णयाची माहिती शासन देते. तेव्हा याबाबत आपण निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याबाबत माहिती देणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाची पूर्तता व्हावी याकरिता मी स्वत: आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे मागील आठवडयात यासंबंधी पुढाकार घेतला होता. आता त्याबाबतचा जी.आर. निर्गमित करण्याचे काम शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग विद्यार्थ्यांवर वैद्यकीय उपचारामध्ये शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

मु. शी. : सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग विद्यार्थ्यांवर वैद्यकीय उपचारामध्ये शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इयत्ता पहिली ते दहावी वर्गात शिकणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांचा सर्व शिक्षा अभियानांतर्गत वैद्यकीय तपासणी करुन नाक, कान, घसा, डोळा, हृदयविकार, अस्थी रोग असे आजार असणाऱ्या विद्यार्थ्यांवर वैद्यकीय उपचार करण्यात येत असणे, बीड जिल्ह्यात सर्व्हे नंतर अशा अपंग विद्यार्थ्यांची संख्या १ हजाराहून अधिक असल्याची गंभीर बाब नुकतीच निदर्शनास येणे, या विद्यार्थ्यांवर तातडीने शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असताना जिल्हा प्रशासनाकडून याबाबत कुठलीही कारवाई होत नसणे, मागील वर्षात एकाही अपंग विद्यार्थ्यावर शस्त्रक्रिया झाली नसणे, शस्त्रक्रिया होत नसल्याने विद्यार्थी आणि त्यांचे पालक त्रस्त असणे, शासन मान्यताप्राप्त तसेच प्राथमिक शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या रुग्णालयामधून या विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्याची गरज, विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या या विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना छापील निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, इयत्ता पहिली ते दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची सर्व शिक्षा अभियानांतर्गत वैद्यकीय तपासणी करीत असतांना त्यामध्ये नाक, कान, घसा,डोळा, हृदयविकार, अस्थी रोग असे आजार असणाऱ्या विद्यार्थ्यांवर वैद्यकीय उपचार करण्यात येतात. बीड जिल्ह्यामध्ये अशाप्रकारचा सर्व्हे करण्यात आला, त्यावेळी 1 हजाराहून अधिक अपंग विद्यार्थी आढळून आले. मंत्री महोदयांनी आपल्याला निवेदन सादर केले आहे, त्यामध्ये सन 2011-12 मध्ये बीड जिल्ह्यात 2 हजार 772 शाळांमधील 3 लाख 37 हजार 270 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी देण्यात आलेली आकडेवारी चुकीची आहे. एकूण 3 लाख 37 हजार 270 विद्यार्थ्यांची तपासणी केल्यानंतर त्यामध्ये फक्त 66 विद्यार्थ्यांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. शासनाने नियुक्त केलेल्या पथकामार्फत या अपंग विद्यार्थ्यांची तपासणी केली जाते. त्यांनी अशा अपंग विद्यार्थ्यांची तपासणी केलेली नाही. तेथील पथक संबंधित शाळेतील शिक्षकांवर याची जबाबदारी टाकतात आणि ते लोक तालुक्याच्या ठिकाणी रहातात. अपंग असलेल्या विद्यार्थ्यांवर कोणते उपचार केले पाहिजेत याची शिक्षकांना माहिती नसते. दिनांक 23.8.2010 रोजी जिल्हा शल्य चिकित्सकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र दिले की, आमच्याकडे 66 विद्यार्थी आढळून आले असून त्यांच्यावर आम्ही भविष्यात उपचार करणार आहोत. निवेदनामध्ये 66 विद्यार्थी हे सन 2011-12 मधील असल्याचे म्हटले आहे त्यामुळे हे निवेदन चुकीच्या माहितीवर आधारीत आहे.

लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी आपणास तीन प्रश्न विचारु इच्छितो. तालुक्यामध्ये नेमण्यात आलेल्या पथकाच्या माध्यमातून जिल्ह्यातील अपंग विद्यार्थ्यांची पुन्हा तपासणी करणार काय? ही तपासणी झाल्यानंतर तालुक्यामध्ये तपासणी पथकाची शिबिरे घेणार काय? इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांवर सर्व शिक्षा अभियानातून उपचार केले जातात. माझी विनंती आहे की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अशी एखादी योजना हे शासन भविष्यात आणणार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी माननीय सदस्यांना सर्वप्रथम सांगू इच्छितो की, बीड जिल्ह्याबाबत सन 2008 पासूनची आकडेवारी माझ्याकडे आहे. सन 2011-12 मध्ये 2817

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

शाळांच्या तपासणीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते त्यापैकी 2772 शाळांची फेब्रुवारीपर्यन्त तपासणी करण्यात आली. त्यामध्ये 3 कोटी 81 लाख 74 विद्यार्थ्यांची तपासणी करावयाची होती. त्यामध्ये फेब्रुवारी महिन्यापर्यन्त 3 कोटी 37 लक्ष 270 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत अपंग विद्यार्थ्यांची तपासणी न करता सर्वच विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येते. त्यामध्ये लर्निंग डिसॅबिलिटी, हर्निया, पोलीयो मिलीटीस, मेंटली डिसॉर्डर, डम्ब अँड डिफ, ऑटिझ ाम्, अपेंडीक्स, पाईल्स, थायरॉईड असे वेगवेगळे आजार असून जवळ जवळ 45 आजारांची यादी माझ्याकडे आहे. त्यामध्ये किती विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी किती विद्यार्थी आयडेंटिफाय झाले याची संपूर्ण माहिती माननीय सदस्यांना देवू इच्छितो. या ठिकाणी निवेदनात जी आकडेवारी दिली आहे त्यामध्ये विशेषकरुन सर्जरीसंबंधी आपण सांगितले आहे. हार्ट सर्जरी आणि दुसऱ्या प्रकारच्या वेगवेगळया सर्जरी आहेत. त्यामध्ये एकूण 66 सर्जरी आयडेंटिफाय होत्या. त्यापैकी 33 जणांची सर्जरी करण्याची आवश्यकता होती, हार्ट सर्जरीमध्ये 57 आयडेंटिफाय होत्या त्यापैकी 36 सर्जरी केल्या, 21 सर्जरी बाकी होत्या त्यापैकी 3 जणांचे फॉलोअप केले व 4 विद्यार्थ्यांची पुन्हा सर्जरी करण्याची आवश्यकता वाटली. 3 विद्यार्थ्यांना औषधे देऊन बरे करण्यात आले. आपल्याकडे अजून हार्ट सर्जरीच्या 10 केसेस पेंडींग आहेत. या ठिकाणी देण्यात आलेल्या संख्येबाबत आपल्याला शंका वाटत असेल तर आपण दिलेली माहिती सत्य समजून या संबंधीची माहिती पुन्हा मागवून घेण्यात येईल आणि या संदर्भात आपण सांगाल त्या पध्दतीने चौकशी करण्याची आमची पूर्णपणे तयारी आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून हा कार्यक्रम राबविला जातो असे आपण सांगितले. परंतु शस्त्रक्रियेचा कार्यक्रम हा राज्याच्या जीवनदायी योजनेमधून राबविण्यात येतो.

(यानंतर श्री. अजित शिगम)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

प्रथम शासकीय रुग्णालयात उपचारासाठी गेले पाहिजे तेथे उपचार झाले नाही तर खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावेत. आपण राज्यात चांगले काम करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्री युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी विद्यार्थ्यांसाठी एखादी योजना राबविण्या बाबत सांगितले. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या एनआरएचएम आणि सर्व शिक्षा अभियानांतर्गत ही योजना राबवितो. उच्च शिक्षण विभागाने तशी स्कीम तयार केल्यास त्यांना मदत करण्यात येईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, निवेदनात नमूद केलेले आहे की,"सन 2011-2012 मध्ये माहे फेब्रुवारी 2012 अखरे जिल्ह्यामध्ये 2 हजार 772 शाळेतील 3 लाख 37 हजार 270 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली." माझा प्रश्न आहे की, यामध्ये हृदय रोग असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती होती, त्यांची ऑपरेशन्स झाली काय, सध्या त्यांची परिस्थिती कशी आहे ? 36 विद्यार्थ्यांमध्ये काही हृदयरोग असलेले विद्यार्थी होते असे आपण सांगितले. परंतु निवेदनात नमूद केलेले आहे की, 36 विद्यार्थ्यांना नाक, कान, घसा, डोळा, अस्थीरोग असे आजार होते आणि त्यांची ऑपरेशन्स झालेली आहेत. माझा प्रश्न आहे की, त्या विद्यार्थ्यांची कोणकोणत्या रुग्णालयात ऑपरेशन्स झाली, त्यांची पोस्ट ऑपरेटीव्ह केअर घेतली काय, सध्या त्या विद्यार्थ्यांची परिस्थिती कशी आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण ज्या सर्जरी घेतो त्यामध्ये हार्ट, ऑर्थोपेडीक, हायड्रोसायकल, हर्निया, पाईल्स, अपेन्डिक्स अशा एकूण 45 आजारांची यादी आहे. मी ही सर्व यादी द्यायला तयार आहे. यामध्ये कार्डीॲक सर्जरी महत्वाची आहे. विदर्भातील बॅकलॉग पूर्ण केलेला आहे. आपण कार्डीॲक सर्जरी शासकीय रुग्णालयात करण्याचा प्रयत्न करतो. त्या ठिकाणी होत नसेल तर खाजगी रुग्णयालयात करतो आणि त्याचा फॉलोअप देखील करतो. एखाद्या विद्यार्थ्याला हृदयरोगावरील उपचारासाठी मुंबईला आणावे लागत असेल तर त्याला मुंबईला आणण्यात येते. यापूर्वी देखील अनेक विद्यार्थ्यांना मुंबईत आणून त्यांच्यावर शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना उपचारासाठी मुंबईत आणताना त्यांच्या परिवारासहित आणतो. त्यांना आपण प्रवासाचे भाडे देतो. शिवाय मुंबईत त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची सोय देखील करतो. विद्यार्थ्यांचे ऑपरेशन झाल्यानंतर त्यांना जाण्याचे भाडे देखील देतो. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझे दोनच प्रश्न आहेत. अपंग विद्यार्थ्यांसाठी करेक्टीव्ह सर्जरी करतो काय ? माननीय मंत्री महोदयांनी येथे लर्निंग डिसॲबिलीटी विषयी सांगितले. या आजाराचे अनेक विद्यार्थी ग्रामीण भागात तसेच शहरी भागात पहावयास मिळतात. तेव्हा असा डिस्लेक्सीक आजार असलेल्या विद्यार्थ्यांना कौन्सिलिंग करण्यात येते काय, त्यांच्या पालकांना शिकविण्यात येते काय ? कारण त्यांना सांभाळणे फार कठीण असते. ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर हा प्रश्न भेडसावत आहे. तेव्हा या आजारा बाबत शासन कोणती उपाय योजना करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या स्कीममध्ये लर्निंग डिसॲबिलिटी आजार नाही. या स्कीममध्ये स्पीच डिफॉरमिटीज आजार आहे. मी उत्तरामध्ये सांगितले की, या स्कीममध्ये पोलिओ, हॅन्डीकॅप, मेन्टल डिसऑर्डर, डम्ब ॲन्ड डिफ, स्पीच डिफॉर्मिटीज इत्यादी आजार आहेत. डम्ब ॲन्ड डिफ आजार असलेल्या विद्यार्थ्यांवर जो काही उपचार करणे आवश्यक आहे तो केला जातो. लर्निंग स्पीच डिफॉरमिटीज आजासावर उपचार करण्यात येतो. परंतु लर्निंग डिसॲबिलिटीजसाठी आमच्याकडे वेगळा कार्यक्रम नाही. त्यांच्यासाठी स्पेशल कौन्सिलिंग वगैरे उपचार सर्व शिक्षा अभियानांतर्गत केले जातात. आपल्या स्कीमनुसार विद्यार्थ्यांना कोणता आजार आहे हे समजल्यानंतर त्यानुसार उपचार केले जातात. जर ऑपरेशन करण्याची आवश्यकता असेल तर ऑपरेशन करण्यात येते.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, शासनाच्या कल्याणकारी योजना अकार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे कशा रसातळाला जाऊ शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे त्याकडे पाहता येईल. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली नाही हे लक्षवेधी सूचनेच्या विषयावरुन दिसून येते. आरोग्य तपासणी योग्य पध्दतीने न झाल्यामुळे विद्यार्थी उपचारापासून वंचित राहिलेले आहेत. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी ही सुविधा उपलब्ध करुन दिली नाही त्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

अशुद्धलिखित प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही केंद्र सरकारची योजना आहे आणि राज्य शासन त्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करीत आहे. आतापर्यंत जवळपास 1 कोटी 5 लाख विद्यार्थ्यांची तपासणी झालेली आहे. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, अधिकाऱ्यांकडून काही चूक झाली असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल. जर अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. परंतु या योजनेची अंमलबजावणी बरोबर होत नाही, ही योजना चांगली नाही, असे म्हणणे योग्य नाही. आपण 1 कोटी 5 लाख विद्यार्थ्यांची तपासणी करुन त्यांना बेसिक ट्रिटमेंट दिलेली आहे. गोदिंया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मुंबईतील जे.जे.रुग्णालयात आणून उपचार केलेले आहेत. तसेच काही विद्यार्थ्यांवर खाजगी रुग्णालयात उपचार केलेले आहेत. विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांना देखील मुंबईत आणून त्यांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था केलेली आहे. जवळपास 5 हजार ऑपरेशन्स झालेली आहेत. इतके चांगले काम आम्ही केलेले आहे. एखाद्या अधिकाऱ्याकडून चूक झाली असेल तर त्याची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, निवेदनात जी आकडेवारी दिलेली आहे त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांना काही दुरुस्ती करायची आहे काय ? निवदेनात म्हटले आहे की, एकूण 2 हजार 772 शाळेतील 3 लाख 37 हजार 220 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. कारण प्रत्येक शाळेत हजारच्या वर विद्यार्थी नसतात. तेव्हा माझा प्रश्न आहे की, 2 हजार 772 शाळांमध्ये प्रत्यक्ष किती विद्यार्थी आहेत ? निवेदनात नमूद केलेले आहे की, बीड जिल्हयात एक हजारहून जास्त शस्त्रक्रिया प्रलंबित नाहीत. तेव्हा माझा दुसरा प्रश्न आहे की, किती विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत, त्या केव्हा करण्यात येतील ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये एकूण 2 हजार 772 शाळांमध्ये एकूण 3 लाख 81 विद्यार्थी आहेत. त्यापैकी 3 लाख 37 हजार 270 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यापैकी 3 हजार 800 विद्यार्थ्यांना दुसऱ्या ठिकाणी ट्रीटमेंटसाठी रिफर करण्यात आले. 42 विद्यार्थ्यांवर हृदयशस्त्रक्रिया झालेल्या आहेत. 32 विद्यार्थ्यांवर वेगळ्या प्रकारची ऑपरेशन्स झालेली आहेत. फक्त 10 विद्यार्थ्यांची ऑपरेशन्स करायची आहेत आणि ती सुध्दा लवकर करण्यात येतील. बीड जिल्ह्यात ऑपरेशन झाले नाही तर औरंगाबाद येथे करण्यात येईल आणि तेथे झाले नाही तर मुंबईला आणून करण्यात येईल.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, निवेदनातील माहिती असत्य स्वरुपाची आहे. मी या ठिकाणी जी माहिती दिली त्याचा विचार करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, निवेदनात नमूद केलेले आहे की, उपाचारासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 66 आहे. सन 2011-2012 मध्ये एकाही विद्यार्थ्यावर उपचार झालेले नाही हे मी येथे जबाबदारीने सांगत आहे. मी लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्याबाबत चौकशी झाली तेव्हा काल अंबेजोगाईच्या ग्रामीण रुग्णालयात 84 विद्यार्थ्यांना उपचारासाठी पाठविण्यात आले. त्या अपंग विद्यार्थ्यांची ही अवस्था आहे. त्या विद्यार्थ्यांची आपल्या पथकामार्फत तपासणी झालेली नाही. ही तपासणी त्यांनी शिक्षकांवर टाकली. आपण तपासणी न केल्यामुळे आपणास आजारी विद्यार्थी सापडले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री.बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे .....

मला असे म्हणावयाचे आहे की, ही लक्षवेधी सूचना लागल्यानंतर काल हे 84 विद्यार्थी उपचारासाठी गेले ही वस्तुस्थिती आहे का ? माननीय मंत्री महोदयांनी खाजगी आणि सरकारी दवाखान्याच्या संदर्भात उत्तर दिले. आतापर्यंत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेने ज्यांना मान्यता दिलेली आहे अशा दवाखान्यांनाच उपचार करण्याची परवानगी आहे तसेच सरकारी दवाखान्यात उपचार करण्याची परवानगी आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एवढा लोड वाढलेला आहे की, उपचारपात्र लोक या दवाखान्यांमध्ये उपचार कधी होईल याची वाट बघत आहेत. म्हणून काही खाजगी दवाखान्यांतून सुध्दा उपचार होतील का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2009-2010 मध्ये एकूण 287 विद्यार्थी शस्त्रक्रियेसाठी आयडेंटिफाय केले आणि त्या सर्व 287 विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. 2010-2011 मध्ये 330 विद्यार्थी शस्त्रक्रियेसाठी आयडेंटिफाय केले आणि त्या सर्व 330 विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. 2011-2012 मध्ये फेब्रुवारीपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितल्याप्रमाणे 66 विद्यार्थी शस्त्रक्रियेसाठी आयडेंटिफाय केले आणि त्यापैकी 30 विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. 36 विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया बाकी आहेत. असे एकूण 683 विद्यार्थी होते. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काल अंबेजोगाईला नेऊन 66 विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या. मी आताच तेथील पोलीस अधीक्षकांना फोन करुन ही बाब तपासण्यास सांगतो आणि जर हे खरे असेल तर त्या अधिकाऱ्यांवर लगेच कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : इयत्ता अकरावीकरिता शासनाने सुरु केलेल्या ऑनलाईन्स प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यात पसरलेला असंतोष

मु. शी. : इयत्ता अकरावीकरिता शासनाने सुरु केलेल्या ऑनलाईन्स प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यात पसरलेला असंतोष यासंबंधी डॉ. दीपक सावंत, श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इयत्ता अकरावी करिता शासनाने सुरु केलेल्या ऑन लाईन्स प्रवेश प्रक्रियेतील त्रुटीमुळे व दोषामुळे गत वर्षी लाखो प्रवेशार्थी विद्यार्थ्यांना भोगावा लागलेला मनस्ताप, सदर ऑनलाईन्स प्रवेशाविरुद्ध लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, पालक व पत्रकार यांच्याकडून शासनाकडे आलेल्या तक्रारी व सूचना, ऑनलाईन्स प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या निवडीसाठीचे असलेले 35 पर्याय हे तापदायक व अनावश्यक असून त्यात सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता, ऑन लाईन्स प्रवेश प्रक्रिया क्लिष्ट असल्याने ती रद्द करण्याची राज्यातील शाळा-कॉलेजच्या प्राचार्यांच्या व विद्यार्थी संघटनाकडून होत असलेली मागणी, सदर ऑन लाईन्स प्रवेशाबाबत फेरविचार करण्याची किंवा त्यातील त्रुटी दूर करण्याबाबत दाखविलेली अक्षम्य उदासीनता, परिणामी लाखो विद्यार्थ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अकरावीकरिता ऑनलाईन प्रवेशाची जी सोय गेल्या काही वर्षात राज्य शासनातर्फे सुरु झालेली आहे त्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. गेल्या काही वर्षामध्ये ही ऑनलाईन पध्दत सुरु केली आणि या ऑनलाईनमध्ये बरेच घोटाळे झाले. एमकेसीएल फेल झाले. पहिल्यांदा सर्व्हर फेल झाला होता. त्यानंतर आपण अमेरिकेहून देखील सर्व्हर मागविला. तो सर्व्हर चांगला आहे असे तत्कालीन माननीय मंत्री महोदयांनी सांगितले तरी सुध्दा सातत्याने अनेक प्रश्न निर्माण झाले. गेल्या वर्षी देखील प्रश्न निर्माण झाले. गेल्या वर्षी जवळजवळ 40 हजार सिट्स रिक्त राहिल्या, ही वस्तुस्थिती आहे. 75 टक्के लोकांना ऑफलाईन आणि 25 टक्के लोकांना ऑनलाईन प्रवेश मिळाले, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी 14 सदस्यांची एक समिती नेमली. आम्ही देखील या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांना भेटलो होतो व या सगळ्या अडचणी त्यांच्या समोर मांडल्या होत्या. काही प्राध्यापक सुध्दा भेटले होते. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये एक नवीन फॉर्म्युला अंगीकारला. त्याचे सर्व विवरण लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात दिलेले आहे. हे सगळे मुद्दे जरी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले असले तरी यामध्ये काही प्रश्न अजूनही अनुत्तरित राहतात.

सभापती महोदय, आता डायरेक्ट वेबसाईटवर गुणपत्रिका लोड करणार असे वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाले. या निवेदनामध्ये त्याबाबत काहीही म्हटलेले नाही. ही गुणपत्रिका आता डायरेक्ट लोड करणार त्या बाबतीत माझा प्रश्न असा आहे की, या गुणपत्रिका लोड होताना असताना जर त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये काही चूक झाली तर त्याला जबाबदार कोण ? ही गुणपत्रिका लोड झाल्यानंतर त्याची झेरॉक्स कॉपी त्या विद्यार्थ्याला मिळणार. तो विद्यार्थी ती झेरॉक्स कॉपी घेऊन संबंधित कॉलेजमध्ये जाणार आणि मग त्याला ओरिजनल सर्टिफिकेट मिळणार अशी माझी माहिती आहे. हे चुकीचे असेल तर माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. आता मुंबई विद्यापीठाकडून सेंटर्सच्या बाबतीत चूक झाली. गेल्या वेळी एमकेसीएलने खूप घोळ घातलेला होता. त्यामुळे एमकेसीएलवर लोकांचा विश्वास नाही. जर या गुणपत्रिकेमध्ये चूक झाली, लोड करताना चूक झाली, मॅन्युअल पध्दतीने चूक झाली तर त्याला जबाबदार कोण आणि ती चूक कशी सुधारणार ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, निवेदनामध्ये बायफोकलच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. काही ठराविक विद्यार्थी बायफोकलला जातात. यामध्ये बायफोकलचा विषय नाही. निवेदनामध्ये "पहिल्या गटामध्ये संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआर) पसंतीक्रमानुसार किमान 15 (अनिवार्य) व कमाल 30 कनिष्ठ महाविद्यालये" असा उल्लेख केलेला आहे. कमाल 30 ही सोय पूर्वी सुध्दा होती. मग आपण कमाल 30 असे कशाला ठेवले ? आपण म्हटले आहे की, आम्ही पसंतीक्रम कमी केलेला आहे. मग किमान आणि कमाल या बाबतीत लोकांनी काय ठरवावयाचे ? त्यांनी किमान भरावयाचे की कमाल भरावयाचे ? आपल्याकडे अकरावीला प्रवेश घेणारे लोक तेवढे शिक्षित नाहीत. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचा परिणाम त्या विद्यार्थ्यांच्या फॉर्म भरण्यावर होतो आणि त्यात चूक झाली तर बोरिवलीचा विद्यार्थी मुंबईत फेकला जातो आणि मुंबईचा विद्यार्थी डोंबिवलीमध्ये फेकला जातो. गेल्या वर्षी अशा प्रकारच्या अनेक केसेस झालेल्या आहेत. त्यामुळे ही जी कमाल आणि किमान मर्यादा आहे ती एकच ठेवणार का ? ही मर्यादा त्याच्या रिजनमधील 15 कॉलेजेसपुरती मर्यादित ठेवणार का ? दुसऱ्या गटामध्ये सुध्दा असेच सांगितले आहे. तिसरा महत्वाचा प्रश्न बेटरमेंटचा आहे. आपण बेटरमेंटची संधी देणार आहात. समजा मला पार्ले कॉलेज मिळाले आणि बेटरमेंटमध्ये संधी मिळाली तर मला रुईया कॉलेजमध्ये किंवा रुपारेल कॉलेजमध्ये जाण्याची परवानगी असेल. हा बेटरमेंटचा निर्णय नेमका कधी होणार ? आपण असे म्हटले आहे की, ही प्रक्रिया आपल्याला काही दिवसातच पूर्ण करावी लागणार आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यापर्यंत प्रवेश चालू होते. या बेटरमेंटमुळे जेवढा वेळ लागणार होता तेवढाच वेळ लागणार आहे का ? विद्यार्थी तितक्याच प्रतिक्षेत राहणार का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, 2009-2010, 2010-2011 आणि 2011-2012 या शैक्षणिक वर्षात मुंबई महानगर क्षेत्रात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अवलंबिण्यात आली आणि निश्चितच ही गोष्ट मान्य केली पाहिजे की, विद्यार्थ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानामुळे त्यांच्या गुणवत्तेनुसार आणि पसंतीच्या क्रमानुसार प्रवेश मिळालेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, मागच्या वर्षी या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये काही त्रुटी आढळून आल्या. शिक्षण मंत्री म्हणून मी मागच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा .....

वर्षी कार्यभार स्वीकारला. ते माझेही पहिलेच वर्ष होते आणि अत्यंत काळजीपूर्वक मी सुध्दा ऑनलाईन सिस्टीमचा अभ्यास करीत होतो. ज्यावेळी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली त्यावेळी एक गोष्ट लक्षात आली की, यासाठी लागलेला एकूण कालावधी 42 दिवसांचा होता. जरी हा अधिकृत कालावधी 42 दिवसांचा असला तरी त्याच्या अगोदर निकालाच्या नंतर आपण 10 दिवस प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली नव्हती. त्यामुळे यामध्ये आपले एकूण 52 दिवस गेले होते.

सभापती महोदय, शेवटी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ही संगणकावर आधारित आहे. जग हे संगणकाकडे चालले आहे. मला आठवते की, मी ज्यावेळी मुंबईत कॉलेजमध्ये शिकावयास आलो त्यावेळी वेगवेगळ्या दिवशी पहाटे चार कॉलेजच्या ठिकाणी जाऊन उभे राहावे लागत होते. कोणाच्याही दारामध्ये जाऊन उभे राहण्याची गरज भासू नये म्हणून ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यामध्ये ज्या त्रुटी होत्या त्या दूर करण्यासाठी आपण एक्सपटर्स म्हणजे प्राचार्य, तांत्रिक सल्लागार, पालक-शिक्षक प्रतिनिधी, पत्रकार आणि वेगवेगळे सदस्य या सगळ्यांची समिती केली. त्यांनी दिलेला फॉर्म्युला हा सगळ्यांनी एकमताने दिलेला आहे. सगळ्यात महत्वाची गोष्ट अशी आहे की, निकाल लागल्यानंतर आपण दहा दिवस प्रवेश प्रक्रिया सुरु करु शकत नाही. याचे कारण असे आहे की, गुणपत्रिका प्रिन्टेड फॉर्ममध्ये मिळत नाही. आपण यावेळी पूर्ण व्यवस्था केलेली आहे की, ज्या ठिकाणी गुणपत्रिका छापल्या जातात म्हणजे शेवटी ज्या ठिकाणी गुणपत्रिका तयार होते तिथून सिट नंबर टाकल्यानंतर त्याला त्याचे पूर्ण मार्क्स मिळणार आहेत. त्यामध्ये चूक होण्याचे काहीही कारण नाही. दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, बायफोकलमध्ये सुध्दा 10 दिवस वाचणार आहेत. मी आपल्याला खात्री पूर्वक सांगू इच्छितो की, यावळेला आपण ज्या प्रक्रियेचा वापर करीत आहोत त्यामध्ये जे एकूण 42 अधिक 10 असे 52 दिवस लागत होते त्याऐवजी ही प्रवेश प्रक्रिया निश्चितपणे 25 दिवसांवर येणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, बेटरमेंटसंबंधी मागील वर्षी एक गोष्ट लक्षात आली आहे. 65 टक्के गुण मिळालेला विद्यार्थी 95 टक्क्याचा कटऑफ लागलेल्या कॉलेजचे नाव अर्जामध्ये भरतो. त्यामुळे या वेळी संगणकावरच ज्यावेळी तो अर्ज भरेल मागील वर्षी कटऑफ 90 टक्के असेल तर 85 टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांने त्या कॉलेजसाठी अर्ज केला असेल तर त्याबाबत त्याचे काही म्हणणे असणार नाही. परंतु 84 टक्के मिळविलेल्या विद्यार्थ्यांने जर फॉर्म भरला तर संगणकामध्ये कृपया या कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्याची खात्री नाही अशा प्रकारचा फ्लॅश येणार आहे. सभापती महोदय, प्रत्येक विद्यार्थ्याला अपेक्षित असलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा असे वाटत असते. परंतु फॉर्म भरत असताना कटऑफमध्ये व त्याला मिळालेल्या गुणामध्ये 25-30 टक्क्याचा फरक आहे ते तो लक्षात घेत नाही. त्यामुळे यावेळी असे करण्यात येत आहे की, कटऑफमध्ये 5 टक्क्यापेक्षा फरक असेल तर त्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्याची खात्री नाही अशा प्रकारचा फ्लॅश येणार आहे. या संदेशाचा त्या विद्यार्थ्याला फायदा होणार आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एमएमआरडीए रिजनमधील कॉलेजची किती नावे द्यावयाची, झोनमधील कॉलेजची किती नावे द्यावयाची, वॉर्डमधील कॉलेजची नावे किती द्यावयाची, कमाल व किमान नावे याबाबत प्रश्न विचारला आहे. यासंबंधी वेगवेगळ्या कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक व पालक संघटना ज्यांनी याबाबत खूप अनुभव घेतलेला आहे, त्या सर्वांनी मिळून हा फॉर्म्युला दिलेला आहे. परंतु यासाठी प्रशिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, संगणक तज्ज्ञ यांचे प्रशिक्षण आता सुरु करण्यात आलेले आहे आणि एप्रिल, 2012 अखेर प्रवेश पुस्तिका सुध्दा त्यांना उपलब्ध होणार आहे.

सभापती महोदय, विद्यार्थ्याला बेटरमेंट एकदाच मिळणार आहे. बेटरमेटसंबंधी मागील वेळी एक चूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. एका विद्यार्थ्याला प्रवेश मिळाल्यानंतर नियमानुसार त्याला बेटरमेटची एक संधी उपलब्ध होती. बेटरमेंटची संधी घेऊन त्या विद्यार्थ्याने दुसऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. परंतु पहिल्या कॉलेजमध्ये त्याला प्रवेश मिळाला होता त्या कॉलेजने त्याचा प्रवेश रद्द केला नव्हता. त्यामुळे या वर्षी आता फरक केला जाणार आहे. प्रवेश अर्जाची पावती आणि प्रवेश रद्द केल्याची पावती देण्याचे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे आपल्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिस्टिममध्ये प्रवेश रद्द केल्याची जागा उपलब्ध असल्याचे दिसून येईल. परिणामत: अनेक विद्यार्थ्यांना बेटरमेंटची संधी निश्चितपणे मिळणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एका बाजूला विशिष्ट कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे अशी पालकांची व विद्यार्थ्यांची मानसिकता असते. दुसऱ्या बाजूला स्थानिक प्रवेश मिळण्यामध्ये अडचणी येतात आणि तिस-या बाजूला महाविद्यालयाकडून ऑफ लाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्याची मागणी केली जाते. याशिवाय अनेक प्रश्न यात गुंतलेले आहेत. माननीय शिक्षण मंत्र्यांना माझी विनंती आहे की, एमएमआरडीए रिजनमधील चारही शिक्षक व पदवीधर आमदार व प्राचार्यांबरोबर एकत्र बसून यातून मार्ग काढला तर ते सोयीस्कर होईल. त्यासाठी मंत्री महोदय बैठक बोलविणार आहेत काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शासनाने या वर्षाच्या प्रवेशासंबंधीची पूर्ण योजना तयार केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार बैठक घेण्याबाबत माझी केव्हाही तयारी आहे. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे बैठक घेण्यास काहीच हरकत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ऑन लाईन प्रवेश पध्दती ही बदलत्या परिस्थितीनुसार सर्वांनाच मान्य आहे. परंतु प्रत्यक्षात या प्रक्रियेतून प्रवेश घेत असताना येणाऱ्या अडचणी, विद्यार्थ्यांना होणारा मनस्ताप, पालकांना होणारा त्रास हे लक्षात घेता माझ्या माहितीप्रमाणे किमान 200 पेक्षा अधिक पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या सूचना, निवेदने आणि माझे स्वत:चे निवेदन मी मंत्री महोदयांकडे दिलेले आहे. परंतु त्या निवेदनाची दखल घेतल्याचे उत्तरावरुन दिसून येत नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही तर निदान त्या भागातील कॉलेजमध्ये तरी प्रवेश मिळाला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असते. ज्या शाळेमध्ये त्यांनी 10 वी पर्यंत शिक्षण घेतलेले असते, त्याच शाळेत 11 वी व 12 वी पर्यतचे कॉलेजही असते. तेथे त्याला प्रवेश मिळत नाही. त्या विद्यार्थ्याला भाईंदर येथील कॉलेजमध्ये प्रवेश मिळतो. बदलापूरच्या विद्यार्थ्यांने प्राथम्यक्रम दिलेला नसताना त्याला भाईंदर येथे प्रवेश मिळाला तर त्या ठिकाणी तो जाऊ शकत नाही. म्हणून एकंदरीत या अडचणी विचारात घेता ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेतही जागा रिक्त राहिल्यामुळे ऑफ लाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करावी लागते. म्हणून या प्रवेश प्रक्रियेसंबंधी फेरविचार करण्याबाबत शासन बैठक घेणार आहे काय ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : विद्यार्थ्यांना प्रवेश घेत असताना त्रास होऊ नये यासाठी मागील वर्षी आलेल्या अडचणी आणि सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊनच शासनाने एक तज्ज्ञ समिती गठित केली होती. या समितीने विद्यार्थ्यांना व पालकांना आलेल्या अडचणींचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी एक चांगला मुद्दा मांडला आहे. अंबरनाथ येथे राहणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला चांगले गुण मिळाले नसल्यामुळे मागील वर्षी त्याला विरार येथे प्रवेश मिळाला असेल हे सत्य आहे. त्यामुळे या वर्षापासून एक महत्वाचा बदल केलेला आहे. पसंतीक्रम भरत असताना विद्यार्थ्याने निवडलेल्या वॉर्डमधील माध्यमिक शाळेशी संलग्न असलेले कनिष्ठ महाविद्यालय आहे अशा 5 कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे अनिवार्य केलेले आहे. त्यामुळे कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्याच विभागामध्ये प्रवेश मिळण्याची खात्री मिळणार आहे. त्याशिवाय सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक घेण्यास मी तयार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमच्या कुटुंबाशी संबंधित असलेल्या दोन विद्यार्थींना गेल्या वर्षी ऑन लाईन पध्दतीनुसार अतिशय व्यवस्थितपणे प्रवेश मिळालेला आहे. ज्या मुलांना चांगले गुण आहेत त्यांना बरेच ऑप्शन उपलब्ध असतात. नवी मुंबईतील मुलांना चांगले गुण मिळालेले आहेत, त्या मुलांनी त्यांच्याच भागातील कॉलेजचे पसंतीक्रम लिहून दिले पाहिजेत असे आताच मंत्री महोदयांनी सांगितले आहे. नवी मुंबईतील मुलांना मुंबईतील कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावयाचा असतो. त्या संदर्भात अडचणी येतात. तसेच ज्यांना मध्यम गुण मिळालेले आहेत त्या मुलांना त्या भागातील कॉलेजचे पसंतीक्रम लिहून देण्याबरोबरच काही ठराविक विषयासाठी ठराविक कॉलेजची पसंती असू शकते.

दुसरे असे की, ऑन लाईन पध्दतीनुसार प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक माहिती लिहून देणे अनिवार्य असते. विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती ओपन राहते. यासंबंधी विद्यार्थ्यांनी आमच्याकडे निरीक्षणे दिलेली आहेत. त्यांचे मोबाईल नंबर्स, त्यांचे पसंतीक्रम हे ओपन राहतात. एमकेसीएलच्या वेबसाईटवर ही माहिती असते. ही माहिती पाहणाऱ्यांमध्ये काही चांगले लोक असतात असे गृहित धरु, पण विद्यार्थ्यांची सर्व माहिती ओपन राहते. ते सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नाही असे बऱ्याच विद्यार्थी व विद्यार्थ्यांनींचे म्हणणे आहे. कोणत्या विद्यार्थ्याने कोणता पसंतीक्रम लिहून दिला आहे हे एकमेकाला माहीत असण्याची गरज नाही. त्यामुळे ती माहिती फक्त कॉलेजला दिसेल तसेच त्या विद्यार्थ्याला स्वत:च्या कोडनुसार दिसेल अशी व्यवस्था करता

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...

येईल काय ? तिसरा मुद्दा असा आहे की, जिल्हानिहाय प्रवेश नियंत्रण समित्या स्थापन केलेल्या आहेत त्यासंबंधी कोणाला तक्रार करावयाची असेल तर त्यासाठी कोणाकडे व कशाप्रकारे संपर्क साधला पाहिजे, यासाठी कोणती यंत्रणा अस्त्वित आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई यांनी विद्यार्थ्यांनी ऑन लाईन प्रवेशासाठी भरलेल्या वैयक्तिक माहितीच्या गोपनीयतेबाबत प्रश्न विचारलेला आहे. मी एमकेसीएल व तज्ज्ञ यांच्यासोबत या प्रश्नातून मार्ग काढण्यादृष्टीने चर्चा करीन. सन्माननीय सदस्यांनी ही चांगली सूचना केलेली आहे. नवी मुंबई किंवा विरार येथील विद्यार्थ्याला चांगले गुण मिळाले असतील आणि त्याला मुंबईतील कॉलेजमध्ये प्रवेश पाहिजे असेल तर तो तसा पसंतीक्रम लिहून देऊ शकतो. त्या विद्यार्थ्याला मुंबईत प्रवेश मिळू शकतो. पण ज्या विद्यार्थ्याला कमी गुण मिळालेले असतात त्याला कारण नसताना एका ठिकाणाहून दुसरीकडे लांब प्रवेश दिला जातो हेही योग्य नाही. म्हणून मी मघाशी असे म्हटले आहे की, शाळेला संलग्न असलेल्या 5 कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम लिहून देण्याचे अनिवार्य केलेले आहे.

प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हानिहाय प्रवेश नियंत्रण समित्या स्थापन केलेल्या आहेत. त्यामध्ये संबंधित शिक्षण निरीक्षक, दोन माध्यमिक शाळांशी सलंग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, एक वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षण उपनिरीक्षक आहेत. त्यांचे टेलिफोन क्रमांक सर्व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येतील. या समित्यांच्या माध्यमातून प्रत्येक वॉर्डमध्ये प्रवेश प्रक्रियेचे नियंत्रण करण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : मंत्री महोदयांनी 11वीच्या प्रवेशासंबंधी सर्व सांगितले असले तरी या वर्षी गोंधळ उडणारच आहे. पुढील अधिवेशनामध्ये या प्रश्नावर पुन्हा चर्चा करावी लागेल. मी एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो की, जी 14 सदस्यांची टीम नेमलेली होती त्यामधील एका सदस्याने इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये असे मत प्रदर्शित केलेले आहे की, अशा प्रकारे फेक गुणपत्रिका लोड केली जाऊ शकते. या संदर्भात मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ? प्रवेशासंबंधी ऑन लाईनचाच अट्टाहास का धरण्यात येत आहे ? ऑफ लाईन चा पर्याय नंतर करण्यापेक्षा आताच तो प्रर्याय का निवडला जात नाही ? आपण सन्माननीय सदस्यांची बैठक बोलावता. पण त्यांच्या सूचना ऐकून घेतल्या तरच त्या बैठकीचा उपयोग होईल अन्यथा त्या बैठकीला काही अर्थ राहाणार नाही.

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी गुणपत्रिकेमध्ये फेक इन्फर्मेशन येऊ शकते असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी मार्कशीट तयार होते त्याच ठिकाणी ती लोड होणार असल्यामुळे त्यामध्ये कोणतेही दोष रहाणार नाहीत. सन्माननीय सदस्यांकडून चांगल्या सूचना याव्यात या हेतूने बैठक बोलावली जाते. परंतु जे आहे ते वाईटच आहे असे म्हणून कसे चालेल ? शेवटी ही एक पक्रिया आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कोणीही शंभर टक्के परिपूर्ण नसतो. आपण एका दिशेने काम करतो. मागच्या वेळी ज्या चुका झाल्या त्या पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. त्यादृष्टीने सर्व प्रयत्न करण्यात आलेले आहेत. मुंबई मेट्रोपोलिटन रिजन मधील 11वीमध्ये प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना मी आश्वस्त करु इच्छितो की, या वर्षीची ऑन लाईन ॲडमिशन प्रक्रिया चांगल्या प्रकारे कमी वेळेत आणि कमी त्रासात होईल आणि सर्वांना प्रवेश मिळेल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाठ्यपुस्तक मंडळ बालभारती या स्वायत्त संस्थेत नियुक्त्या आणि बढत्यांचा झालेला अनागोंदी कारभार

मु. शी. : पाठ्यपुस्तक मंडळ बालभारती या स्वायत्त संस्थेत नियुक्त्या आणि बढत्यांचा झालेला अनागोंदी कारभार यासंबंधी प्रा. सुरेश नवले, सर्वश्री एस.क्यू.जमा, राजन तेली व भाई जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील पाठयपुस्तक मंडळ बालभारती या स्वायत्त संस्थेमध्ये गेल्या काही वर्षामध्ये नियुक्त्या आणि बढत्यांचा झालेला अनागोंदी कारभार, गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी चाळणी झालेली पाठयपुस्तके जारी झाल्यानंतर आणि विद्यार्थी-पालकांचा मोठा रोष ओढवल्यानंतरही बालभारती यांनी त्यांची दखल न घेणे, विज्ञानासारख्या महत्वाच्या विषयाला गेली अनेक वर्षे सक्षम अधिकारी लाभलेला नसणे, पाठयपुस्तकांची छपाई करण्यासाठी स्वतंत्र विभाग असणे, या विभागाचे प्रमुख नियंत्रक (तांत्रिक पद) असून या पदावर उच्चशिक्षित व व्यवस्थापकीय स्तराचा अनुभव असलेल्या व्यक्तीची नियुक्ती होणे अपेक्षित असताना या पदावर शैक्षणिक आणि अनुभवाच्या सर्व अटी डावलून संस्थेतीलच एका तृतीय श्रेणीतील तांत्रिक सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीला बसविण्यात येणे, अनेक पदांच्या बाबतीत असे धोरण अवलंबिण्यात आलेले असणे, एकूणच या सर्व अनागोंदी कारभाराची तातडीने चौकशी व कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : या लक्षवेधीला दिलेले निवेदन आटोपशीर आणि सुरेख आहे. बालभारती ही संस्कार भारती व्हावी ही अपेक्षा आहे. मंत्री महोदयांसारखी सौम्य, सालस, समृद्ध, संपन्न अशी विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्वे घडावीत ही आमची अपेक्षा आहे. नेमलेले सल्लागार मंडळ सक्षम आणि तज्ज्ञ असण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने योग्य व्यक्तीची मंडळावर निवड करण्यात येईल काय ? नियामक मंडळाच्या मान्यतेनंतर विज्ञान विशेषाधिकारी हे पद भरण्यात येईल असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. हे पद तात्काळ भरण्यात येईल काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी 2 प्रश्न विचारले. त्यामधील एक प्रश्न सल्लागार मंडळासंबंधी आहे. ही गोष्ट खरी आहे की, विषयवार सल्लागार असतात. मध्यंतरी नियम 260 अन्वये या विषयावर देखील चर्चा झालेली आहे. सल्लागार मंडळाचा दर्जा अधिक वाढला पाहिजे. त्यादृष्टीने येणा-या पुढच्या काळामध्ये यामध्ये फरक दिसेल. विशेषाधिकारी विज्ञान हे पद केव्हा भरणार असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न आहे. त्या ठिकाणी एक भाषेसाठी आणि दुसरा भाषेतरसाठी असे दोन विद्या सचिव आहेत. ही दोन्ही पदे भरलेली आहेत. एकूण विशेषाधिकारी 15 असून त्यापैकी 12 पदे भरलेली आहेत. 3 पदे भरावयाची आहेत. विशेषाधिकारी विज्ञान हे पद भरण्यासाठी उमेदवार एमएससी, डीएड असावा लागतो आणि त्याला 5 वर्षाचा शिकविण्याचा अनुभव असावा लागतो. हे पद भरण्यासाठी जाहिरात दिली होती. परंतु अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध झाला नाही. येणा-या तीन महिन्याच्या आत हे पद भरले जाईल.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयासंबंधी सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे. बाहेर अशी चर्चा सुरु आहे की, आता झालेल्या कॅबिनेट मिटींगमध्ये कॅगचा अहवाल मांडला गेला आणि तो फेटाळला गेला. त्यासाठी ॲडव्होकेट जनरल यांना बोलावण्यात आले होते. आमच्या मनात यामुळे असा संभ्रम निर्माण झालेला आहे की, जो कॅगचा अहवाल फुटलेला आहे तो फेटाळण्यात आला की अनेक्चरमध्ये काही वेगळे आहे. हा कॅगचा अहवाल पहिल्यांदाच रिजेक्ट होणार आहे. अशा त-हेने हा अहवाल रिजेक्ट करता येतो का हा आमच्या मनामध्ये प्रश्न आहे. कोणीतरी म्हणाले की, त्या अहवालामध्ये लवासावर खूप आक्षेप घेण्यात आलेले आहेत. हा कॅगचा अहवाल 16 तारखेला सदनापुढे ठेवण्यात येणार आहे. कॅबिनेटमध्ये मंत्र्यांना देण्यात आलेला अहवाल त्यांच्याकडून पुन्हा ताब्यात घेण्यात आला. हा अहवाल मंत्र्यांकडून बाहेर फुटेल म्हणून त्यांच्याकडून परत घेण्यात आला काय ? मंत्री महोदयांवर एवढा अविश्वास का ? सभापती महोदय, आम्ही जेव्हा दुपारी महाराष्ट्र एकीकरण समितीला भेट देण्यासाठी गेलो होतो त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री तेथे नव्हते. म्हणून मी विचारणा केली तेव्हा ही माहिती समोर आली. मला जी माहिती प्राप्त झाली ती असत्य असावी अशी माझी इच्छा आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात खुलासा केला तर आमच्या मनातील संभ्रम दूर होईल.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आजच्या कामकाजामध्ये हा विषय नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भावना समजून घ्याव्यात.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोलीस पाटलांचे थकीत मानधन देण्याबाबत श्री. परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक ग्रामपंचायतींना तंटामुक्ती अभियानांतर्गत बक्षीसे मिळालेली आहेत. तंटामुक्तीच्या कार्यक्रमामध्ये विशेषकरुन जिल्हयातील पोलीस पाटील पुढाकार घेतात. राज्य शासनाच्या गृह विभागाने गावातील पोलीस पाटील यांचे मानधन 800 रुपयावरुन 3 हजार रुपये वाढविण्यात येऊनही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 500 पोलीस पाटील यांचे मानधन गेल्या चार महिन्यापासून दिले गेले नाही, त्यामुळे त्यांना अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत जिल्हास्तरावर विचारणा केली असता शासनस्तरावरुन मानधन रोखण्यात आल्याचे सांगण्यात आले. तेव्हा या पोलीस पाटीलांचे थकीत मानधन देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पन्हाळेदुर्गकडे जाणा-या लाठीमाल-गावराई व दापोली-वाकवली-फणसूमार्ग

या रस्त्यावर होत असलेले अपघात याबाबत श्री.जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"दापोली (जिल्हा रत्नागिरी) तालुक्यातील कोकणातील "शिलाहार" राज्याची राजधानी व ऐतिहासिक लेण्यांमुळे जगाच्या नकाशावर पन्हाळेदुर्ग नाव कोरले असून या ठिकाणी अनेक पर्यटकाची गर्दी होत आहे.पन्हाळेदुर्गकडे जाणारे दापोली लाठीमाल-गावराई व दापोली-वाकवली-फणसूमार्ग ह्या दोन्ही रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. त्यामुळे पर्यटनावर याचा परिणाम झाला असून स्थानिकांसाठी हे मार्ग धोकादायक झालेले आहेत.

पन्हाळेदुर्ग हे गाव डोंगराच्या पायथ्याशी वसलेले असून सुमारे 2 हजार फूट घाट चढ-उतार करुन वाहनांना प्रवास करावा लागतो. त्यामुळे मार्च 2012च्या शेवटच्या आठवड्यात 7 अपघात होऊन प्रवाशांना आपले हातपाय गमवावे लागले आहेत. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष पसरला असून याबाबत शासनाकडून काहीच कार्यवाही झाली नाही तर ग्रामस्थ तहसीलदार कार्यालय, दापोली येथे धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा दिलेला आहे.

सबब शासनाने ह्या गंभीर प्रश्नी तातडीने लक्ष घालून आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

--

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन परिषद या संस्थेने 11 वीच्या पुस्तकात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान व अपमान करणारे व्यंगचित्र प्रसिध्द करणे याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूर येथील राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन परिषद (एनसीईआरटी) या संस्थेने त्यांच्या इयत्ता 11 वीच्या एका पुस्तकात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान व अवमान करणारे वादग्रस्त व्यंगचित्र प्रसिध्द करणे, या व्यंगचित्रात भारतीय संविधानाला गोगलगाय संबोधण्यात येणे, भारतीय घटनेचे थोर शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामागे भारताचे माजी पंतप्रधान कै.पंडित जवाहरलाल नेहरु हातात चाबूक घेऊन त्या घटनारुपी गोगलगायीला फटके मारीत आहे असे व्यंगचित्रात दाखविणे, तसेच या व्यंगचित्राखाली व्यंगचित्रकाराने भारतीय संविधानाचे काम कासवगतीने चालत असल्याचे दाखविणे, अशा प्रकारचे व्यंगचित्र एनसीईआरटीच्या पुस्तकात असणे, या व्यंगचित्राने भारतरत्न घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा, संविधानाचा व तमाम भारतीय जनतेचा झालेला अवमान व राष्ट्रद्रोह, त्यामुळे तमाम भारतीय जनतेत व बहुजन समाजात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबतचे शासनाने कठोरपणे करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्याबाबतचा विषय मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मुंबई शहराला लाभलेल्या 8 चौ.कि.मी.दलदलीचे (वेटलँड) संरक्षण करुन पर्यावरणाचे संतुलन टिकविणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये आज ओपन मुंबई एक्झीबिशन या नावाने एक्झीबिशन सुरु झालेले आहे. त्याबद्दलची माहिती तातडीने आपल्यासमोर आली आहे. इंग्रजीमध्ये हेडलाईन अशी दिली आहे की, "City must stop wetlands from turning into wastelands." मुंबई शहराला एकूण जवळजवळ 8 चौ.कि.मी.ची वेटलँड (दलदल) उपलब्ध आहे. ह्या निसर्गाच्या अनमोल देणगीचा हा ठेवा सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे. पर्यावरणाचे संतुलन टिकविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. अन्यथा ह्या बकाल शहरातील वेटलँडचे रुपांतर वेस्टलँडमध्ये होण्याचा धोका आहे. हे सर्व वेळेवर व नियोजनबध्दरित्या केल्यास दरवर्षी येणाऱ्या फ्लेमिंगो पक्षाप्रमाणे मुंबई पक्षांनी, फुलांनी बहरुन जाईल. शासनाने या विषयाबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तिलारी सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना अद्याप शासकीय नोकरीत सामावून न घेणे याबाबत श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, तिलारी सिंचन प्रकल्प (जि.सिंधुदुर्ग) सन 1979 रोजी सुरु होऊन तब्बल 30 वर्षे पूर्ण झाली असतानाही एकूण 789 विस्थापित/प्रकल्पग्रस्त दाखलाधारक कुटुंबांपैकी केवळ 188 तिलारी प्रकल्पग्रस्तांना अद्याप शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले नसल्याचे माहे फेब्रुवारी, 2012 मध्ये आढळून आले आहे. वास्तविक तिलारी प्रकल्प हा गोवा व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांचा संयुक्त प्रकल्प असून दोन्ही राज्यांनी समन्वय करुन प्रकल्पग्रस्तांना नोकरीत घेणे आवश्यक असल्याचा मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.30 मार्च, 2008 रोजी दिलेल्या निर्णयानुसार 18 महिन्याच्या कालावधीत प्रकल्पग्रस्तांना थेट शासकीय सेवेत सामावून घेण्याचे निर्देश दिलेले असतानाही जिल्हा प्रशासनाने प्रकल्पग्रस्तांना रोजगाराच्या थेट भरती प्रक्रियेपासून डावलण्यात आलेले आहे. तिलारी प्रकल्पग्रस्तांना स्पर्धा परीक्षेतही डावलले जात आहे. सबब, सदरची अट शिथिल करुन तिलारीसारख्या फक्त मोठया पाटबंधारे प्रकल्पाच्या सुमारे 600 प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत तातडीने कारवाई करावी, अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक कामाचे प्रशिक्षण घेतलेले शिक्षक निवडणूक संबंधी कामाचे सामान घेण्यासाठी उपस्थित न राहिल्याबद्दल त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात येणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, उल्हासनगर महानगरपालिका निवडणुकीच्या कामासाठी अनेक शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आलेल्या होत्या. भिवंडी येथील अनेक शिक्षकांना निवडणुकीचे काम देण्यात आले होते. निवडणुकीपूर्वीचे प्रशिक्षणही त्यांनी पूर्ण केले होते. तथापि काही शिक्षक प्रकृती बरी नसल्याने उपस्थित राहू शकले नाहीत. निवडणुकीपूर्वी एक दिवस अगोदरच माहिती देऊनही व राखीव कर्मचारी उपलब्ध असल्याने कोणत्याही प्रकारची गैरसोय झाली नाही. तथापि, निवडणुकीच्या कामांसंबंधी सामान घेण्यासाठी उपस्थित न राहिल्याबद्दल या शिक्षकांविरुध्द त्यांची बेसिक अडचण असून सुध्दा निवडणूक अधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल केले असून शिक्षकांना न्यायालयात जाऊन जामीन घ्यावा लागला आहे. त्यांना वारंवार न्यायालयात खेटे घालावे लागत आहेत. एक तर प्राथमिक शिक्षकांना आरटीई अंतर्गत कोणतेही काम द्यायचे नाही असे असतानाही त्यांनी काम स्वीकारले. म्हणून वैयक्तिक अडचणीमुळे शिक्षक येऊ शकले नसतील तर वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी दिलेले कारण ग्राह्य मानून त्यांच्यावर दाखल केलेले गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, फौजदारी गुन्हे मागे घ्यावेत अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राज्यातील ग्रंथालयांच्या अनुदानात 100 टक्के वाढ करण्याचा निर्णय अद्याप अंमलात न येणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्यात गाव तेथे ग्रंथालय अशी घोषणा शासनाने करण्यात येणे, तसेच राज्यातील ग्रंथालयांना 100 टक्के अनुदानात वाढ करण्याचे निर्णय शासनामार्फत अनेक वेळा घेण्यात येणे, मात्र सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात न येणे, तसेच माहे एप्रिल, 2012 मध्ये अनुदानात 50 टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात येणे व तद्नंतर राज्यातील शाळांच्या धर्तीनुसार अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परिणामी ग्रंथालय कर्मचाऱ्यात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत सदर ग्रंथालयांना चालू वर्षापासून 100 टक्के अनुदान देण्यात यावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करते.

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याच्या घटना वाढत असणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाणीचे प्रकार वाढत असून महिन्याभरात तीन अभियंत्यांना मारहाण झालेली असताना पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन खात्यातील महिला अधिकारी रत्नप्रभा फणसे यांना फेरीवाल्यावर कारवाई करीत असताना काही जणांनी धक्काबुक्की करुन हल्ला करण्यात येणे, अनधिकृत कामे करणाऱ्यांवर कारवाई करणा-या एका महिला अधिकाऱ्यांवर हल्ला करण्यात आल्याने पालिकेतील सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झालेली असणे, याबाबत कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता असल्याने या गंभीर विषयास न्याय मिळावा यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील वैयक्तिक वनहक्क दाव्यांचा तातडीने निपटारा करणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयामध्ये राज्यातील सर्वात जास्त जंगल असणे, त्यामुळे वर्षानुवर्षे जंगलाशेजारी राहणाऱ्या आदिवासींना हक्काची जमीन मिळावी, यासाठी केंद्र शासनाने अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम- 2006 नियम 2008 हा कायदा तयार करणे, सदर कायदा अस्तित्वात आल्यानंतर जिल्हा स्तरापासून तर ग्रामस्तरापर्यंत वनहक्क समित्या गठीत करण्यात येणे, या समित्यांना कायद्याचा प्रचार करुन दावे मंजूर करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले असणे, परंतु चंद्रपूर जिल्हयात फक्त 3079 वैयक्तिक वनहक्काचे दावे मंजूर झाले असून यापैकी 3016 दावे आदिवासींचे व 63 दावे बिगर आदिवासींचे असणे, अशीच परिस्थिती गोंदिया व गडचिरोली जिल्हयात निर्माण झाली असून दरवर्षी निधी मिळत असून सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे वनहक्क दाव्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले नसणे, या कामात जिल्हयातील संबंधित उपविभागीय अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व वनहक्क समित्यांच्या अध्यक्षांचे अक्षम्य दुर्लक्ष असणे, त्यामुळे सदर कायद्याच्या प्रसार आणि प्रचाराचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने जिल्हा प्रशासनाला तत्काळ आदेश देऊन वनहक्क दाव्यांची पूर्तता करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: महाराष्ट्रातील विविध महत्वांच्या शहरामध्ये हॉटेल व्यवसायाच्या नावाखाली सुरु असलेली हुक्का पार्लर्स याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील विविध महत्वाच्या शहरांमध्ये हॉटेल व्यवसायाच्या नावाखाली बेकायदेशीर हुक्का पार्लर चालविली जात असणे, तरुण पिढी या हुक्क्यामधून अंमली पदार्थ मिसळून त्याच्या व्यसनाधीन जात असणे, हुक्का हा अन्य तंबाखूजन्य पदार्थ गटात येत असल्याने त्या कायद्यानुसार महापालिकांना केवळ दंड आकारण्याची तरतूद असणे, दंडाची रक्कम केवळ 200 रुपये असणे, आरोग्य विभाग या हुक्का पार्लरवर कारवाई करीत असला तरी ही कारवाई म्हणजे केवळ नाममात्र दंड वसुली मोहीम ठरत असणे, हुक्का पार्लरच्या माध्यमातून व्यसनाधीन होणाऱ्या तरुण पिढीला वाचविण्यासाठी हुक्का पार्लर चालकांवर कडक कारवाई करण्यासाठी आवश्यक त्या कायद्यात बदल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई विचारात घेण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

नंतर श्री.भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी नेमण्यासाठी एकच पद्धती निर्धारित करणे या बाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील विविध विभागांमध्ये तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात कार्यरत असतो. प्रथम श्रेणी अधिकारी व वर्ग दोनचे अधिकारी यांच्या नेमणुका महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून किमान शैक्षणिक पात्रता स्पर्धात्मक परीक्षा, तोंडी परीक्षा इत्यादी निकष लावून नेमले जातात. मात्र तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्याबाबत शासनाच्या सर्वच विभागांनी वेगवेगळी पद्धती अवलंबिली आहे. काही ठिकाणी गुणानुक्रमे, तर काही ठिकाणी मनमानी पद्धतीने कर्मचारी नेमले जातात. काही कार्यालयांमध्ये रोजंदारी व कंत्राटी पद्धतीने नेमणुका केल्या जातात. त्यामुळे अनेक प्रकारची अनियमितता कामावर होत असल्याचे दिसून येत आहे. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करीत आहे की, तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी नेमण्यासाठी एकच पद्धती निर्धारित करण्यात यावी.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता न घेतलेल्या महाविद्यालयांवर कारवाई करणे या बाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यात अखिल भारतीय तंत्र परिषदेची (एआयटीसीई) परवानगी न घेता थेट अभ्यासक्रम सुरू करून राज्यातील 120 कॉलेजनी विद्यार्थ्यांची मोठी फसवणूक केल्याचे नुकतेच माहे एप्रिल 2012 मध्ये उघडकीस येणे, कॉलेजकडून विद्यार्थ्यांची झालेली फसवणूक, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण या बाबत फसवणूक करणाऱ्या कॉलेजचे सखोल परीक्षण करून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता न घेणाऱ्या कॉलेजवर तातडीने कारवाई करावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म.वि.प.नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी निमय 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली होती. आज आपल्याकडे दोन प्रस्तावाच्या सूचना देण्यात आल्या होत्या. पहिली प्रस्तावाची सूचना सीमा भागातील लोकांसंबंधी होती म्हणून मी माझ्या प्रस्तावाच्या सूचने संबंधात बोललो नाही. तो ही विषय अत्यंत महत्वाचा होता. त्यावेळी आपणास संधी मिळेल असे मला सांगण्यात आले होते. आता कामकाज संपण्याची वेळ आलेली आहे. मी दिलेल्या नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचने बाबत काय झाले या बाबत आपण निर्णय द्यावा अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : या बाबत माननीय सभापतींशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्प सूचना प्रश्न व नियम 93 च्या निवेदनाबाबत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा व्यवस्थे संबंधातील एक मुद्दा आहे. अल्प सूचना प्रश्न हे एक महत्त्वाचे आयुध आहे. आम्ही अनेक अल्प सूचना प्रश्न दिले आहेत. हे अधिवेशन सहा आठवड्यांचे आहे. या अधिवेशन सत्र कालावधीत अनेक महत्त्वाच्या वेगवेगळ्या घटना झाल्या आहेत. त्या संबंधी या सभागृहात अग्रक्रमाने चर्चा होणे अपेक्षित आहे. अनेक लक्षवेधी सूचना स्वीकृत असतात पण त्या संबंधी प्रश्न मांडता येत नाही. अधिवेशनाचा शेवटचा आठवडा आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, अल्प सूचना प्रश्न आपण कधी पासून घेणार आहात ?

या बरोबरच नियम 93 च्या सूचने संबंधी देखील प्रश्न उपस्थित केला होता. नियम 93 च्या सूचनांची अद्याप पर्यंत एक-दोन निवेदने येत आहेत. शेवटच्या आठवड्यामध्ये 93 च्या सूचनेवरील निवेदने आल्यानंतर त्यावर चर्चा होत नाही. चर्चा होऊ नये या उद्देशाने मग सदस्यांना खाली बसविण्यात येते. अशाने नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेचा उपयोग काय होणार आहे ? नियम 93 अन्वयेच्या सूचने वरील निवेदनावर चर्चा होण्याच्या दृष्टीने ताबडतोब पावले उचलली जावीत. तसेच अल्प सूचना प्रश्न कधी पासून सुरू होणार हे आम्हाला कळले पाहिजे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वि.स.वि.क्रमांक 4 - मुंबई वीज शुल्क (सुधारणा) विधेयका बाबत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला फक्त एका गोष्टीचा खुलासा हवा आहे. योगायोगाने येथे प्रधान सचिव श्री.कळसे साहेब देखील आहेत. मुंबई वीज शुल्क अधिनियम, 1958 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आले आहे. आपल्या मार्फत हे विधी खाते कसे झोपा काढते व त्यांच्या मुळे सरकार कसे बदनाम होते हे मला दाखवून द्यायचे आहे. सभागृहात हे विधेयक आपण मंजूर केले तर चुकीचे कसे ठरू शकते हे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. हे विधेयक विधान सभेत मंजूर झाले आहे. या विधेयकातील "भाग-ग" ला सुधारणा आहे. त्यामुळे मी सन 1958 चा मुंबई अधिनियम क्रमांक 40 काढून पाहिला आणि "भाग ग" वाचला. यातील भाग "ग" मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "चित्रपटगृह, नाट्यगृह, सर्कशी, लोकनाट्य यासाठी केलेल्या कायम किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या पुरवठ्याच्या बाबतीत." आम्हाला आज वि.स.वि.क्रमांक 4 - मुंबई वीज शुल्क (सुधारणा) विधेयकाची प्रत देण्यात आली आहे. त्यात "लायसनदार नसलेल्या व ऊर्जेचे उत्पादन करणाऱ्या व ती ऊर्जा अन्य कोणत्याही व्यक्तीला वीज शुल्काचा विद्यमान कमाल दर प्रति युनिटला 40 पैसे वरून प्रति युनिटला 150 पैसे इतका वाढवून देण्यात येईल" असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आम्हाला आता विधेयकाची जी प्रत प्राप्त झाली आहे त्यातील "ग" वेगळा आहे आणि सन 1958 च्या मुंबई अधिनियम क्रमांक 40 मधील "ग" वेगळा आहे. मग नेमकी दुरुस्ती कोणत्या "ग" मध्ये करावयाची आहे ? आपण जी सुधारणा सुचविली आहे ती सन 1958 चा मुंबई अधिनियम क्रमांक 40 मधील भाग "छ" मध्ये आहे.

मूळात 1997 मध्ये पहिली चूक झाली आहे. सन 1997 च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात मुंबई वीज शुल्क अधिनियम 1958 प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यात जो "ग" प्रसिद्ध करण्यात आला आहे त्याला धरूनच सुधारणा सुचविण्यात आली आहे. 1997 साली चुकीच्या पद्धतीने बिल मंजूर झाले आहे. विधान सभेत देखील असेच बिल पास झाले आहे. त्यामुळे ते बिल आता आपल्याकडे आले आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण विधी विभागाच्या सचिवांना बोलावून घ्यावे. हा जो अवमान आणि हेटाळणी चालली आहे ती थांबवली पाहिजे. शेवटी आपले सभागृह म्हणजे कायदे मंडळ आहे. बिलामध्ये अशा प्रकारच्या चुका असतील तर मग लोकप्रतिनिधी झोपा काढून बिल पास करतात असा मेसेज बाहेर जाईल. नोकरशहा

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्यांच्या क्लबमध्ये गप्पा मारतात की, बिल आम्ही बनवितो, हे कुठे काय करतात. ही चूक विधी विभागाच्या कोणत्या अधिकाऱ्याने केली आहे हे पिनपॉईंट केले पाहिजे. त्या आधी बिल चर्चेला घेणे म्हणजे विधान मंडळाचा अवमान आहे. या चुकीसहित हे बिल विधान सभेमध्ये पारित झाले आहे. हा आपला अवमान नाही काय ? उद्या सकाळी आपण विधी खात्याच्या सचिवांना बोलवावे. आपल्या नियमा प्रमाणे तांत्रिक चूक दुरूस्त करण्याचा अधिकार माननीय सभापतींना आहे हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी ते करावे. हे बिल आपण उद्या चर्चेला घेऊ या. पण त्या आधी आपण विधी खात्याला कडक भाषेत समज दिली पाहिजे. विधान मंडळाचा अवमान त्यांच्याकडून होत आहे. त्यांना समज दिल्यानंतर हे बिल चर्चेला यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

.....

यानंतर श्री.सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विधी खात्यासंबंधी आणि विधानमंडळाच्या कामकाजाशी संबंधित आपल्यासमोर येणारे रेकॉर्ड कशाप्रकारे असावयास पाहिजे यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. चार-पाच वर्षापूर्वी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये याच सभागृहात मी तीन दिवस एक विधेयक रोखून धरले होते. त्यावेळी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आपल्याला कायदा बनवावयाचा आहे असे विधी खात्याने म्हटले होते त्याबद्दल त्या खात्याने नंतर दिलगिरी व्यक्त केली. या ठिकाणी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कायदा बनविण्यासाठी हे विधिमंडळ नाही. या विधानमंडळामध्ये बनविण्यात आलेल्या कायद्याच्या आधारावर न्यायालयाने निकाल दिला पाहिजे, न्यायालयाचे कामकाज चालले पाहिजे. परंतु वेळोवेळी जर हे विधी खाते असे वागत असेल तर या राज्याचा कारभार हे विधी खाते कसे करीत असेल? प्रत्येक वेळी या राज्य शासनाला उच्च न्यायालयामध्ये अपयश आले आहे. सभापती महोदय, उच्च न्यायालयामध्ये आपण आपल्या सगळया केसेस हरतो. म्हणून माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या मागणी प्रमाणे विधी खात्याने विधिमंडळाकडे दिलगिरी व्यक्त केली पाहिजे अशी मी मागणी करतो.

तालिका सभापती : माननीय सभापतींसमोर विधी विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलाविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 13 एप्रिल 2012 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यन्त महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये "राज्यात विशेषत: मुंबईत आढळलेल्या स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण" या विषयावर चर्चा होईल . त्यानंतर सकाळी 11.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 21 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 13.4.2012 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही